संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २५६ * * अमरावती * | बुधवार, दिनांक १२ मार्च २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




अग्राग्रलेख

## खरीखरी..

## ट्रम्पगिरी विरुद्ध विश्व

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी सर्व जगाला हादरवून सोडलेले आहे. अमेरिका म्हणजे सर्वात श्रीमंत देश आहे असे म्हणतात. पण या अमेरिकेवरच सर्वाधिक रकमेचे कर्ज आहे. म्हणजेच अमेरिका हा सर्वात कर्जबाजारी देश आहे. असा या वाक्याचा दुसरा अर्थ होतो. ट्रम्प यांनी सत्तेवर आल्याबरोबर जे हुकूमनामे काढलेले आहेत. त्यामुळे जगात सर्वत्र असंतोष आहे. ट्रम्पच्या या निर्णयांना आणि त्यांच्या दादागिरीला युरोपातील सर्वच राष्ट्रे उघड उघड विरोध करीत आहेत. ट्रम्प यांचा शांततावाद आणि युद्ध नको असे म्हणणारे वरपांगी धोरण खुद्द ट्रम्प यांनाच पचेल काय, असा प्रश्न आहे. आजही अमेरिका देशात सर्वात जास्त शस्त्रास्त्रांचे उत्पादन होते. ही शस्त्रास्त्रे निर्मिती करणे आणि जगभरात विकणे हाच अमेरिकेचा मोठा कारभार आहे. अमेरिकेनंतर फ्रान्स, जर्मनी, चीन आणि रशिया हेही शस्त्रास्त्र विक्रीचे मोठे विक्रेते आहेत. जर जगात युद्धेच झाली नाहीत आणि लढाया संपल्या. तर त्यांच्या शस्त्रांना कोण विचारणार. म्हणूनच ट्रम्प यांचा जो शांततेचा देखावा आहे. तो कुठल्याही परिस्थितीत जगातील राष्ट्रांना पटत नाही. आता जगात ट्रम्पला विरोध करणारी बहुसंख्य राष्ट्रे आहेत हे दिसतेच आहे. ट्रम्पने जे जे निर्णय घेतले ते घिसाडघाईने घेतल्याने खुद अमेरिकेतील जनतेकडूनच ट्रम्पला वाढता विरोध आहे. आता तर सर्व अरब राष्ट्रे सुद्धा इराणच्या नेतृत्वाखाली ट्रम्पच्या निर्णयांना विरोध करीत आहेत. अगदी आत्ता-आत्तापर्यंत ही अरब राष्ट्रे अमेरिकेची मित्रराष्ट्रे होती. यावेळी मात्र त्यांनी आपली वेगळी नीती आखून ट्रम्प यांच्या दादागिरीला विरोध केलेला आहे. मुख्य मुद्दा असा आहे की, यावर भारताचे मत काय आहे. परंतु अजूनही भारताने कोणता निर्णय घ्यावा. हे ठरवलेले दिसत नाही. भारताचे परंपरागत मित्र म्हणून रशियाला ओळखले जाते. रशियाने भारताला वेळोवेळी मदत केलेली आहे. 1971 च्या भारत-पाक युद्धामध्ये अमेरिकेचे सातवे आरमार पाकिस्तानच्या बाजूने त्या युद्धात उतरणार होते. त्याचा मुकाबला करण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी रशियाकडे मदत मागितली आणि त्यावेळी रशियानेही आपले आरमार भारताच्या मदतीसाठी पाठवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळेच शेवटी अमेरिकेने आपले आरमार पाठवलेच नाही. नुकत्याच थांबलेल्या युक्रेनच्या लढाईत अमेरिकेने जी मदत युक्रेनला केली आहे. त्या मदतीची स्थिती काय होती, तर त्याची परतफेड म्हणून युक्रेनने अमेरिकेच्या शस्त्रास्त्रांची खरेदी करावी. ही एक गोष्ट झाली. आता अमेरिकेने इराणला धमकी दिलेली आहे की, त्यांनी आपली परमाणु विकासाची योजना सध्यातरी स्थगित ठेवावी. ही दुसरी गोष्ट आहे. अशा प्रकारच्या सर्व गोष्टींमुळे दक्षिण पूर्व आशियातील सर्व राष्ट्रे इस्त्राईलच्या दादागिरी विरुद्ध इराण बरोबर उभी राहिलेली आहेत. आज रशिया आपल्या बजेट मधील जवळपास सहा टक्के पेक्षा जास्त रक्कम संरक्षणासाठी खर्च करतो. चीनचा संरक्षणाचा खर्च किती आहे ते कधीच कळत नाही. पण सर्वच विकसित राष्ट्रे संरक्षणावर जास्तीत जास्त खर्च करतात. कोणी एकेकाळी नेहरू, नासीर आणि टिटो यांनी अलिप्ततावाद स्वीकारून भारताला शांततापूर्ण मार्गावर नेण्याचे स्वप्न बघितले होते. चीनने हल्ला केल्यावर भारतालाही फार मोठा धक्का बसला होता. यामुळे आता भारताला आपले कोणकोणते मित्र आहेत. याची यादीच तयार करावी लागेल. आपल्या शेजारचे सर्वच देश आपले मित्र नाहीत. त्यातच आता ट्रम्प म्हणतात, भारताने रशियाकडून क्रूड ऑइलची खरेदी थांबवावी आणि आमचे क्रूड ऑइल खरेदी करावे. लढण्यासाठी लागणारी शस्त्रास्त्रे सुद्धा आम्हीच देऊ. थोडक्यात काय तर ट्रम्प यांची 'उद्योगस्नेही' प्रतिमा कितीही बदलण्याचा प्रयत्न झाला. तरी ती बदलली जात नाही. हेच खरे आहे. ट्रम्प हा सणकी आहे असे म्हणतात. पण तसे नाही. तो अत्यंत चाणाक्ष असा उद्योगपती आहे. त्यामुळे त्याने जगात जिथे जिथे अमेरिकेची मदत सुरू होती. ती बंद करून अमेरिकेच्या कजार्ला कमी करण्यावर भर दिलेला आहे. पण या सर्व कारवाईत जी युरोपीय राष्ट्रे अमेरिकेची खास दोस्त होती. त्यांचेही अमेरिकेशी बिनसलेले आहे. पुढील काही दिवसात ट्रम्प यांच्या या दादागिरीचा विरोध करण्यासाठी जागतिक स्तरावर हालचाली सुरू होत आहेत. भारताने अद्यापपर्यंत तरी स्पष्ट भूमिका न घेतल्याने आता तर 'ब्रिक्स' राष्ट्रांमध्येही भारताचा विरोध करणे सुरू झालेले आहे. एकूणच जागतिक परिस्थितीत सध्या तरी अमेरिका विरुद्ध सर्व जग अशी परिस्थिती निर्माण झालेली दिसत आहे. ही ट्रम्पगिरी कधी संपेल, किंवा संपेल की नाही. हे कोणाच्याही बापाला समजेनासे झालेले आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## मुख्यमंत्र्यांनी दिल्या विधानसभेत सूचना

# भोंग्यांवर कारवाई होणार!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांवर अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत बोलताना सुप्रीम कोर्टाच्या आदेशांचा दाखला देत रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत भोंगे बंद ठेवण्याची ताकीद दिली.

या प्रकरणी आवाजाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसी कारवाई करण्याचाही इशारा दिला. यावेळी त्यांनी हे भोंगे बंद होतील, पण सकाळी ९ च्या भोंग्याचे काय करायचे? असा प्रश्न करत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनाही टोला हाणला. त्यांचा हा सवाल ऐकताच सभागृहात हास्याचे कारंजे उडाले.

भाजप आमदार देवयानी फरांदे यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या माध्यमातून भोंग्यांचा मुद्दा उपस्थित केला. राज्यात प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांतून कर्णकर्कश आवाज होतो. विशेषतः मशिदींवरील भोंग्यांतून दिवसातून ३ ते ४ वेळा नमाज अदा केली जाते. सरकारने यासंबंधी दिलेले उत्तर समाधानकारक नाही. त्यामुळे कोणत्याही स्थितीत भोंग्यांचा आवाज बंद झाला पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अध्यक्ष महोदय, हे भोंगे बंद होतील, पण सकाळी ९ च्या भोंग्याचे काय करायचे? ते पुढे म्हणाले, देवयानी फरांदे यांनी उपस्थित केलेला विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कोणत्याही प्रार्थनास्थळावर असणाऱ्या भोंग्यांसाठी परवानगी घ्यावी लागते. हे भोंगे रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत बंदच असले पाहिजे. त्यानंतर सकाळी ६ ते रात्री १० पर्यंत दिवसा ५५ डेसिबल व रात्री ४५ डेसिबलची मर्यादा असावी. त्याहून अधिक आवाज असता कामा नये, असे कोर्टाचे निर्देश आहेत.



**...तर त्यांच्यावरही कारवाई**
नियमांत बदल करण्याची विनंती केंद्राला केली जाईल. नंतर सरकार कडक कारवाई करेल. तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी संबंधित पीआयची असेल. त्याने योग्य ती कारवाई केली नाही तर त्याच्यावर कारवाई होईल, असेही फडणवीस म्हणाले.


या प्रकरणी एखाद्या ठिकाणचा भोंगा अधिक डेसिबलने वाजत असेल तर त्याचे अधिकार हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला केंद्रीय कायद्याने दिले आहेत. त्यानुसार पोलिसांनी स्वतः दखल घेऊन त्यांना कळवायचे आहे. त्यानंतर त्यांनी त्यासंबंधी जी काही कारवाई असेल ती करावी अशा प्रकारची आताची कायद्याची परिस्थिती आहे.

हे खरे असले तरी त्यावर अंमल होताना दिसत नाही. म्हणून यासंबंधी काही सूचना आम्ही निर्गमित करत आहोत. त्यात कुणालाही सरसकट भोंग्यांची परवानगी देण्यात येणार नाही. ती निश्चित कालावधीसाठीच दिली जाईल. त्या कालावधीनंतर त्यांना परवानगी हवी असेल तर त्यांना ती पोलिसांकडे जाऊन ती पुन्हा रितसर घ्यावी लागेल.

ज्या ठिकाणी आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन होईल. त्यांना पुन्हा परवानगी दिली जाणार नाही. त्यांच्या भोंग्यांची जप्ती केली जाईल. तंतोतंत पालन होत आहे की नाही याची जबाबदारी संबंधित पीआयची असेल. पीआयने प्रत्येक प्रार्थनास्थळावर जाऊन भोंग्याची परवानगी घेतली आहे किंवा नाही हे पडताळून पहावे.

सरकारने सर्वच पोलिसांना आवाज मोजण्याचे डेसिबल मीटर दिले आहे. अशा प्रकारे ते डेसिबल मोजून संबंधित ठिकाणी मर्यादेपेक्षा जास्त आवाज येत असेल तर पहिल्या टप्प्यात एमपीसीबीला सांगणे, त्यांच्याकडून कारवाई करून घेणे, अशी कारवाई अपेक्षित आहे. दुसऱ्या टप्प्यात त्यांच्या परवानग्यांचे नूतनीकरण न करणे ही कारवाई केली जाईल. अतिशय कडकपणे याची मॉनिटरिंग केली जाईल, निर्देशाचे पालन केलेच गेले पाहिजे, असे फडणवीस म्हणाले.

# सीरियात युद्ध!




■ **वृत्तसंस्था, दमास्कस, दि. ११ :** 'सीरियातील सर्वात सुंदर शहरे, लताकिया आणि टार्टस निर्जन आहेत.' रस्त्यांवर मृतदेह पडलेले आहेत. मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये बहुतेक सामान्य नागरिक आहेत. एचटीएस लढवय्ये सर्वत्र दिसतात.

मीडिया कव्हरेज टाळण्यासाठी, ओळख न कळवता मृतदेह पुरले जात आहेत. आमच्या भागात पाणी आणि वीज पुरवठा खंडित झाला आहे. लोकांवर उघडपणे गोळीबार केला जात आहे. अनेक गावकऱ्यांनी शस्त्रे गोळा केली आहेत आणि ते सैन्याशी लढत आहेत.'

६ मार्चपासून लताकियामध्ये सीरियन सैन्य आणि अलावी सैनिकांमध्ये युद्ध सुरू आहे. गोळ्या झाडल्याचे व्हिडिओ व्हायरल होत आहेत. सीरियन ऑब्झर्व्हेटरी फॉर ह्युमन राईट्सच्या मते, आतापर्यंत एक हजाराहून अधिक लोक मारले गेले आहेत. ५३ वर्षे सीरियावर राज्य करणारे असद कुटुंब लताकियातील अल-करदाहा गावातील होते. उठावानंतर देश सोडून पळून गेलेले राष्ट्राध्यक्ष बशर अल-असद हे अलावी समुदायाचे आहेत. त्यांच्या कारकिर्दीत लताकिया हा अलावींचा सर्वात मजबूत किल्ला होता.

बशर-अल-असद देश सोडून पळून गेल्यानंतर आणि ८ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या सत्तापालटानंतर हयात तहरीर अल-शाम म्हणजेच एचटीएस हा बंडखोर गट सत्तेत आहे. या बंडानंतर जवळजवळ तीन महिन्यांनी, सीरियामध्ये एक नवीन लढाई सुरू झाली आहे. असद समर्थित अलावी लोक एचटीएस सैनिकांवर हल्ला करत आहेत. प्रत्युत्तरादाखल, एचटीएस लढवय्ये अलावी भागात घुसून हल्ला करत आहेत.

## पाकिस्तानमध्ये प्रवासी ट्रेनचे अपहरण: १२० प्रवाशांना ओलीस ठेवले

### ६ सैनिकांना ठार मारले

■ **वृत्तसंस्था, इस्लामाबाद, दि. ११ :** पाकिस्तानमधील बलुच लिबरेशन आर्मीने (बीएलए) मंगळवारी एका प्रवासी ट्रेनचे अपहरण केले. बीएलएने दावा केला की, त्यांच्या सैन्याने जाफर एक्सप्रेसचे अपहरण केले होते आणि १२० प्रवाशांना ओलीस ठेवले होते. ही ट्रेन क्वेट्टाहून पेशावरला जात होती.

पाकिस्तानी वृत्तपत्र द डॉनने बलुचिस्तान सरकारचे प्रवक्ते शाहिद रिंद यांच्या हवाल्याने हे वृत्त दिले आहे. क्वेट्टाहून पेशावरला जाणाऱ्या जाफर एक्सप्रेसमध्ये पेहरो कुनरी आणि गडलार दरम्यान जोरदार गोळीबार झाल्याचे वृत्त आहे, असे शाहिद म्हणाले. या दरम्यान ६ सैनिकांचा मृत्यू झाला आहे.



क्वेट्टाहून पेशावरला जाणाऱ्या ट्रेनमध्ये पहारो कुन्री आणि गदालार दरम्यान जोरदार गोळीबार झाल्याची नोंद आहे. यानंतर, परिसरात इमर्जन्सी आदेश जारी करण्यात आले.

या ट्रेनमध्ये ९ डबे होते आणि त्यात ५०० प्रवासी होते. बोगदा क्रमांक ८ मध्ये सशस्त्र लोकांनी ते थांबवले. सरकार प्रवाशांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहे. सरकारने म्हटले आहे की, खडकाळ परिसर असल्याने अधिकाऱ्यांना घटनास्थळी पोहोचण्यास अडचण येत आहे.

क्वेट्टामधील सरकारी रुग्णालयांमध्ये आणीबाणी लागू करण्यात आली आहे. सर्व डॉक्टर, तज्ज्ञ, सल्लागार आणि परिचारिकांना रुग्णालयात पोहोचण्यास सांगण्यात आले आहे.

बीएलएने एका निवेदनात म्हटले आहे की आमच्या सैनिकांनी मश्काफ, धादर आणि बोलानमध्ये या कारवाईची योजना आखली आहे. रेल्वे ट्रॅक उडवून दिला आहे, ज्यामुळे जाफर एक्सप्रेस थांबली आहे. अपहरणकर्त्यांमध्ये पाकिस्तानी लष्कर, पोलिस, दहशतवादविरोधी दल (एटीएफ) आणि इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजेंस (आयएसआय) चे एजंट होते.

## अखेर ठरला आघाडीचा नेता

### भास्कर जाधव यांच्या नावाची शिफारस

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :** नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीतील एकाही घटक पक्षाला विधानसभेत विरोधी पक्ष नेता मिळेल, एवढे देखील सदस्य निवडून आलेले नाहीत. त्यामुळे आघाडीतील प्रमुख तीन पक्षांनी मिळून आता विरोधी पक्ष नेते पदावर दावा करण्यात आला आहे. मात्र अद्याप या पदावर कोणाची वर्णी लागेल? याचा निर्णय झालेला नव्हता.



अखेर उद्धव ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांच्या नावाची शिफारस विधानसभा अध्यक्ष यांच्याकडे करण्यात आली आहे. याबाबत भास्कर जाधव यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना माहिती दिली.

विधानसभेतील विरोधी पक्ष नेते पदासाठी महाविकास आघाडीच्या वतीने विधानसभा अध्यक्षांकडे माझ्या नावाचे पत्र देण्यात आले असल्याचे आमदार भास्कर जाधव यांनी सांगितले. मात्र आता अधिवेशनाला कमी दिवस राहिले आहेत. त्यामुळे अधिवेशन संपेपर्यंत त्याची केवळ घोषणा केली आणि पुढील अधिवेशनात नियुक्ती केली तरीही सत्ताधारी पक्षाने लोकशाहीची भूज राखली, असे मी म्हणले, अशा शब्दात भास्कर जाधव यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

विधानसभेतील विरोधी पक्ष नेते पदावर कोणाची वर्णी लागते, याबाबत वर्क वितर्क लावले जात होते. भास्कर जाधव यांनी माध्यमांशी बोलताना नाराजी व्यक्त करत मला क्षमतेप्रमाणे काम करण्याची संधी मिळाली नसल्याचे म्हटले होते. भास्कर जाधव हे पक्षांतर करण्याची शक्यता वर्तवली जात होती.

या सर्व पार्श्वभूमीवर आता भास्कर जाधव यांची नाराजी दूर करण्यासाठी पक्षाच्या वतीने त्यांच्याकडे विरोधी पक्ष नेते पदाची महत्त्वाची जबाबदारी दिली जात असल्याची चर्चा आहे.

## बलात्कारी नराधमांना नपुंसक करा...

### राज्यपाल बागडे यांची मागणी

■ **वृत्तसंस्था, भरतपूर, दि. ११ :** महिलांच्याबाबतीत घडणाऱ्या अशा घटना कमी करायच्या असतील तर मनातच भीती निर्माण करायला हवी. यासाठी महिलांची छेड काढणाऱ्यांना थेट चोप आणि बलात्कार करणाऱ्या नराधमांना नपुंसक केलं पाहिजे, असे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी म्हटले आहे.



बलात्काराच्या वाढत्या घटनांबाबत बोलताना भरतपूर जिल्हा बार असोसिएशनच्या शपथविधी समारंभात व्यासपीठावरून राज्यपालांनी हे वक्तव्य केले आहे

ते म्हणाले की, काही लोक महिलांवर अत्याचार होत असतानाही व्हिडिओ बनवत असतात. जोपर्यंत विनयभंग करणाऱ्याला आपण चोप देत नाही तोपर्यंत अशा गुन्ह्यांना आळा बसणार नाही.

## औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीला मुख्यमंत्री फडणवीसांचा पाठिंबा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलदाबाद येथील मुघल सम्राट औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाठिंबा दिला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आपल्या सर्वांना हे हवे आहे, पण तुम्हाला ते कायद्याच्या कक्षेत करावे लागेल, कारण हे एक संरक्षित ठिकाण आहे. काही वर्षांपूर्वी, काँग्रेसच्या काळात, हे ठिकाण एएसआयच्या संरक्षणाखाली ठेवण्यात आले होते. खासदार उदयनराजे भोसले यांनी औरंगजेबाची कबर पाडण्याची मागणी केली होती.

## खरगे म्हणाले 'ठोकेंगे' राज्यसभेत गोंधळ

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :** अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या विधानावरून राज्यसभेत प्रचंड गोंधळ झाला.

दिग्विजय सिंह बोलत असताना खरगे त्यांच्या आसनावर उभे राहिले. यावर उपसभापती हरिवंश यांनी त्यांना अडवले. यावर खरगे म्हणाले, ही कोणत्या प्रकारची हुकूमशाही आहे? मी तुम्हाला हात जोडून बोलण्याची परवानगी मागत आहे.

यानंतर हरिवंश म्हणाले की, तुम्ही सकाळीच बोलला आहात. आता बोलण्याची वेळ दिग्विजय सिंह यांची आहे, म्हणून कृपया खाली बसा. यानंतर, खरगे म्हणाले, मी नक्कीच बोलेन, पण तुम्हाला जे काही ठोकायचे आहे ते आम्ही व्यवस्थित ठोकू, आम्ही सरकारलाही ठोकणार.

खरगे यांच्या विधानावर केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांनी उपसभापती हरिवंश यांच्याकडे मागणी केली की असे शब्द सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावेत. अशी भाषा अत्यंत निंदनीय आहे आणि ती क्षमेला पात्र नाही. यानंतर, खरगे सभागृहात उभे राहिले आणि म्हणाले की माझ्या बोलण्याने दुखावले असेल, तर मी त्याबद्दल माफी मागतो.

## कोरटकर मुंबईत अवतरला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** प्रशांत कोरटकरच्या अंतरिम जामिनावर हायकोर्टात सुनावणी झाली. कोल्हापूर पोलिसांनी कोरटकरच्या जामिनाला विरोध दर्शवला असून हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. सुनावणीपूर्वीच कोरटकर मुंबईत दाखल झाला आहे. पण तो कोर्टात हजर झालेला नाही, अशी माहिती समोर आली आहे.

प्रशांत कोरटकर यांचा जामीन आज संपत आहे, त्यामुळे जामीन रद्द करण्याची गरज नाही असे कोर्टाने म्हटले आहे. तर कोल्हापूर कोर्टाने राज्य सरकारची बाजू ऐकून घेत योग्य तो निर्णय घ्यावा असेही कोर्टाने म्हटले आहे. कोल्हापूर सत्र न्यायालयाचे निरीक्षण काढून टाका असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने देत कोरटकरला मोठा झटका दिला आहे. दरम्यान ॲड. असिम सरोदे यांनी कोरटवरविषयी कठोर टीका केली आहे.

**कोर्टाने निकाल राखून ठेवला**
प्रशांत कोरटकरच्या अंतरिम जामिनावर आज कोल्हापूर कोर्टात सुनावणी पार पडली. प्रशांत कोरटकरच्या अंतरिम जामिनाबाबत युक्तीवाद पूर्ण झाला असून कोल्हापूर कोर्ट यावर उद्या निकाल देणार आहे. इंद्रजित सावंत धमकीप्रकरणी केलेल्या इतर हस्तक्षेप याचिका फेटाळल्या आहेत. प्रशांत कोरटकरने वकिलाच्या माध्यमातून सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला आहे. कोरटकरने कोर्टात हजर व्हायचे की, नाही यावर कोर्ट निकाल देणार आहे.

## विधान भवनातील नवीन नियमांचे काटेकोर पालन अनिवार्य

■ **दीपक कैटके मुंबई, दि. ११ :** महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती यांच्या अध्यक्षतेखाली टी. व्ही. जर्नलिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष, सचिव-२ (कार्यभार) आणि मुख्य सुरक्षा अधिकारी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत विधान भवन परिसरातील मीडियासंबंधी नव्या मार्गदर्शक तत्त्वांवर महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

या बैठकीनंतर मीडिया प्रतिनिधींनी विधान भवन परिसरात चित्रीकरण व वातार्लाप करताना काही विशिष्ट नियमांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. यासोबतच, नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित पत्रकार आणि छायाचित्रकारांचे प्रवेश पास जप्त करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

विधान भवन परिसरात नियमांचे काटेकोर पालन करण्यासाठी मुख्य सुरक्षा अधिकाऱ्यांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक छायाचित्रकार व दूरचित्रवाहिनी प्रतिनिधींनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणावरूनच छायाचित्रे काढावीत आणि चित्रीकरण करावे.

आमदारांसोबत वातार्लाप आणि चित्रीकरण ठरवून दिलेल्या जागेवरूनच करावे.

नव्या सूचनांनुसार, विधान भवन परिसरात नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी स्टँडी आणि फलक लावण्यात येणार आहेत. विधान भवनाच्या पायऱ्यांवर मोबाईल, कॅमेरा आणि बूम माईक घेऊन कव्हरेजसाठी येऊ नये.

पायऱ्यांच्या समोरील लाल फीतीबाहेरच कॅमेरे ठेवावेत. विधान भवन रेड कार्पेटवर न्यूज कव्हरेजसाठी मोबाईल, कॅमेरा आणि बूम माईक वापरून बाईट घेऊ नये. फक्त विधान भवनातील मीडियासाठी निर्धारित मीडिया बॉक्समध्येच न्यूज कव्हरेज करावे. रेड कार्पेटवर छायाचित्रकारांनी वाहतुकीस अडथळा निर्माण करू नये, रस्त्यात उभे राहू नये. या सूचनांचे पालन न करणाऱ्या प्रतिनिधींचे प्रवेश पास जप्त करण्यात येतील.

### महासागरच्या बातमीचीही मोठी चर्चा

दैनिक महासागरच्या रविवार ९ मार्चच्या अंकात प्रकाशित वृत्तात विरोधक आणि सत्ताधारी आमदारांकडून पायऱ्यांवरील आंदोलनाविषयी फटके लावण्यात आले होते. मात्र, आजच्या बैठकीत पायऱ्यांवरच्या आंदोलनाविषयी कोणताच निर्णय घेतला गेला नाही. याचाच अर्थ आमदारांना पायऱ्यांवर कब्जा करण्यास मुभा देण्यात आली. उलट माध्यमांवर मात्र निर्बंध लादले गेले. महासागरच्या या बातमीची मात्र विधानभवन परिसरात मोठी चर्चा होती.


महासागर
पायऱ्यांवरील आंदोलनाचा बिनडोक, प्रसिद्धीलोलुप तमाशा
महाराष्ट्रात कधी बंद होणार?

मीडियासाठी नवीन स्टँडी आणि फलक लावण्यात आले असून, त्याद्वारे पत्रकार आणि छायाचित्रकारांना नियमांची आठवण करून दिली जात आहे.

काही पत्रकारांनी नियम न पाळल्यामुळे त्यांना तात्काळ समज देण्यात आली असून, भविष्यात नियमभंग झाल्यास कठोर कारवाई केली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी सरकारचा ठाम निर्णयः
विधान परिषदेचे उपसभापती यांनी स्पष्ट केले की, मीडियाचा सन्मान राखत त्यांच्या कार्यात अडथळा न आणता, सभागृहाच्या प्रतिष्ठेला धक्का न पोहोचेल याची पूर्ण दक्षता घेतली जाणे आवश्यक आहे.

जर कोणत्याही प्रतिनिधीने या नियमांचे उल्लंघन केले, तर संबंधितांचे प्रवेश पास तात्काळ जप्त करण्यात येतील, असा प्रशासनाचा ठाम इशारा आहे.

**काहींनी केले स्वागत काहींनी चिंता व्यक्त केली**
काही वरिष्ठ पत्रकारांनी या निर्णयाचे स्वागत करताना विधान भवनातील कामकाजात अधिक शिस्त येईल, असे मत व्यक्त केले.

तर काही पत्रकारांनी मीडिया कव्हरेजसाठी लागू करण्यात आलेले निर्बंध कठोर असल्याची चिंता व्यक्त केली.

हा निर्णय घेतल्यामुळे विधान भवन परिसरात अधिक शिस्त आणि सुरक्षा राखली जाणार आहे. यामुळे सभागृहाचे कामकाज सुरळीत पार पडेल आणि सदस्यांना कोणत्याच प्रकारचा अडथळा न येता आपल्या जबाबदाऱ्या पार पाडता येतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# निवडणुकीच्या आधीच्या योजनांचा अर्थसंकल्पात अभाव : आ. रोहित पवार



■ **मुंबई** : राज्य सरकारने माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात सुरू केलेल्या काही महत्त्वाच्या योजनांचा या वर्षीच्या अर्थसंकल्पात उल्लेखही केला नाही. तसेच बेरोजगार तरुणांसाठी कोणतीही ठोस योजना जाहीर करण्यात आलेली नाही, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे.

वयोवृद्धांसाठी तीर्थस्थळ दर्शन योजना केवळ निवडणुकीच्या तोंडावर जाहीर करण्यात आली होती का? असा सवाल करत, या योजनेसाठी निधीची तरतूद न करता सरकारने निव्वळ आश्वासने दिल्याचा आरोप त्यांनी केला.

यासोबतच बेरोजगार तरुणांसाठी सरकारने कोणतेही नवीन प्रकल्प वा योजना जाहीर न केल्याने युवा वर्गाची मोठी निराशा झाल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. ‘महागाई आणि वाढत्या बेरोजगारीच्या काळात रोजगार निर्मितीसाठी ठोस पावले उचलणे आवश्यक होते. मात्र, उद्योग, स्टार्टअप्स किंवा रोजगार निर्मितीबाबत कोणताही स्पष्ट प्रस्ताव अर्थसंकल्पात दिसत नाही, असे ते म्हणाले. राज्य सरकार केवळ घोषणाबाजी करत असून प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी कोणतेही ठोस पाऊल उचलत नाही, असा आरोप करत आगामी अधिवेशनात यावर जाब विचारला जाईल, असेही रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

# नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती

■ **मुंबई** : महाराष्ट्र शासनाने महत्त्वाच्या प्रशासकीय पदांवर बदल करत तीन आयएएस अधिकाऱ्यांच्या नव्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.

हाफकिन बायो-फार्माचे नवे व्यवस्थापकीय संचालक मकरंद देशमुख मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग या पदावर कार्यरत असलेले मकरंद देशमुख यांची व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फार्मा कॉर्पोरेशन, मुंबई या पदावर बदली करण्यात आली आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला नवा मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबुडकर यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर या पदावर कार्यरत असलेले विकास मीना यांची जिल्हाधिकारी, यवतमाळ या पदावर बदली करण्यात आली आहे.

# गँगस्टर अमन साहू चकमकीत ठार

■ **रांची** : झारखंडमधील सर्वात मोठ्या गुंडांपैकी एक असलेल्या अमन साहूला मारण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तो पोलिस चकमकीत मारला गेला आहे. मंगळवारी त्याला पोलिस रिमांडवर रायपूरहून रांचीला आणले जात होते. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पलामू येथे पोलिसांच्या वाहनाला अपघात झाला.

अमन साहूने याचा फायदा घेतला. तो सैनिकाची रायफल हिसकावून पळून जाण्याचा प्रयत्न करत होता. पोलिसांनी त्याला थांबवताच त्याने गोळीबार केला. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या प्रत्युत्तराच्या कारवाईत तो मारला गेला. या चकमकीत एक सैनिक जखमी झाल्याचे वृत्त आहे. तथापि, अद्याप याची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

गेल्या शुक्रवारी आणि शनिवारी झारखंडमध्ये दोन मोठ्या घटना घडल्या. पहिली घटना शुक्रवारी राजधानी रांचीमध्ये घडली, जिथे कोळसा व्यापारी विपिन मिश्रा यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. दुसरी घटना हजारीबागमध्ये घडली, जिथे एनटीपीसीच्या डीजीएमची हत्या करण्यात आली. पोलिसांना या दोन्ही घटनांमध्ये साम्य दिसत होते. कुख्यात गुन्हेगार अमन साहू याने कोळसा व्यावसायिक विपिन मिश्रा यांच्यावर गोळीबार करण्याची जबाबदारी घेतली होती. या दोन्ही घटनांबाबत झारखंड पोलिसांना अमन साहू यांची चौकशी करायची होती. छत्तीसगडच्या रायपूर तुरुंगात असलेल्या अमन साहूला पोलिस कोठडीत रांचीला आणले जात होते.

झारखंड पोलिसांसाठी अमन साहू आणि त्याची टोळी हे सर्वात मोठे आव्हान राहिले. कोळसा व्यापारी, वाहतूकदार, कंत्राटदार, रिअल इस्टेट व्यावसायिक आणि बांधकाम व्यावसायिक हे नेहमीच या टोळीचे लक्ष्य होते. तो त्यांच्याकडून सतत पैसे वसूल करत होता. तो आज्ञा न मानणाऱ्यांवर उघडपणे गोळ्या झाडत होता. घटनेनंतर लगेचच, टोळीचे सदस्य सोशल मीडियावर पोस्ट करायचे आणि व्हर्च्युअल नंबरद्वारे मीडियाला माहिती द्यायचे की ही घटना त्यांच्याच टोळीने घडवून आणली आहे.

# सत्ताधाऱ्यांचा मराठवाड्यावर अन्याय

## वॉटरग्रीड योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूद नाही : अंबादास दानवे यांची टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** राज्याच्या 2025-26 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पात मराठवाडा वॉटरग्रीड योजनेसाठी काहीच तरतूद करण्यात आलेली नाही. सत्ताधाऱ्यांचे मराठवाड्यावर हे अन्यायकारक धोरण असल्याची टीका राज्याचे विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. विरोधी पक्षनेत्याच्या 260 अन्वये प्रस्तावावर ते आपली भूमिका मांडत होते.

सत्ताधारी पक्षाने मराठवाडा वॉटरग्रीड योजनेची घोषणा फक्त कागदावरच ठेवली असून तिच्या पूर्ततेसाठी प्रत्यक्षात यासाठी काहीच निधी देण्यात आला नाही. पश्चिम वाहिन्यातीलील समुद्रात जाणारे 23 ळटउ पाणी मराठवाड्याला देण्याचे आश्वासन राज्य सरकारने दिले आहे. कोणाच्या चोरीचे पाणी मराठवाडा घेत नसून वाया जाणाऱ्या पाण्याद्वारे आम्ही आमची तहान भागवणार असल्याचे ते म्हणाले.

मराठवाड्याला हक्काचे पाणी कधी मिळेल? याची शाश्वती नाही. सत्ताधारी पक्ष वॉटरग्रीड योजनेबाबत खूप काही बोलत असले तरीही आतापर्यंत या योजनेची एक वीटही लागली नाही. 16 सप्टेंबर 2023 रोजी संभाजीनगर येथे पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत वॉटर ग्रीड योजनेबाबत मोठी घोषणा केली होती. त्या बैठकीत घोषित केलेल्या संपूर्ण घोषणांचा अर्थसंकल्पात राज्य शासनास विसर पडला असल्याची टिका अंबादास दानवे यांनी केली.



**जनता आणि शेतकऱ्यांवर अन्याय करणारे सरकार**

नांदेडमधील तेलंगणाच्या सीमेलगत असलेल्या लोकांनी तेलंगणात अनुदान अधिक मिळत असल्यामुळे ठिबक सिंचन योजनेची तेथून खरेदी केली. सरकारकडून शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने दुर्लक्ष केले जाते. मराठवाडा वॉटरग्रीड प्रकल्पाची अंमलबजावणी नाही. मातोश्री पाणंद रस्ता योजना मंजूर केली मात्र वाड्या वस्तीवर शेतकऱ्यांना जाण्यासाठी निधीची तरतूद केली नाही. हमीभाव खरेदी धोरण हे शेतकऱ्यांवर अन्याय करणारे आहे. असे म्हणत दानवे यांनी हे सरकार अन्याय करणारे असल्याची टीका केली.

राज्य शासनाच्या अंतर्गत येणाऱ्या मेरी संस्थेने मराठवाड्यातील 13 टक्के पाणी कपात करण्याचा अहवाल दिला आहे. समन्यायी पाणी वाटप धोरणानुसार नगर आणि नाशिक जिल्ह्यातून मराठवाड्याला पाणी सोडण्याची तरतूद आहे. हक्काचे पाणी आम्हाला मिळाले नाही, तर मराठवाड्यातील जनता यास विरोध करेल, अशी भावना व्यक्त करत शासनाची मेरी संस्था सुद्धा मराठवाड्यावर अन्याय करत असल्याचा गंभीर आरोप दानवे यांनी केला. मराठवाड्याला आवश्यक आणि मुबलक निधी मिळत नसल्याची येथील जनतेच्या मनात भावना निर्माण झाली असल्याची प्रतिक्रिया अंबादास दानवे यांनी दिली.

सर्वसामान्य जनता, शेतकरी यांची सरकारने दिशाभूल केली असून गुलाबी स्वप्नं दाखवत घोषणांचा मोठ्या प्रमाणात पाऊस सरकारने केल्याचा आरोप दानवे यांनी 260 अन्वये विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर बोलताना केला. या सरकारच्या काळात शेतकरी सुखी नाही त्यामुळे राज्य सुखी सुखी नाही. शेतमालाला हमीभाव देऊ, असे पंतप्रधानांचे आश्वासन होते मात्र हमीभाव तर नाहीच उत्पादनबाबत स्पष्टता नसल्याचे ते म्हणाले.

**पीक विम्यात घोटाळा**

मुंबई पुणे शहरी भागात राहणाऱ्या लोकांनी गावाकडील जमिनीवर विमा काढला आहे. देशाच्या व राज्याच्या कृषिमंत्री यांनी हा घोटाळा मान्य केला आहे. तांड्यावर 400 हेक्टर असताना 4 हजार हेक्टरचा विमा काढला गेला. परस्पर शेतकऱ्यांच्या नावावर विमा काढला जात आहे. सांगलीतील जत येथे एका शेतकऱ्याच्या नावावर पाच वेळा विमा उतरवला गेला.

अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे हिंगोली मध्ये गेल्या वर्षी एकाही शेतकऱ्याला पीक विमा मिळाला नाही, या जिल्ह्याला न्याय मिळाला पाहिजे अशी मागणी दानवे यांनी केली. पीक विमा योजनेचा गैरवापर होत असल्याचे आरोप त्यांनी केला.

मागेल त्याला शेततळे, ठिबक सिंचन, कृषिपंप आदी योजनांच्या घोषणा सरकारने केल्या. मात्र या योजनांसाठी ऑनलाइन अर्ज करतात शेतकऱ्यांचा अपेक्षा भंग होत असल्याचे दानवे म्हणाले.

# आनंदाचा शिधा आता दुःखाचा..

## निवडणूक जिंकण्यासाठी योजनेचे कुभांड रचले : काँग्रेसचा आरोप



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :** महायुती सरकारने आनंदाचा शिधा ही लोकप्रिय योजना गुंडाळली आहे. ही योजना एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना सुरू करण्यात आली होती. त्या माध्यमातून सणावारांना राज्यातील 1 कोटी 63 लाख लोकांना याचा लाभ मिळत होता. पण राज्यातील तिजोरीमध्ये असलेल्या खडखडाटामुळे ही योजना बंद करण्यात आल्याची चर्चा आहे. काँग्रेस नेते भाई जगताप यांनी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवत आनंदाचा शिधा आता दुःखाचा शिधा झाल्याचा आरोप केला आहे.

आनंदाचा शिधा योजनेच्या माध्यमातून दसरा, दिवाळी, गुढीपाडवा, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती आदी सणावारांच्या निमित्ताने 100 रुपयांमध्ये 5 वस्तू दिल्या जायच्या. पण अर्थमंत्री अजित पवारांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी कोणतीही आर्थिक तरतूद केली नाही. त्यामुळे ही योजना बंद झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

ही योजना का बंद झाली? त्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. पण या योजनेला लाडकी बहीण योजनेचा फटका बसल्याची चर्चा आहे. लाडकी बहीण योजनेला देण्यात आलेल्या निधीमुळे राज्याच्या तिजोरीमध्ये खडखडाट असून भविष्यातही अनेक योजनांना ब्रेक लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

काँग्रेस नेते भाई जगताप यांनी या मुद्यावरून सरकारवर टीकेची झोड उठवली. ते विधिमंडळ परिसरात पत्रकारांशी बोलताना म्हणाले, महाविकास आघाडी सरकारने गरीब, मध्यमवर्गीय व कामगारांना 10 रुपयांत भरपेट जेवण देण्याची योजना सुरू केली होती. ही योजना फार सुंदरपणे महाराष्ट्रात सुरू होती. पण या योजनेला अर्थसंकल्पात एकही पैसा देण्यात आला नाही. याचा अर्थ ही योजना बंद होईल.

एकनाथ शिंदे सरकारने आनंदाचा शिधा नामक योजना सुरू केली होती. त्यावेळी दिवाळीचा मुहूर्त साधून ही योजना सुरू केली. निवडणुकीच्या काळापुरता त्याचा उपयोग करून घेतला. निवडून आल्यानंतर आता आनंदाचा शिधा आता दुःखाचा शिधा झालाय. आणि म्हणून या लुटारू सरकारने मागील अडीच वर्षात महाराष्ट्राची तिजोरी लुटली.

आत्ताची परिस्थिती अशी आहे की, विकासकामे व इतर पूर्वापार चालत आलेल्या कामांना विशेषतः कष्टकऱ्यांशी निगडित असणाऱ्या योजनांना त्याला हरताळ फासला आहे. या योजनांसाठी पैसे शिल्लक नाहीत.

या सरकारने महिलांना 2100 रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. त्यांनी या योजनेचे कुभांड निवडणुका जिंकण्यासाठी रचल्याचे स्पष्ट होते. या लोकांनी पंतप्रधानांकडून मोठ्या घोषणा करायचे तेवढे शिकल्याचे जगताप म्हणाले.

# महारेलकडून दोन वर्षांत ३२ रेल्वे उड्डाणपुलांची बांधणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** महाराष्ट्रातील रेल्वे पायाभूत सुविधांचे आधुनिकरण आणि दळणवळण अधिक सुकर करण्यासाठी महारेलने (एमआरआयडीसी) विविध योजना आखल्या जात आहेत.

विशेष म्हणजे महारेलने अवघ्या दोन वर्षात संपूर्ण राज्यभरात ३२ रेल्वे उड्डाणपुलांची बांधणी करून ते नागरिकांच्या सेवेत उपलब्ध करण्याची कामगिरी केली आहे. येत्या वर्षभरात आणखी २५ उड्डाणपुलांचे बांधकाम करण्याचेही नियोजन महारेलने केले आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने लवकरच मुंबईतील रे रोड येथे बांधण्यात येणारा रेल्वे उड्डाणपूल मुंबईकरांसाठी खुला केला जाणार आहे.

रेल्वे वाहतुकीस अडथळा येऊ न देता महारेलने राज्यभरातील ३२ रेल्वे उड्डाणपूल बांधण्याची कामगिरी पार पाडली आहे. शासकीय मंजुरी प्राप्त करणे, तुळई स्थापनेसाठी वेळोवेळी रेल्वे ब्लॉक घेणे, कमीत कमी जागेत काम करण्याचे



आवाहन पेलत महारेलने हे रेल्वे उड्डाणपुलांचे बांधकाम पूर्ण केले आहे.

साधारणपणे एक उड्डाणपूल बांधण्यासाठी किमान पाच वर्षे लागतात. मात्र, महारेलने दोन वर्षात युद्धपातळीवर हे ३२ उड्डाणपूल बांधून नागरिकांसाठी खुले केले. स्थानिक यंत्रणांशी समन्वय साधण्यासाठी नागपूर, उमरेड, पुणे, नाशिक, कराड, दोडाईचा, भुसावळ, कल्याण, सोलापूर आणि नांदेड येथे क्षेत्रीय कार्यालये सुरू केली आहेत.

महानगरपालिकेने मुंबईतील ब्रिटिशकालीन व मोडकळीस आलेल्या पुलांच्या पुनर्बांधणीची जबाबदारी महारेलकडे सोपवली आहे. सद्यस्थितीला रे रोड येथील रेल्वे उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले आहे व लवकरच हा पूल मुंबईकरांसाठी खुला करण्याचा महारेलचा मानस आहे. दरम्यान, दादर, भायखळा, घाटकोपर येथील रेल्वे उड्डाणपुलाचे काम प्रगतीपथावर आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उड्डाणपुलांच्या बांधणीच्या कार्यवाहीला वेग देण्यात आला आहे.दरम्यान, राज्यभरात जवळपास २०० रेल्वे उड्डाणपुलांचे बांधकाम महारेलकडे सोपविण्यात आले आहे.

रेल्वे मंत्रालय, रेल्वे वाहतूक आणि आणि महामार्ग मंत्रालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्राचे नागरी विकास विभाग, मुंबई महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आदींच्या सहकार्यातून राज्यभरात रेल्वे उड्डाणपूल बांधण्यात येत आहेत.

नागपुरातील ब्रिटिशकालीन अजनी पूल पाडून त्याठिकाणी नवीन रेल्वे उड्डाणपूल बांधण्याचे काम महारेलमार्फत सुरु आहे. याशिवाय, मोमीनपुरा येथे रेल्वे उड्डाणपूल आणि नागपूरच्या मध्य व पूर्व भागात भुयारी मार्ग बांधण्याचे कामही महारेलने हाती घेतले असल्याची माहिती महारेलच्या वतिने देण्यात आली आहे.

# गौरव अहुजाची बीएमडब्ल्यू कार जप्त

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ११ :** येरवडयातील शास्त्रीनगर चौकात सार्वजनिक ठिकाणी बेदरकापणे वाहन चालवून व रस्त्याच्या मधोमध बीएमडब्ल्यु कार थांबवून वाहनाचा दरवाजा उघडा ठेवून, सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करून अश्लील वर्तन करणाऱ्या गौरव अहुजा( २५) आणि त्याचा साथीदार भाग्येश ओसवाल (२२) यास पोलिसांनी अटक केली.

गौरव हा कराड पोलिसांकडे हजर झाल्यानंतर पुण्यातील येरवडा पोलिसांनी त्याचा ताबा घेत अटक केली. यादरम्यान पोलीस कोठडीत त्याचा तपास करत असताना, पोलीसांनी कोल्हापूर जिल्ह्यात हातकणंगले येथील आंबपफाटा याठिकाणी गायकवाड पेट्रोल पंपच्या बाजूला लावली असल्याचे सांगितले. त्यानुसार आरोपीला पोलीसांनी सदर ठिकाणी घेऊन जात निळ्या रंगाची बीएमडब्ल्यु कार जप्त केली परंतु त्याची पुढील व मागील नंबरप्लेट गायब असल्याचे दिसून आले आहे.

तपास अधिकारी पोलीस निरीक्षक विजय ठाकर यांनी आरोपींना सोमवारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एन.एस.बारी यांच्या न्यायालयात हजर केले असता, सात दिवसांची पोलीस कोठडी मागणी सरकारी वकील योगेश कदम यांनी केली. परंतु न्यायालयाने भाग्येश ओसवाल यास न्यायालयीन कोठडी मंजूर केली तर गौरव अहुजाला एक दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे.

# त्यांच्यावर टांगती तलवार तयार करण्यात आली

## संजय राऊत यांचा आरोप



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये प्रवेश करणारे रवींद्र धंगेकर यांच्यावर अटकेची टांगती तलवार तयार करण्यात आली होती. त्यांच्या पत्नीला अटक होण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे त्यांनी पक्षांतर केले असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. पुण्यातील काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी नुकताच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. यावरून संजय राऊत यांनी भारतीय जनता पक्षावर निशाणा साधला.

अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्या पक्षात तसेच भाजपमध्ये जे प्रवेश होत आहेत, ते सरळ सरळ भीतीपोटी होत आहेत, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. स्वतः एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सर्व आमदारांनी त्याच भीतीपोटी पक्षांतर केलेले आहे. अजित पवार आणि त्यांच्या लोकांनी देखील त्याच भीतीपोटी पक्षांतर केले आहे. भारतीय जनता पक्षामध्ये आमचे जे लोक गेले ते देखील त्याच भीतीपोटी गेले असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला. एखाद्याने प्रवेश करावा म्हणून त्याची आर्थिक कोंडी केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

तसेच त्याच्यावर काही जुनी प्रकरणे असली तर त्याचा दबाव आणला जातो. अशी सिस्टिम पक्षांतराच्या मागे असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. रवींद्र धंगेकर हे खरोखर का गेले? हे त्यांनी ते मानत असलेल्या दैवताला स्मरुन सांगायला हवे, असे आव्हान देखील त्यांनी दिले.

**60 कोटींच्या जमिनीवरुन दबाव**

कसबा विधानसभा मतदारसंघांमध्ये एक जागा आहे. ती प्रतिभा रवींद्र धंगेकर आणि इतर पार्टनर यांच्या नावावर आहे. हा त्यांचा व्यवसायिक प्रश्न असला तरी त्या जागेची किंमत 60 कोटी असल्याचे बोलले जाते.

ही जागा त्यांनी विकासासाठी ताब्यात घेतल्यावर लोकसभा निवडणुकीच्या काळामध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने ही जागा वक्फ बोर्डाची अल्याचे सांगून काही मुस्लिमांना हाताशी धरून धंगेकर यांच्या विरुद्ध भाजपचे लोक कोर्टात गेले. त्यामुळे धंगेकर यांचे काम अडवण्यात आले आणि त्या कामाला स्थगिती देण्यात आली. या सर्व प्रकरणामुळे प्रतिभा धंगेकर यांच्यावर अटकेची टांगती तलवार निर्माण करण्यात आली. धंगेकर यांनी पक्ष सोडावा असे सर्व वातावरण तयार करण्यात आले, असे गंभीर आरोप राऊत यांनी केलेत.

# फडणवीस राज्याला लाभलेले कुशल नेतृत्व



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात शेतकरी केंद्रित धोरणे राबवली आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठवाडा वॉटर ग्रीड, नदीजोड प्रकल्प, सोलर फिडर, कर्जमाफी, एक रुपयात पीक विमा आणि नमो शेतकरी महासन्मान योजना यांसारख्या उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांना आधार मिळाला आहे. भाजपा गटनेते प्रविण दरेकर यांनी विधानसभेत कृषि विभागाच्या प्रस्तावावर भाष्य करताना ही माहिती दिली.

दरेकर म्हणाले की, राज्य सरकारने ई-पंचनामा, ई-फेरफार आणि कॉम्प्युटराईज्ड सातबारा उताऱ्यामुळे शेतकऱ्यांसाठी प्रक्रिया सुलभ केली आहे. तसेच, सौरऊर्जेच्या मदतीने दिवसा वीज उपलब्ध करून देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी आणि नमो शेतकरी महासन्मान योजनेतून आर्थिक मदत मिळत आहे.

त्यांनी पीक विमा योजनेतील गैरव्यवहारांवर भाष्य करताना, दोषींवर कारवाई करून योजना अधिक पारदर्शक करण्याची मागणी केली. केंद्र सरकारने कृषि क्षेत्रासाठी १.२५ लाख कोटींची तरतूद केली असून महाराष्ट्राला मोठा वाटा मिळाला आहे. तसेच, सोयाबीन आणि कांद्याच्या दरांसाठी सरकारने निर्यात शुल्कात सवलत दिली आहे. कोकणातील शेतकऱ्यांसाठीही त्यांनी विविध मागण्या मांडल्या.

काजू उत्पादकांना अनुदान देताना हिस्सेदारांच्या संमतीची अट काढून टाकावी, काजू बीला हमीभाव द्यावा आणि कोचीनच्या काजू संचालनालयाचे कार्यालय कोकणात स्थापन करावे, अशी मागणी त्यांनी केली.

त्यांनी कोकण रेल्वेच्या भारतीय रेल्वेत विलीनीकरणाची गरज अधोरेखित केली, तसेच रायगड किल्ल्यासाठी पाणीपुरवठा योजना राबवावी, कोकणातील पर्यटन रस्ते सुधारावेत आणि मत्स्य व्यवसायासाठी अनधिकृत पर्ससीन नौकांवर बंदी घालावी, अशीही मागणी केली.

# मटणावरून नवा वाद !



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :** महाराष्ट्रात महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर राज्यातील राजकारण अधिक तापले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर करताना विकसित भारत - विकसित महाराष्ट्र अशी घोषणा दिली, पण दुसरीकडे राज्यातील सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये हिंदूंनी मटण कुठून खरेदी करावे यावरून नवीन वाद निर्माण झाला आहे.

महायुती सरकारमधील मंत्री नितेश राणे यांनी हिंदूंनी ठराविक दुकानांमधूनच मटण विकत घ्यावे, असे मत व्यक्त केले. त्यांच्या मते, असे केल्यास हिंदू तरुणांना रोजगाराच्या संधी मिळतील आणि मटण विश्वसनीय असेल. त्यांच्या या विधानामुळे विरोधकांनी तीव्र प्रतिक्रिया देत सरकारवर निशाणा साधला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या मुद्द्यावर प्रतिक्रिया देताना म्हटले, ‘हलाल म्हणजे कायदेशीर. झटका ही पद्धत पंजाबमधील शीख समुदायात वापरली जाते. आजवर हिंदू-मुस्लिम एकत्र मटण विकत घेत होते, मग अचानक हा वाद कशासाठी? लोकांच्या अन्नावर बंधन आणण्याचा अधिकार कोणाला दिला?

ते पुढे म्हणाले, आजपर्यंत कसाई आणि खाटीक एकत्र व्यवसाय करत होते. शांतपणे सुरू असलेली प्रथा मोडून सामाजिक तेढ निर्माण करणे योग्य नाही. रोजंदारीवर जगणा?या सामान्य विक्रेत्यांना यामुळे फटका बसणार आहे.

या संपूर्ण मुद्द्यावरून विधान भवन परिसरात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये शाब्दिक चकमक पहायला मिळाली. महाराष्ट्रातील राजकारणाला वेगळे वळण मिळवून देणाऱ्या या वादामुळे येत्या काळात आणखी मोठी राजकीय धुसफूस होण्याची शक्यता आहे.

## हलाल, झटका, मल्हार हे काय लावलंय ?



हलाल, झटका, मल्हार हे काय लावलंय महाराष्ट्रात. खाण्यावरुनही आता हिंदू झमुसलमान करण्याचा हा वाद आहे. मला सांगा तुम्ही मच्छी कशी खाणार? हलाल, हराम की मल्हार? असा सवाल शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, राज्याचे मत्स आणि बंदर विकास मंत्री नीतेश राणे यांनी हिंदू मल्हार सर्टिफिकेट असलेल्या दुकानातूनच मटन खरेदी करा, असा आदेश काढला, पण त्यांनी हिंदू खाटीक किती उरले आहेत याबद्दल माहिती आहे का, असा खोचक सवाल आव्हाडांनी उपस्थित केला आहे.

**सांगणारे तुम्ही कोण?**

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, कोणी कसे खावे, काय खावे हे सांगणारे तुम्ही कोण आहात.इस्लाममध्येच त्याला असे म्हटले आहे की, ते लॉफुल आहे. हे तुम्हाला समजून घ्यायचे नाही तर कापा डायरेक्ट आणि शिजवा तुम्हाला कोण विचारणार आहे. मी मटण घेण्यासाठी जात नाही पण मला जिथून मटण घ्यायचे आहे तिथूनच घेणार.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, रुग्णवाहिका कधीच रस्त्यावर आल्या नाहीत. तुम्ही 108 ला फोन लावून बघा की रुग्णवाहिका येते का? सगळा सावळा गोंधळ माजला आहे. राज्यामध्ये सरकार अस्तित्वात नाही.

**देशमुखांच्या हत्येमागे कराडच**

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, संतोष देशमुख हत्या प्रकरणी जेव्हा कुणीही बोलत नव्हते तेव्हा मी त्या विषयावर बोलत होतो. तेव्हाच सांगितले होते की या हत्येमागे वाल्मीक कराडच आहे.

खोक्या-बोक्या टोक्या यांचे मला काही देणं घेणं नाही. पण एका मराठी वृत्तवाहिनीला मुलाखत देतो आणि पोलिसांना मिळत नाही, हे त्यांची आप घालवण्याचा प्रकार आहे. गुप्तहेर यंत्रणेबद्दल काय बोलणार. कराड कुठे राहिला ते रिसॉर्ट अनाधिकृत असल्याचेही आव्हाड म्हणाले.

# मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग मिसिंग लिंकचे ९३ टक्के काम पूर्ण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावरील खोपोली - कुसगावदरम्यान १९.८० किमी लांबीच्या नवीन मार्गिकेचे (मिसिंग लिंक) काम हाती घेतले आहे.

आतापर्यंत या प्रकल्पाचे ९३ टक्के काम पूर्ण झाले असून आता कामाला वेग देण्यात आला आहे. उर्वरित काम ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी सोमवारी दिली. हा महामार्ग वाहतूक सेवेत दाखल झाल्यास मुंबई - पुणे प्रवासाचे अंतर २० ते २५ मिनिटांनी कमी होणार आहे.

सहा पदरी मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावरून आजघडीला लाखो वाहने धावत असून हा महामार्ग आता अपुरा पडू लागला आहे. दुसरीकडे अपघातांची संख्याही वाढत आहे. या पार्श्वभूमीवर एमएसआरडीसीने महामार्गाच्या आठ पदरीकरणासह खोपोली झ्र कुसगावदरम्यान १९.८० किमी लांबीची



नवीन मार्गिका बांधण्याचा निर्णय घेतला.

या प्रकल्पाच्या कामास २०१९ मध्ये दोन टप्प्यात सुरुवात करण्यात आली. पहिल्या टप्प्याचे काम मे. नवयुग इंजिनीअरिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेडला, तर दुस?या टप्प्याचे काम मे. एफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला देण्यात आले. हे काम आतापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र आव्हानात्मक काम असल्याने आणि काही तांत्रिक अडचणी आल्याने प्रकल्पास विलंब झाला असून आजही या प्रकल्पाचे काम सुरू आहे. आता या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

आतापर्यंत या प्रकल्पाचे ९३ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन आहे. दरम्यान, आगामी वषार्चा अर्थसंकल्प सादर करताना अजित पवार यांनी या प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी ऑगस्टचा मुहूर्त जाहीर केला. हा प्रकल्प ऑगस्टमध्ये वाहतूक सेवेत दाखल होण्याची शक्यता आहे. मुंबई झ्र पुणे प्रवास ऑगस्टपासून आणखी सुसाट आणि सुकर होण्यास मदत होणार आहे.

माहितीनुसार, या प्रकल्पातील ९३ टक्के काम पूर्ण झाले असून आता केवळ केबल स्टे पुलाचे काम शिल्लक आहे. या प्रकल्पातील १.७५ किमीच्या एक आणि ८.९२ किमीच्या दुसऱ्या अशा दोन्ही बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे.

दरम्यान, ८.९२ किमी लांबीचा बोगदा आशियातील सर्वात रुंद, डोंगराखालून आणि तलावाखालून जाणारा बोगदा आहे. लोणावळा तलावाच्या तळाखाली जवळपास ५०० ते ६०० फूट अंतरावर हा बोगदा आहे. बोगद्याची रुंदी २३.७५ मीटर आहे. जगातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या बोगद्याचे काम करण्यात येत आहे. प्रवासी, वाहनांच्याच्या सुरक्षेचा बारकाईने विचार करून हा बोगदा बांधण्यात येत आहे.

आपत्कालीन परिस्थितीत बाहेर जाण्यासाठी प्रत्येक ३०० मीटरवर मार्ग तयार करण्यात आले आहेत. एकूणच अभियांत्रिकीदृष्ट्या अवघड आणि आव्हानात्मक अशा बोगद्यांची कामे पूर्ण झाली आहेत. तर पथकर नाक्यांच्या विस्तारीकरणासह अन्य कामे मार्गी लागली आहेत. आता केबल स्टे पुलाच्या कामाला वेग देण्यात आला आहे.

# भरधाव ट्रकने बडनेरा येथील तरुणाला चिरडले

## चालक घटनास्थळावरून पसार






**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 11)-** बडनेरा जुना बायपास मार्गावर मंगळवारी (दि.11) बघिया हॉटेल समोर भरधाव ट्रक ने एका दुचाकी स्वाराला चिरडले. मृत तरुणाचे नाव सय्यद अरमान अली सय्यद इमान अली (वय 35) असे आहे.

सविस्तर वृत्त असे आहे की, गवळीपुरा येथील रहिवासी तरूण मंगळवारी सकाळी बडनेरा येथून एमआयडीसीमध्ये कामावर जात होता. दरम्यान, समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या वीर हनुमान कन्स्ट्रक्शन कंपनीच्या ट्रकने त्याच्या दुचकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीसह तरूण ट्रकखाली आला. ज्यामुळे तरुणाचा जागीच मृत्यू झाला. मृत तरूण त्यांच्या दैनंदिन कामासाठी त्यांच्या दुचाकी क्रमांक रू॥-27 एएक्स-8838 ने एमआयडीसीला जात होता, त्याचवेळी समोरून वीर हनुमान कन्स्ट्रक्शन कंपनीचा ट्रक क्रमांक एमएच-27 एक्स 8879 भरधाव वेगाने येत होता. अपघातात चिरडल्यामुळे तरुणाचा जागीच मृत्यू झाला. अपघात होताच बघ्यांची मोठी गर्दि घटनास्थळी झाली होती. दरम्यान ट्रकचा चालक घटनास्थळावरून पळून गेला. जमावाने ट्रक जाळण्याचाही प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. मागील काही दिवसांपासून बायपास मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढत आहे. दरम्यान आज झालेल्या अपघातामुळे बडनेरा येथील तरुणाच्या घरातच नव्हे तर संपूर्ण शहरात शोककळा पसरली आहे. घटनेचा पंचनामा केल्यानंतर पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.




## विभागस्तरीय गुंतवणूक शिखर परिषद

### उद्योजकांसोबत 32 सामंजस्य करार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 11)** उद्योग क्षेत्रामध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी गुंतवणूकदार व व्यवसायांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विभागस्तरीय गुंतवणूक शिखर परिषद हॉटेल ग्रँड महफिल येथे मंगळवारी (दि.11) संपन्न झाली. विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, विकास आयुक्त (उद्योग) दीपेंद्र सिंह खुशवाह, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर, विभागीय कार्यालयाचे उद्योग सहसंचालक निलेश निकम यावेळी उपस्थित होते. विभागीय आयुक्त सिंघल तसेच जिल्हाधिकारी कटियार यांच्या हस्ते यावेळी उद्योजकांसमवेत 32 सामंजस्य करार करण्यात आले. गुंतवणूक शिखर परिषदेत जिल्ह्यातील प्रमुख उद्योग क्षेत्राबाबत नवउद्योजकांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. आपल्या जिल्ह्याची बलस्थाने ओळखून गुंतवणूकीच्या नवनवीन संधी शोधा. उद्योग क्षेत्राच्या भरभराटीसाठी अमरावती जिल्ह्याचे वातावरण, येथील भौगोलिक परिस्थिती, दळणवळणाची साधने पूरक आहेत. या बाबींचा लाभ घ्या.अन्य क्षमता असलेल्या क्षेत्रांमधील गुंतवणूक व व्यवसाय संधीबाबत माहिती घ्या व उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी पुढाकार घ्या. उद्योजकांना जेथे निकड आहे, तेथे प्रशासन मदतीसाठी तत्पर असल्याचे विभागीय आयुक्त यावेळी बोलतांना सिंघल म्हणाल्या. अमरावती जिल्हा हा ट्रेडिंग हब म्हणून उदयास यावा यासाठी प्रशासन विविध उपक्रम राबवित आहेत.

येथील टेक्सटाइल पार्क ही जिल्ह्याची ओळख आहे. सर्व गुंतवणूकदारांना आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यासाठी प्रशासन कटिबध्द आहे. जिल्ह्यांना विकासाचा केंद्रबिंदू मानून जिल्ह्यांच्या व राज्याच्या विकासाला चालना देण्याचा परिषदेचा उद्देश आहे. नवोद्योजकांनी याचे महत्त्व जाणून गुंतवणुकीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कटियार यांनी केले.

## गोंडी हत्याकांडातील दोन आरोपींना अटक



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती (दि. 11)-** वडाळी येथील दिव्य सदन केंद्रामागे 4 मार्च रोजी कुख्यात ऋषिकेश उर्फ गोंडी उमेश मोडक याची धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली होती. या हत्ये प्रकरणी पोलिसांनी मंगळवारी (दि.11) दोन आरोपींना कर्नाटकातील मंगळूर येथून अटक केली. बुधवारी (दि.12) पोलीस आरोपींना घेऊन अमरावतीत पोहोचणार असल्याची माहिती आहे. विजय तंट्या भोसले व अन्य एका आरोपीचा यात समावेश आहे.

ऋषिकेश आणि अक्षय वासनिक हे 4 मार्च रोजी दुचाकीवरून वडाळीकडे जात होते. यावेळी ते दिव्य सदन केंद्राजवळ थांबले. येथे आरोपी विजय तंट्या भोसले, अतुल भोसले आणि भुर्या (तिघेही रा. पारधी बेडा, वडाळी) यांनी ऋषिकेशवर धारदार शस्त्राने वार केले होते. ज्यामध्ये गोंडीचा मृत्यू झाला होता. फ्रेजरपुरा पोलिसांना घटनेची माहिती मिळताच एक पथक घटनास्थळी पोहोचले. घटना स्थळाचा पंचनामा केल्यानंतर गोंडीचा मृतदेह शवविच्छेदना साठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. पोलिसांनी अक्षय याला रात्री उशिरा ताब्यात घेतले. दोन दिवसांपूर्वी झालेल्या वादातून ही हत्या झाल्याचे त्याने सांगितले. अक्षय वासनिक याच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी तिन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. या प्रकरणी आठवडाभरानंतर पोलिसांनी आरोपी विजय भोसले व अन्य एकाला कर्नाटकातील मंगळूर येथून अटक केली. ज्यांना बुधवारी पोलीस अमरावतीत आणणार आहे.

## श्याम नगर येथील कॅफेमध्ये सिलेंडरचा स्फोट

### लाखोंचे नुकसान, परिसरामध्ये गोंधळ




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 11)** शहरातील श्याम नगर येथील कॅफे 705 मध्ये मंगळवारी दुपारी 4.30 वाजता सिलेंडरचा स्फोट झाल्याने आग लागली. त्यामुळे स्वयंपाकी आणि तिथे काम करणारे इतर लोक कॅफे सोडून गेले. काही वेळातच आगीने उग्र रूप धारण केले. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन विभागाने तत्काळ घटनास्थळ गाठून आगीवर अर्ध्या तासात आग आटोक्यात आणली.

सविता प्रदीप पवार ह्या श्याम नगरमध्ये कॅफे 705 चालवतात. येथील स्वयंपाक्याने मंगळवारी दुपारी साडेचार वाजता ऑर्डर केलेला केक बनविण्याचे काम सुरू केले. मात्र यावेळी अचानक सिलिंडरने पेट घेतला. आग दिसताच कुक आणि कॅफेमधील इतर लोक बाहेर आले. काही वेळातच आगीने उग्र रूप धारण केले. या आगीच्या घटनेत दोन फ्रीज, ओव्हन मशीन आणि मिक्सर सिलिंडरचे नुकसान झाले आहे. आगीमुळे कॅफेमधील पीओपी सिलिंग पूर्णपणे तुटून खाली पडले. आगीच्या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती सविता पवार यांनी दिली. कॅफेला आग लागल्याचे वृत्त पसरताच घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली. अग्निशमन दलाला याची माहिती मिळताच दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अर्ध्या तासात आग आटोक्यात आणण्यात आली. दोन महिन्यांपूर्वीच हा कॅफे सुरू केल्याची माहिती संचालकाने दिली.

## नितेश मेश्राम मृत्यू प्रकरणी एसआयटी चौकशीची शिफारस

### उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांची माहिती



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 11) -** चांदूर रेल्वे येथील नितेश मेश्राम याच्या मृत्यूप्रकरणी विशेष तपास पथक स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस करण्यात येणार असल्याची माहिती अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी (दि.11) अमरावती येथे दिली.

यावेळी सहायक आयुक्त समाज कल्याण राजेंद्र जाधवर यांच्यासह पोलिस विभागाचे अधिकारी उपस्थित होते. ॲड. मेश्राम यांनी नितेश मेश्राम यांच्या मृत्यूबाबत पोलिस विभागाशी चर्चा केली. आयोगाकडे तक्रार आल्यानंतर याप्रकरणी चौकशी करण्यात आली. तसेच डॉक्टर, सुरक्षा रक्षक, बाह्यरूग्ण विभागातील कर्मचारी यांचे बयाण घेण्यात आले आहे. यात प्रामुख्याने 10 जून रोजी अटक करण्यात आल्यानंतर 13 जून रोजी रूग्णालयात मृत्यू झाला आहे. याबाबत 13 जानेवारी रोजी तक्रार आल्यानंतर 27 जानेवारी आणि 17 फेब्रुवारी रोजी नागपूर येथे बैठक घेण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी तपासात निष्काळजीपणा केल्याने गुन्हे दाखल करावे, तसेच अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.पिडीताच्या कुटुंबियांना मदत व्हावी यासाठी शासकीय योजनेतून नियमानुसार शेतजमीन देण्यात यावी. तसेच कुटुंबियातील एकाला शासकीय नोकरीत सामावून घेण्याची शिफारस करण्यात आली आहे. पोलिसांनी केलेली कार्यवाही आणि बयानात तफावत आढळून आली आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून भारतीय पोलिस सेवेतील अधिकाऱ्याकडून यप्रकरणी निष्पक्ष चौकशी करण्यात येणार आहे, असे ॲड. मेश्राम यांनी सांगितले.

## अवैध वाळूने भरलेल्या मिनी ट्रकची कापूस वाहतूक करणाऱ्या ट्रॉलीला धडक

### एकाचा मृत्यू, तर एक गंभीर जखमी

### खोलापूर जवळील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, (दि.11)-** दर्यापूर ते अमरावती मार्गावर भरधाव वेगाने जाणाऱ्या अवैध वाळूने भरलेल्या मिनी ट्रकने ट्रॅक्टर ट्रॉलीला जबर धडक दिली, यात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर एकजण गंभीर जखमी झाला ही घटना काल सोमवार 10 मार्च रोजी सायंकाळी 7 वाजता सुमारास घडली.

खोलापूर वरून अवैध वाळूने भरलेला मिनी ट्रक अमरावतीकडे जात होता. त्याच्या समोरच कापसाने भरलेला शेतकऱ्यांचा ट्रॅक्टर ट्रॉलीसह अमरावतीकडे जात असतांना मागे असलेल्या अवैध वाळू घेऊन जाणाऱ्या भरधाव मिनी ट्रकने जबरदस्त धडक दिली.

या धडकेत सदर वाहने दोन्हीही रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाले. या भीषण अपघातात ट्रॅक्टर- ट्रॉली व अवैध वाळूने भरलेला ट्रक या दोन्ही वाहनांचा चुराडा झाला. ट्रॅक्टर चालक राजु रमेश गोळे (वय 50, रा. कोल्हा, ता अचलपूर) यांचा कापसाखाली दबून मृत्यू झाला. घटनेची माहिती खोलापूर पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून घटनेचा पंचनामा केला. मिनी ट्रक चालक ऐसान खान लुकमान खान (वय 26 रा.खोलापूर )असे अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या आरोपी चालकाचे नाव आहे. ऐसान खानविरुद्ध कलम 106 बी एन एस प्रमाणे खोलापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, अमरावती

**जिल्हा जलसंधारण अधिकारी, जि.प. (ल.पा.) विभाग कैम्प, अमरावती**
**ई-मेल. eeizpamt@gmail.com**

### निविदा सुचना क्रमांक ०७/२०२४-२५

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत जिल्हा जलसंधारण अधिकारी, जि.प. (ल.पा.) विभाग, अमरावती हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदे बाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व या कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निविदा समिती, जिल्हा परिषद, अमरावती यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | जिल्हा |
|---|---|---|
| १ | जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत एकुण ११ कामे | अमरावती |

**निविदा उपलब्ध कालावधी :-** दि. १२/०३/२०२५ ते दि. १८/०३/२०२५ (८ दिवस)

**निविदा उघडण्याचा दिनांक :-** दि. १९/०३/२०२५

**स्वा.**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**जिल्हा परिषद, अमरावती**

**स्वा.**
**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, अमरावती**


## होळी दहन, धुळवडीसाठी मोकळ्या मैदानाचा वापर करा!

### रंगोत्सव साजरा करा पण जरा जपून | महावितरणचे आवाहन



#### हे लक्षात ठेवा

- वीज वितरण यंत्रणेपासून लांब अंतरावर होळी पेटवा
- होळी आणतांना तीचा स्पर्श वीज वाहिन्यांना होऊ नये
- वीज वाहिन्या, वितरण रोहीत्रांवर पाणी फ़ेकू नका
- ओल्या शरीराने वीज उपकरणांना स्पर्शकरू नका
- वीज खांबासभोवती पाण्याचा निचरा करु नका

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती (दि.11) -** होळीच्या उत्सवाला विजेच्या अपघाताने गालबोट लागू नये यासाठी होळी पेटवितांना संभाव्य अपघात टाळण्याकरिता आवश्यक ती खबरदारी घेत होळीचा आनंद व्दिगुणित करण्याचे आवाहन महावितरण अमरावती परिमंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

होळी पेटवितांना सभोवताली वीजवाहिन्या किंवा वितरण रोहीत्रे नाहीत याची खातरजमा करून घ्या, अन्यथा होळीच्या ज्वाळांनी वीजवाहिन्या वितळून जीवंत तार खाली पडून भिषण अपघात होण्याची शक्यता असते. याशिवाय अनेक ठिकाणी वीजवाहिन्या हया भुमिगत असल्याने, त्यापासून लांब अंतरावरच होळी पेटवावी जेणेकरून होळीच्या उष्णतेपासून भुमिगत वीजवाहिन्या सुरक्षित राहतील, होळी पेटवितांना शक्यतो मोकळ्या जागेचा वापर करा, ट्रक किंवा इतर वाहनांतून होळी आणतांना होळीचा स्पर्श रस्त्यालगतच्या वीजवाहिन्यांना होणार नाही याची खबरदारी घ्या, विजेचे अपघात हे प्राणघातक असल्याने एक चूकही प्राणांतीक अपघातास कारणीभूत ठरू शकते. त्याचप्रमाणे रंगोत्सव साजरा करतांना पाण्याचे फवारे वीज वाहिन्यापर्यत उडणार नाही याची काळजी घ्या. रंग भरलेले फुगे फेकतांना ते विजेचे खांब आणि वीज वाहिन्या यांना लागणार नाही याची खबरदारी घ्या. वीज वितरण यंत्रणेचे रोहीत्रे व तत्सम वितरण उपकरणे बसविलेल्या जागेपासून लांब अंतारावरच रंग खेळा. रंग खेळतांना ओल्याचिंब शरीराने वीज खांबाला स्पर्श झाल्यास अपघाताचा संभाव्य धोका असल्याने विजेचा खांबांना स्पर्श करू नका. विजेच्या खांबासभोवती पाण्याचा निचरा होणार नाही याची खबरदारी घ्या. घरात होळी खेळतांना वीज मिटर, विजेचे प्लग, वीज तारा आणि वीज उपकरणांचा पाण्यापासून बचाव करा, ओल्या हाताने वीजेच्या बटनांना स्पर्श करू नका. होळीचा सण हा आनंदाचा रंगोत्सव असल्याने महावितरणच्या आवाहनाप्रमाणे खबरदारी घेऊन होळीचा आनंद व्दिगुणित करण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

#### या ठिकाणी कॉल करा

वीज यंत्रणेला आग लागणे , किंवा वीज अपघातासारखे काही अनेपेक्षीत प्रकार घडल्यास तात्काळ महावितरणच्या 18002123435/ 18002333435 या टोल फ्रि क्रमांकावर . तसेच अमरावती जिल्हयाकरीता असलेल्या 7875763873 व यवतमाळ जिल्हयाकरीता उपलब्ध असलेल्या 7875763099 या 24 तास सुरू राहणाऱ्या दैनंदिन सनियंत्रण कक्षाच्या नंबरवर कॉल करून तात्काळ माहिती देण्याचे आवाहन महावितरण अमरावती परिमंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# ते अतिक्रमण तातडीने काढण्याचे मुख्याधिकाऱ्याचे आदेश

## नांदगावातील स्कूल ऑफ स्मार्ट किड्स ला दणका

**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर, (दि.11)** - शहरांतर्गत स्कूल ऑफ स्मार्ट किड्स या शाळेने मागील सात वर्षापासून शासकीय रस्त्यावर वर्गखोलीचे बांधकाम करून अतिक्रमण केले आहे व अवैधरित्या, कुठलीही परवानगी न घेता संस्थेने शाळेचे बांधकाम केले आहे. वारंवार नगर पंचायत ने सूचना देऊनही संस्थाचालकांच्या मनमानी कारभारामुळे व राजकीय वरदहस्तामुळे हे अतिक्रमण व अवैधरित्या केलेले बांधकाम जैसे थे स्थितीत असल्याने मुख्याधिकाऱ्यांनी हे अवैध बांधकाम तात्काळ हटवण्याचे आदेश दिले. त्यामुळे संस्थाचालकांच्या मनमानीला चाप बसल्याचे बोलले जात आहे.



प्राप्त माहितीनूसार सन 2018 मध्ये नांदगाव खंडेश्वर शहरात गुरुकुल एज्युकेशन सोसायटी द्वारा स्कूल ऑफ स्मार्ट किड्स या शाळेची स्थापना झाली. स्थापनेपासूनच या संस्थेने खंडेश्वर नगरी भाग दोन या कॉलनी अंतर्गत येत असलेल्या 12 मिटर शासकीय रस्त्यावर अतिक्रमण करून खोलीचे बांधकाम करून हा रस्ता पूर्णत: ताब्यात घेतला. त्यानंतर कॉलनीतील नागरिकांनी संस्थाचालकांना वारंवार या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यास तोंडी सांगितले, परंतु संस्थाचालकांनी दुर्लक्ष केले. अखेर कॉलनीतील नागरिकांनी स्थानिक प्रशासनाकडे तक्रार केली. त्यानंतर सन 2020 मध्ये तत्कालीन मुख्याधिकारी मीनाक्षी यादव यांनी संस्थाचालकांना नोटीस देऊन अतिक्रमण काढण्यास सांगितले. कोरोना सारख्या गंभीर परिस्थितीत या संस्थेचे सुरू असलेले अवैधरित्या सुरु असलेले बांधकाम थांबवण्यास सांगितले. मुजोर संस्थाचालकांनी अवैध बांधकाम सुरूच ठेवले. सन 2023 व सन 2024 मध्ये सुद्धा अवैधरित्या बांधकाम सुरूच ठेवले. कॉलनीतील नागरिक व नवीन लेआउट मधील प्लॉट धारकांनी यांनी मुख्याधिकारी निवृत्ती भालकर यांच्याकडे तक्रार दाखल केली. या तक्रारीची दखल घेत मुख्याधिकाऱ्यांनी 13 फेब्रुवारी 2025 रोजी नगररचना अधिनियम 1966 चे कलम 54 अंतर्गत अतिक्रमण काढण्याबाबत व शाळेचे बांधकाम संबंधी संपूर्ण कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले. परंतु या आदेशालाही न जुमानता स्कूल ऑफ स्मार्ट शाळेच्या संस्थाचालकांनी संस्थेचे बांधकाम सुरूच ठेवले व कुठलेही कागदपत्र प्रशासनाने दिलेल्या मुदतीत सादर केले नाही. त्यामुळे स्थानिक नगरपंचायत प्रशासनाने 6 मार्च 2025 रोजी संस्थेने कॉलनीतील मुख्य रस्त्यावर केलेल्या अतिक्रमण व संस्थेने केलेले बांधकाम नगररचना अधिनियम 1966 चे कलम 152 व 53 चे तरतुदीनुसार हे सर्व अवैध बांधकाम पाडून टाकण्याबाबत आदेश दिले. त्यामुळे गेल्या सात वर्षापासून सुरू असलेल्या स्कूल ऑफ स्मार्ट किड्स या शाळेच्या संस्थाचालकांच्या मनमानीला चाप बसला.

### नागरिकांनी केले मुख्याधिकाऱ्यांचे अभिनंदन

स्थानिक प्रशासनाने शाळेचे अतिक्रमण काढून रस्ता मोकळा करण्यासंदर्भात जे आदेश दिलेत त्या आदेशाचे आम्ही स्वागत करतो व अतिक्रमित असलेला रस्ता काढण्याबाबत ती कडकं भूमिका घेतली त्याबद्दल आम्ही मुख्याधिकाऱ्यांचे आभार मानतो असे स्थानिक रहिवासी पंकज मानतकर यांनी सांगितले. मागील सात वर्षापासून स्कूल ऑफ स्मार्ट किड्स शाळेच्या संस्थाचालकांची जी मनमानी आहे त्या मनमानी ला आता चाप बसला असून मुजोर संस्थाचालकांना जो प्रशासनाने दणका दिला त्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन करतो असे स्थानिक सामाजिक कार्यकर्ते श्याम शिंदे यांनी सांगितले.

# तिसरा टप्प्यात होणार अमरावतीच्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचा विस्तार

## 100 नवीन खाटा, 18.42 कोटींचा आराखडा मंजुरीसाठी सादर

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.11)** - अमरावतीच्या विभागीय संदर्भसेवा रुग्णालयाच्या (सुपर स्पेशालिटी) विस्तारीकरणाचा तिसरा टप्पा लवकरच सुरू होणार आहे. या टप्प्यात रुग्णालयाची क्षमता 200 वरून 320 खाटांपर्यंत वाढणार आहे. रुग्णालय प्रशासनाने तिसऱ्या टप्प्यासाठी 18 कोटी 42 लाख रुपयांचा सविस्तर आराखडा तयार केला आहे. या टप्प्यात पोटविकारांवरील उपचारांसाठी गॅस्ट्रो एन्टेरोलॉजी विभाग स्थापन केला जाणार आहे. त्याचबरोबर गुडघा, मांडी आणि कान यांच्याशी संबंधित इम्प्लांट शस्त्रक्रियासह इतर सुविधाही उपलब्ध होणार आहेत.




माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांच्या कार्यकाळात मंजूर झालेल्या या प्रकल्पाचे दोन टप्पे यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहेत. पहिल्या टप्प्यात युरोलॉजी, प्लास्टिक सर्जरी, नेफ्रोलॉजी, डायलेसिस युनिट आणि किडनी प्रत्यारोपणाच्या सुविधा सुरू करण्यात आल्या. दुसऱ्या टप्प्यात न्यूरोलॉजी शस्त्रक्रिया, ऑन्कोलॉजी शस्त्रक्रिया आणि इको विभाग कार्यान्वित करण्यात आला. वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांनी तयार केलेला प्रस्ताव आरोग्य महासंचालकांकडे पाठवला आहे. स्थानिक आमदार सुलभा खोडके या आरोग्य मंर्त्यांकडे या प्रस्तावाचा पाठपुरावा करत आहेत.

नवीन विस्तारासाठी जिल्हा स्त्री रुग्णालयाची जुनी इमारत आणि प्री-फॅब हॉस्पिटल जवळची मोकळी जागा वापरली जाणार आहे. या इमारतीच्या छतावर हेलिपॅडही उभारले जाणार आहे. नव्या प्रस्तावात गॅस्ट्रो एन्टेरोलॉजीसाठी 6 कोटी, विविध इम्प्लांट सर्जरीसाठी 7 कोटी आणि अत्याधुनिक उपकरणांसाठी उर्वरित निधीची तरतूद करण्यात आली आहे.

# मारोती जाधव यांचा शेतकरी दूत म्हणून गौरव

## बेड व आंतरपीक पद्धतीला दिली चालना




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.10)**- वातावरणातील बदल, पावसाचे बदललेले वेळापत्रक, कधी पावसाचा खंड तर कधी अतीवृष्टी अशा परिस्थितीत शेतकर्यांना शाश्वत उत्पादन व्हावे, या उद्देशाने बेड आंतरपीक व जोडओळ पध्दतीला चालना देण्यासाठी त्याचा प्रचार व प्रसिद्धी करणे आणि त्याद्वारे उत्पादन वाढविण्याकरिता शेतकर्यांना लागवडीस प्रोत्साहित केल्याबद्दल कृषि साहाय्यक मारोती जाधव यांना कृषि प्रचारक-शेतकर्योंचा दुत म्हणून गौरव करण्यात आला.

गावातच खरीप पुर्व सभांचे आयोजन करुन पीक पध्दतीनुसार लागवडीचे सुक्ष्म नियोजन, युवा व अनुभवी शेतकर्यांरच्या सहभागातून शिवार फेरीचे आयोजन, पीक स्पर्धा आयोजित करून अधिकचे व चांगले उत्पन्न घेणार्या शेतकर्यांचा उत्साह वाढविण्यासाठी बांधावरच सपत्नीक सत्कार असे उपक्रम मारोती जाधव यांनी सातत्याने राबविले. त्यातून प्रेरणा घेत शेतकर्यांनी 1500 एकाराहून अधिक क्षेत्रावर बेड व आंतरपीका बरोबरच जोडओळ पद्धतीने पिकांची लागवड केली आणि त्यांच्या उत्पादनात भर पडली. शेतकर्यांचे जिवनमान व विभागांची प्रतिमा उंचवण्यासाठी अनेक उपक्रम ते ग्रामस्तरावर राबवित असतात. या कार्याची दखल घेउनच जाधव यांना शेतकर्यांनचा दूत म्हणून प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने, जिल्हा अधिक्षक राहुल सातपुते व मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. नैसर्गिक शेतीस चालना, महिलांचा कृषि क्षेत्रात सहभाग वाढविण्यासाठी, गटांची स्थापना व शेतकर्यांचे अधिकचे उत्पन्न वाढावे यासाठी बांधावरच नवनवीन तंत्रज्ञानांची माहिती पोहचवण्यासाठी जाधव सदैव प्रयत्नशील असतात, असे तालुका कृषी अधिकारी प्रशांत गुल्हाने यांनी सांगितले.



# बेनोडा शहीदच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचा शुभारंभ

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, (दि.11)** - वरुड तालुक्यातील बेनोडा शहीद येथील बर्डी परिसरात धम्म सेवा संघाच्या वतीने विद्यार्थी आणि नागरिकांकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचा शुभारंभ करण्यात आला आहे. या वाचनालयाचे उद्घाटन बेनोडा शहीदच्या सरपंचा रजनी कुबडे यांच्या हस्ते सोमवारी दुपारी झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राध्यापक मनोहर बारमासे हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार विलास पाटील, उपसरपंच उत्तम पटोळे, ग्रामपंचायत सदस्य विशाखा दुपारे, पुष्पा वावरे, अशोक कुबडे उपस्थित होते. यावेळी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. लोकांमध्ये वाचनाची आवड कायम ठेवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना ज्ञानाचे दालन खुले करून देण्यासाठी, गावोगावी वाचनालय सुरू करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन मनोहर बारमासे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना केले. बेनोडा शहीद या ग्रामपंचायतीने धम्म सेवा संघांतर्गत चालणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी वाचनालयाच्या बांधकामाकरिता निधीची तरतूद केली होती. त्यातूनच हे वाचनालय उभे झाले. वाचनालयात विद्यार्थ्यांकरिता स्पर्धा परीक्षेची आवश्यक पुस्तके, महापुरुषांची जीवन चरित्रे, कथा, कादंबऱ्या, इतिहास, विज्ञान यासह विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे रघुनाथ घरडे यांनी प्रास्ताविकातून सांगितले.

## 'सुट प्रमाणपत्र' सापडल्याने

# जमीन सोमेश्वर महादेव संस्थान नावावर पूर्ववत होणार

## महाराष्ट्र मंदिर महासंघाची माहिती | तहसीलदार यांच्यावर कारवाईची मागणी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 11)** - सोमेश्वर महादेव संस्थान, भाजीबाजार, अमरावतीच्या शेत जमीन हडप प्रकरणात महाराष्ट्र मंदिर महासंघाला 'सुट प्रमाणपत्र' सापडल्याने जमीन देवस्थानच्या नावावर पूर्ववत होणार असल्याची माहिती महाराष्ट्र मंदिर महासंघाच्यावतीने आयोजित पत्रकार परिषद देण्यात आली. तहसीलदार यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई केली जावी आणि अशी बेकायदेशीर प्रकरणे हाताळण्यासाठी महाराष्ट्रात अॅन्टी लॅन्ड ग्रबींग अॅक्टची आवश्यकता असल्याची मागणीही महासंघाच्या वतीने करण्यात आली.



श्रीसोमेश्वर महादेव संस्थान अमरावती या धार्मिक संस्थानच्या मौजा पेठ अमरावती, ता.जि.अमरावती येथे शेत सर्व्हे क्र. 94, क्षेत्रफळ 4 हे. 85 आर. ही मालकीची शेत जमीन आहे. सदर शेत जमीन हडप करण्याच्या हेतुने सुमन कोठार यांनी तहसीलदार, अमरावती यांचे समक्ष सदर शेत जमीन खरेदी करुन मिळवण्यासाठी अर्ज सादर केला होता. तहसीलदार, अमरावती विजय सुखदेव लोखंडे यांनी कुळ कायद्याच्या उल्लंघन करत संस्थानचा प्राथमिक आक्षेप अर्ज निकाली न काढता, कोणतेही साक्ष पुरावे न घेता, संस्थानच्या मालकीची अंदाजे 50 कोटी रुपये मुल्य असलेली जमीन 960 रुपये मध्ये खरेदी करुन देण्याचा बेकायदेशिर आदेश 26.09.2024 रोजी दिला होता. असे संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी न करता निर्णय देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी. अशा दोषी अधिकाऱ्यांना शिक्षा होण्यासाठी अॅन्टी लॅन्ड ग्रॅबींग अॅक्टची आवश्यकता आहे, असे मत मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी यावेळी व्यक्त केले.

सदर आदेश पारीत केल्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच 27.09.2024 रोजी, अपील कालावधी संपण्यापूर्वी खरेदीची नोंद केली गेली. तहसीलदार विजय सुखदेव लोखंडे यांनी संस्थानच्या शेत जमीनीच्या प्रकरणात अनियमितता करुन बेकायदेशिर पणे हस्तांतरणाचा प्रयत्न केला आहे. यामुळे संस्थान आणि त्यांच्या भक्तगणांची फसवणूक झाली आहे. तसेच त्यांनी धारण केलेल्या पदाचा गैरवापर करुन कायद्याचे उल्लंघन केले आहे. मंदिर महासंघाच्या वतीने याबाबत तक्रार अर्ज सादर केलेला आहे. सदर शेत जमीन महानगर पालिका हद्दीत येत असल्यामुळे कुळ कायद्याचे कलम 60 नुसार या जमिनीला कुळ कायदा लागू होत नाही. तसेच, श्री सोमेश्वर संस्थान, अमरावतीला कुळ कायद्यातील कलम 129(ब) अंतर्गत सन 1969 मध्येच सुट प्रमाणपत्र प्राप्त असल्याने सर्वोच्च न्यायालयातील न्यायनिवाड्यानुसार सूट प्रमाणपत्र प्राप्त ट्रस्टला कुळ कायदा लागू पडत नसल्याने तहसिलदार, अमरावती यांच्या आदेश रद्द करुन शेत जमिनीच्या 7/12 उताऱ्यात संस्थानचे नाव पुर्ववत करण्यात यावे, अशी मागणी पत्रकार परिषदेमध्ये समितीच्यावतीने करण्यात आली. पत्रकार परिषदेत हिंदु जन जागृती समितीचे विदर्भ समन्वयक श्रीकांत पिसोळकर, राज्य कोर कमिटी पदाधिकारी अनुप जयस्वाल, जिल्हा संयोजक कैलाश पनपालिया, विनीत पाखोडे, हिंदु जन जागृती समितीचे जिल्हा समन्वयक निलेश टवलारे उपस्थित होते.

### तहसीलदारां विरोधात तक्रार अर्ज

तहसीलदार अमरावती यांनी मंदिर प्रकरणात अनियमितता केल्याने त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी तक्रारीत करण्यात आली आहे. मंदिर महासंघाच्या वतीने तक्रार अर्ज विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी, अमरावती यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे. या बाबतची माहिती मंदिर महासंघाचे महाराष्ट्र पदाधिकारी अनुप जयस्वाल यांनी पत्रकार परिषद मध्ये दिली.

# चांदूर बाजार तालुक्यात सुनील, आशिष, शुभमच्या तिकडीचा हौदोस

## अवैध व्यावसायिकच होत आहेत पोलीस मित्र



शिरजगाव कसबा येथे अवैध वाळू तस्करी जोरात?

समिती आणि पथकाचे अस्तित्व केवळ कागदावर | तस्करांचे प्रशासनात लागेबांधे

तहसिलदारांची नोटीस केराच्या टोपलीत



शिरजगाव कसबा पोलीस स्टेशनचा कारभार ढेपाळला?

चहा पेक्षा किटली च 'चटके' दार

'अमोल' अवैध व्यावसायिकांकरिता ठरतोय 'अनमोल'

अवैध वाळू वाहतूकीसाठी रेट कार्पेट?

खाकीतला सुनील, बाहेरचा शुभम घालताहेत धिंगाणा



चांदूर बाजार, शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात दलालाचा सुळसुळाट?

एसडीपीओ घेतील का दखल?

शाखेची चुप्पी अनेक संशयांना देताय थारा?

तेल मालिशचा बहाणा



बापरे... खाकीतल्या सुनील ची वाळू अन् रेशनच्या तांदळातही भागीदारी!

अवैध व्यवसायांवर पोलीसांची मेहेरनजर

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,(दि.11)**- तालुक्यातील शिरजगाव कसबा पोलीस स्टेशन अवैध व्यावसायिकांचे 'हब' बनले आहे. येथील अवैध व्यावसायिक सुनील, आशिष व शुभमच्या तिकडीने अक्षरश: हौदोस घातला आहे. मध्यप्रदेशातील सुपाळा येथे अवैधरितीने निर्माण होणारी गावठी दारू आपल्या दुचाकीने आणणारा आशिष याने सुनील सोबत आर्थिक व्यवहार करत मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले, त्यांच्यात होणारा आर्थिक व्यवहार घट्ट झाले. तो आशिष शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील करजगाव सह इतरही गावात गावठी दारू पोहचविता-पोहचविता सुनील चे मदतीने वाळू माफिया कधी बनला कुणालाच साधी भनकही लागली नाही. सुनील ला आर्थिक व्यवहारात पोलिसमित्र म्हणवणारा शुभम ची मोठी साथ आहे.

पोलिसांचे लोकेशन जागेवरच माहिती होऊ लागल्याने स्थानिक पोलिसांकडून आशिष चे अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई होत नव्हती किंवा मुद्दाम कारवाई होत नव्हती. महसूल व पोलिसांच्या नाकावर टिच्चून वाळू तस्करी अगदी राजरोसपणे आशिष हा आपल्या महेंद्र कंपनीच्या लाल रंगाच्या ट्रॅक्टरने वाळू तस्करीत गुंतलेला आहे. त्याला साथ मिळाली ती स्थानिक ठाण्यात कार्यरत सुनील ची त्यामुळे तो बिनधास्त वाळू तस्करी करीत आहे. स्थानिक पोलिसांचा कर्मचारीच त्याला भागीदार आहे की आर्थिक व्यवहार हे अद्याप बाहेर येऊ शकले नाही, परंतु त्यांचे सुत जुळले आहे हे पक्के आहे. महसूल विभागाने आठ दिवसांआधी कारवाई केली माहिती आहे. त्यामुळे महसूलच्या निशाण्यावर तो सध्या नसणार आहे.

### सुनील वर ठाणेदार सह पोलिस अधीक्षक मेहेरबान का ?

बहिरम यात्रेदरम्यान सुनिल नामक कर्मचाऱ्याचा चांगलाच गाजावाजा झाला होता. तेव्हा ठाणेदार यांनी बहिरम बंदोबस्त झाला की, बदली करतो असे म्हणत वेळ मारून नेली. बहिरम आटोपत नाही तोच सुनील पुन्हा ?क्शन मोड आला. पोलिस विभागात चर्चेत असलेला सुनील वर खुद्द पोलिस अधीक्षक विशाल आनंद मेहेरबान आहे की काय? असा विषय आता ठाण्याच्या हद्दीत रंगायला लागला आहे. तर तोच सुनील सांगतो की, 'ठाणेदार माझी बदली करू शकत नाही', 'मी ठाणेदारांची बदली करू शकतो'. तो पोलिस अधीक्षक यांच्या पेक्षा ही मोठा झाला की, असा प्रश्न अनेकांना पडत आहे. सुनील हेड क्वार्टर ला अटॅच होण्याच्या चर्चा अनेकदा झाल्या पण त्या हवेतच विरल्या हे ही विशेष. त्यामुळे सुनील चे पदापेक्षा पॉवर मोठी आहे असे दिसते.

# विदर्भ राज्य आंदोलन समिती नांदगाव खंडेश्वर तालुका बैठक



**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर, (दि.11)**- दि.23 व 24 मार्च 2025 रोजी आमदार निवास नागपूर या ठिकाणी विदर्भ राज्य आंदोलन समितीचे तिसरे अधिवेशन होणार आहे, या निमित्त नांदगाव खंडेश्वर या ठिकाणी बैठक घेण्यात आली. बैठकीचे अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, प्रमुख पाहुणे प्रकाश लद्धा , अमरावती शहर अध्यक्ष रियाज खान, महिला आघाडी जिल्हा अध्यक्षा सुषमा मुळे, विभागीय अध्यक्ष अशोकराव हांडे, तालुका अध्यक्ष दिनेश ढवस यांनी या बैठकीला मार्गदर्शन केले.

जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर यांनी सांगितले की, सन 2014 ला पहिला अधिवेशन देण्यात आलं होतं, तेव्हा ज्येष्ठ अर्थतज्ञ श्रीनिवास खांदेवाले यांनी 110 कोटीचा शिलकीचा अर्थसंकल्प मांडला होता. तसेच सन 2018 ला 1660 कोटीचा शिलकीचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पाला देशभरात कोणीही आवाहन स्विकारलेले नाही. विदर्भ हे सक्षम राज्य होऊ शकत नाही अशी आवई उठविणाऱ्या नेत्यांना अर्थसंकल्पाच्या माध्यमातून उत्तर दिले. प्रकाश लद्धा यांनी विदर्भ ही जनतेची मागणी नाही या विधानाचा परामर्श घेताना नागपूर, अमरावती, चंद्रपूर व यवतमाळ या ठिकाणी मतदान घेण्यात आले. जनतेने विदर्भ राज्याच्या मागणी करिता मोठ्या प्रमाणात मतदान केले, अशी माहिती दिली. अमरावती शहराध्यक्ष रियाज खान यांनी सांगितले की, विदर्भही आपल्या अधिकाराची लढाई आहे, तेव्हा कार्यकर्त्यांनी एकजुटीने राहून विदर्भ आंदोलन समितीची व्यापकता वाढवावी. महिला आघाडी अध्यक्षा यांनी या बैठकीत प्रीपेड मीटरचा मुद्दा उपस्थित केला. अशोकराव हांडे यांनी गावागावात जाऊन जनजागृती करण्याचे अभिवचन दिले. या बैठकीला पद्मा मानेकर, संगीता मेहेसरे, अरुणा राजूरकर ,संगीता देशमुख, विठ्ठलराव बावनेर रमेशराव टापरे, सुशीलचंद्र येवतीकर, अजय बेले, वसंता मंडवधरे ,प्रल्हादराव रावेकर ,राजकुमार खडसे, गणेशराव सोनवणे, महादेवराव गोंडाने, विठ्ठलराव चोरे, मधुकरराव खंगार, दादाराव निवारे, बाळकृष्ण राऊत ,जगदीश राऊत, पंजाबराव भोगडे, अभिजीत ढवस ,शंकर वैद्य ,यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.या बैठकीचे संचालन दिनेश ढवस तर आभार प्रदर्शन विलास धांडे यांनी केले. या बैठकीमध्ये अजयराव बेले यांची नांदगाव तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली तर बाळकृष्ण राऊत यांची चांदुर रेल्वे तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

# वोक्हार्ट हॉस्पिटल्सची किडनी संवर्धनासाठी तत्परता

## वाढत्या किडनी समस्यांचा धोका ओळखत जागतिक किडनी दिनानिमित्त कृतीतून दर्शविली वचनबद्धता




**नागपूर, ११ मार्च :** भारतामध्ये किडनीशी संबंधित आजार वेगाने वाढत आहेत. क्रॉनिक किडनी आजार, किडनी स्टोन्स आणि अॅक्युट किडनी इंज्युरीसारख्या समस्या मोठ्या प्रमाणावर आढळत आहेत. जागतिक किडनी दिन २०२५ हा तुमच्या किडन्या ठीक आहेत का? लवकर ओळखा, किडनीचे आरोग्य जपा या जनजागृती घडविणाऱ्या संकल्पनेवर साजरा होत आहे. वाढत्या किडनी समस्यांचा धोका ओळखत नागपूर येथील वोक्हार्ट हॉस्पिटल किडनी आरोग्य संवर्धनासाठी विविध उपक्रम राबवत आपली तत्परता स्पष्ट करत आहे. जागतिक किडनी दिनाच्या निमित्ताने वोक्हार्ट हॉस्पिटल्सतर्फे किडनी विकारग्रस्त रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी अंगदान करीत अमूल्य योगदान देणाऱ्या निःस्वार्थ व्यक्ती व त्यांच्या कुटुंबियांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी आयोजित कार्यक्रमात किडनी प्रत्यारोपण तज्ज्ञ व नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. सुर्याश्री पांडे यांनी अंगदानासंदर्भात सखोल मार्गदर्शन केले. तसेच, जिवंत किंवा मृत्यू पश्चात किडनी प्रत्यारोपण करून एखाद्या रुग्णाचे जीवन वाचवले आहे अशा व्यक्तींच्या प्रेरणादायी कथा यावेळी सर्वांसोबत सामायिक करण्यात आल्या. हे अनुभव उपस्थितांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरले. जिवंत व मृत्यू पश्चात अंगदानातील फरक डॉ. पांडे यांनी यावेळी स्पष्ट केला ज्यामुळे उपस्थितांना किडनी प्रत्यारोपणाची गरज असलेल्या रुग्णांकरिता उपलब्ध पर्यायांची व्यापक माहिती मिळाली आणि अवयवदानामुळे रुग्ण, त्यांचे कुटुंब आणि समाजावर कसा सकारात्मक परिणाम होतो याची जाणीव झाली. अंगदान केवळ रुग्णालाच नव्हे, तर त्यांच्या कुटुंबियांना आणि संपूर्ण समाजाला मदत करू शकते हे यातून स्पष्ट झाले. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांसाठी विशेष किडनी केअर पॅकेज कुपन्स उपलब्ध करून देण्यात आले, ज्यामध्ये किडनी आरोग्यासाठी आवश्यक तपासण्या आणि उपचार समाविष्ट आहेत.

अलीकडील आकडेवारीनुसार, भारतातील प्रत्येक सात प्रौढ व्यक्ती पैकी एक व्यक्ती किडनी विकाराने ग्रस्त आहे. मधुमेह आणि उच्च रक्तदाब हे यामागील प्रमुख कारणे आहेत. अनियमित आहार, स्थूलता, गतिहीन जीवनशैली आणि वाढलेला ताण हे देखील किडनीच्या समस्यांमध्ये भर घालणारे घटक आहेत, अशी माहिती तज्ज्ञांनी यावेळी दिली.

१३ मार्च २०२५ रोजी साजरा होत असलेला जागतिक किडनी दिन हा किडनी आरोग्याच्या महत्त्वावर भर देणारा आहे. क्रॉनिक किडनी आजार हा सायलेंट किलर मानला जातो, कारण त्याची सुरुवातीची लक्षणे स्पष्ट दिसत नाहीत. लक्षणे केवळ उशीराच्या टप्प्यात दिसून येतात, जेव्हा उपचार अधिक कठीण होतात. याकरिता किडनीचे आरोग्य जपण्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे. किडनीचे आरोग्य टिकवण्यासाठी काही महत्त्वपूर्ण प्रतिबंधात्मक उपाय यावेळी तज्ज्ञांनी सुचविले. संतुलित आहार जसे कि ताज्या फळभाज्या, संपूर्ण धान्य आणि प्रथिनयुक्त पदार्थ भोजनामध्ये असायला हवे त्यांनी सांगितले. तसेच मीठ आणि साखरेचे प्रमाण मर्यादित ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी त्यांनी पुरेशे पाणी पिण्यावर भर दिला जेणेकरून किडनीच्या कार्यक्षमतेला मदत होईल आणि किडनी स्टोन्स होण्याचा धोका कमी होईल. नियमित वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक असून, रक्तदाब, रक्तातील साखर आणि किडनी कार्य तपासणी करण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला ज्यामुळे संभाव्य समस्या लवकर ओळखता येऊ शकतील. यावेळी स्थूलता आणि मधुमेह नियंत्रणात ठेवण्यास दैनंदिन व्यायाम करण्यावर सुद्धा त्यांनी भर दिला. किडनीचे दीर्घकालीन नुकसान टाळण्यासाठी धूम्रपान आणि मद्यपान टाळण्याचाही सल्ला डॉक्टरांनी दिला.औषधांचा योग्य वापर करावा,डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय वेदनाशामक किंवा इतर औषधे जास्त प्रमाणात घेऊ नयेत,कारण काही औषधांमुळे किडनीला हानी पोहोचू शकते, असे त्यांनी सांगितले.

किडनी प्रत्यारोपण हा शेवटच्या टप्प्यातील किडनी विकारग्रस्त रुग्णांसाठी जीवनदान ठरू शकतो अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. सध्या भारतात २ लाखांहून अधिक लोक किडनी ट्रान्सप्लांटच्या प्रतीक्षेत आहेत, असे राष्ट्रीय अवयव व ऊतक प्रत्यारोपण संस्था (नोट्टो) च्या अहवालात नमूद आहे. अंगदानाची गरज लक्षात घेता, समाजात जाणीवजागृती आणि कृती करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. अंगदान हा केवळ परोपकाराचा नव्हे तर एखाद्याचे जीवन वाचवण्याचा संकल्प आहे. अंगदान करण्याचा निर्णय घेतल्यास, एखाद्या गरजू व्यक्तीला आरोग्य, आयुष्य आणि कुटुंबासोबत अधिक काळ घालवण्याची संधी मिळू शकते.

जागतिक किडनी दिनानिमित्त, आपण सर्वांनी एकत्र येऊन किडनी आरोग्य जागरूकता वाढवली पाहिजे. आम्ही उत्कृष्ट किडनी केअर आणि ट्रान्सप्लांट सेवा देण्यास कटिबद्ध आहोत. आधुनिक तंत्रज्ञान आणि तज्ज्ञांच्या मदतीने आम्ही एकाच छताखाली सर्व आवश्यक तपासण्या करून वेळीच निदान आणि उपचार करण्याची सुविधा देत आहोत, अशी माहिती नागपूर येथील वोक्हार्ट हॉस्पिटलचे केंद्रप्रमुख श्री. रवी बागली यांनी दिली.

जागतिक किडनी दिन साजरा करताना आशा आणि आरोग्याचा संदेश पसरविण्याचा मानस त्यांनी यावेळी बोलून दाखविला. आपल्या अंगदानाचा निर्णय अनेकांचे जीवन बदलणारा ठरू शकतो, त्यामुळे सर्वांनी एकजूट होत या लढ्यात सहभागी व्हावे असे आवाहन रवी बागली यांनी केले.

# जागतिक महिला दिनानिमित्त महिला गटाला कॅटरिंग साहित्य वाटप



**गोंडखैरी, ११ मार्च :** गावात राहणारी महिला स्वयंनिर्भर व्हावी असा उदात्त हेतू कायम ठेवत अलेसूर येथील श्री महालक्ष्मी स्वयंसहायता समुहाला कॅटरिंग व्यवसायासाठी आवश्यक ते साहित्य प्रदान करण्यात आले. आता याच साहित्याचा उपयोग करून त्या व्यवसाय उभारणार आहेत. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत अदानी फाऊंडेशनच्या पुढाकाराने महालक्ष्मी स्वयंसहायता महिला गटाला कॅटरिंग साहित्य प्रदान करण्यात आले. त्यात १०० केटरिंग प्लेट्स, २०० वट्ट्या, २ भात वाढण्याचे साहित्य, ४ वाट्या, १ जर्मन भांडे, २ भाजीपाला वाढण्याचे चमचे आणि २ चमचे समाविष्ट आहेत. हे सर्व साहित्य वापरकर्त्यांच्या सोयीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे, जेणेकरून ते आवश्यकतेनुसार योग्यरित्या वापरता येतील.

यावेळी गोंडखैरीच्या सरपंच वर्षा अतकरी, अलेसूरच्या सरपंच माला निकोसे, नीता म्हस्के, वात्सल्य संस्थेचे हरीश लाड, देवीदास मोहर्ले, उपसरपंच मारोती सोनुले उपस्थित होते.

वर्तमानात कॅटरिंग व्यवसायाची मागणी वाढत आहे. त्याअनुषंगाने महिला गटाला आवश्यक ते कॅटरिंगचे साहित्य देण्यात आले. यात सर्व प्रकारच्या साहित्याचा समावेश असल्याने महिलांना व्यवसाय करणे सोयीचे होईल. शिवाय केवळ याच महिला समुहाला नव्हे तर इतरांनाही यातून रोजगार मिळणार आहे.

## चंद्रपूर शहर महानगरपालिका,चंद्रपूर

जावक क्रमांक :- चंशमनपा/बांध/कार्या-०१/२०२५/५६३८ — दिनांक - ११/०३/२०२५

**निविदा सुचना**

आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, जि. चंद्रपूर यांचे वतीने खालील कामासाठी बी–1 दोन लिफाफा पध्दतीने निविदा पध्दतीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे योग्य त्या वर्गातील पजीबध्द कंत्राटदाराकडुन निविदा मागविण्यांत येत आहे. वरील कामाची निविदा केवळ निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहे. सदर कामाचे अटी व शर्ती बांधकाम विभागामध्ये तसेच निविदा सोबत प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

| अनु. क्रं. | कामाचे वर्णन | शेडुल–बी रक्कम | निविदे सोबत भरावयाची इसारा रक्कम | कोरे निविदा प्रपत्र किंमत | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | चंद्रपूर शहर महानगरपालिका मधील विवाह नोंदणी कार्यालय दुरुस्तीचे काम. | ७,१८,४०९/- | रु. ८,०००/- | ५६०/- | ३ महिने |

**निविदा प्रसिध्दीचा तपशील**

| | |
|---|---|
| निविदा विक्री दिनांक | दिनांक ११/०३/२०२५ ते१७/०३/२०२५ ला दु. 4.00 वाजेपर्यंत |
| निविदा सादर करावयाची दिनांक | दिनांक १८/०३/२०२५ सायं. 4.00 वाजेपर्यंत |
| निविदा उघडणी दिनांक | दिनांक १९/०३/२०२५ ला साय. 4.00 वाजता शक्य झाल्यास. |

स्वा/–
आयुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

# एसएस इनोव्हेशन्सद्वारे 'मंत्राएम'चे अनावरण




नागपूर ११ मार्च २०२५: भारतातील पहिले आणि एकमेव स्वदेशी सर्जिकल रोबोटिक सिस्टीम एसएसआय मंत्राचे निर्माते एसएस इनोव्हेशन्सने दुसऱ्या ग्लोबल एसएसआय मल्टी-स्पेशालिटीरोबोटिक सर्जरी कॉन्फरन्स (एसएमआरएससी) २०२५ चे आयोजन केले. एसएमआरएससी २०२५ मध्ये करण्यात आलेल्या एका प्रमुख घोषणेत, एसएस इनोव्हेशन्सने एसएसआय मंत्रा टेलि–सिंकमोबाइल युनिट एसएसआय मंत्राएमचे अनावरण केले. अशा प्रकारच्या अनोख्या उपक्रमामुळे भारतात रोबोटिक सर्जरी आणि टेलिमेडिसिनमध्ये क्रांती घडून येईल. हे प्रगत मोबाइल टेली–सर्जिकलयुनिट वैद्यकीय तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण, वैद्यकीय सेवांच्या पायाभूत सुविधांमध्ये परिवर्तन आणि आधुनिक शस्त्रक्रियेची उपलब्धता वाढवण्यासाठी एसएस इनोव्हेशन्सच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

याद्वारे एसएस इनोव्हेशन्स वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या सीमा ओलांडण्यासाठी, शस्त्रक्रिया पायाभूत सुविधांमध्ये परिवर्तन करण्यासाठी आणि रोबोटिक सर्जरी आणि आरोग्य तंत्रज्ञानाच्या नवोपक्रमात जागतिक स्तरावर भारताचे स्थान मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील आहे. या दोन दिवसांच्या कार्यक्रमात जगभरातील १२०० हून अधिक नामांकित वैद्यकीय व्यावसायिक सहभागी झाले होते, ज्यांना या व्यासपीठाद्वारे रोबोटिक शस्त्रक्रियेच्या परिवर्तनीय क्षमतेबद्दल जाणून घेण्याची संधी मिळाली.

एसएसआय मंत्राएमच्या अनावरण प्रसंगी बोलताना, एसएस इनोव्हेशन्सचे संस्थापक, अध्यक्ष आणि सीईओ डॉ. सुधीर श्रीवास्तवम्हणाले, एसएसआय मंत्राएम हे केवळ मोबाईल टेलिसर्जिकल युनिट नसून जागतिक आरोग्यसेवेत आधुनिक बदल घडवून आणण्यासाठीची ही एक चळवळ आहे. हाय–स्पीड टेलिकम्युनिकेशन्स आणि सॅटेलाइट कनेक्टिव्हिटीसह ते भौगोलिक अडथळ्यांवर मात करते तसेच या सुविधेपासून वंचित समुदायांसाठी जीवनरक्षक रोबोटिक–सहाय्यितशस्त्रक्रिया सुलभ करते. टेलिसर्जरीच्या व्याप्तीच्या पलीकडे जाऊन, एसएसआय मंत्राएम शस्त्रक्रिया शिक्षण, टेलि–मेंटरिंग आणि रिअल–टाइमरुग्ण डेटा विश्लेषणासाठी एक शक्तिशाली व्यासपीठ म्हणून काम करते. एसएसआय सातत्यपूर्ण संशोधन आणि नवोपक्रमाद्वारे प्रगत रोबोटिक शस्त्रक्रियेची ज्यांना सर्वात जास्त गरज आहे त्यांच्या आवाक्यात ही सुविधा आणण्यासाठी कार्यरत आहे.

टेलिसर्जरीच्या आधुनिक क्षमतेसह एसएसआय मंत्राएम दुर्गम वंचित भागात जागतिक दर्जाच्या रोबोटिक–सहाय्यितप्रक्रिया उपलब्ध करून देऊन शस्त्रक्रिया केअरमधील सर्व अडथळे दूर करत आहे. टेलि सिंक मोबाइल युनिटमध्ये एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टम, हाय–स्पीड कनेक्टिव्हिटी आणि प्रगत सर्जिकल रोबोटिक्स आहेत जे रिमोट आणि ऑन–साइट सर्जिकल टीममध्ये रिअल–टाइमसहकार्य सुनिश्चित करतात. या नवोपक्रमामुळे शल्यचिकित्सकांना कमीत कमी विलंबाने प्रक्रिया पूर्ण करण्याची परवानगी मिळते ज्यामुळे आधुनिक शस्त्रक्रिया पूर्वीपेक्षा अधिक सुलभ होतात.

HDFC BANK
We understand your world

नोंदणीकृत कार्यालय: एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई–४०००१३ आणि एचडीएफसी बँक लिमिटेड, पहिला मजला, आय–थिंक टेक्नो कॅम्पस, कांजूरमार्ग (पूर्व), मुंबई – ४०००४२ येथे रिटेल पोर्टफोलिओ व्यवस्थापन म्हणून त्याचे एक कार्यालय आहे.

**लिलाव विक्री सूचना**

कर्जदारांना, विशेषत:, आणि सर्वसाधारणपणे जनतेला, याद्वारे सूचित केले जाते की खालील खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा/सुरक्षेचा सार्वजनिक लिलाव आयोजित करण्याचा प्रस्ताव आहे. एचडीएफसी बँक लिमिटेड (बँक) ने कर्जाची थकबाकी भरण्यासाठी नोटीस देऊनही, त्यांनी स्वाक्षरी केलेल्या आणि स्वीकारलेल्या कर्ज कराराच्या अटींनुसार, ज्या कर्जदारांनी पैसे देण्यास चूक केली आहे त्यांच्या सोन्याच्या दागिन्यांचा/सुरक्षिततेचा लिलाव आहे. बँकेने कर्जदारांना नोटीस देखील जारी केली होती ज्याद्वारे, खालील खात्यांमधील संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी देण्यात आला होता, असे न झाल्यास पुढील नोटीस जारी न करता संपूर्ण तारण ठेवलेल्या सोन्याच्या सुरक्षिततेचा लिलाव करण्यास बँकेला स्वातंत्र्य असेल. कर्जदारांनी दुर्लक्ष केले आणि पेमेंट करण्यात अयशस्वी झाले, म्हणून, बँकेने कर्ज करारांतर्गत आपल्या अधिकारांचा वापर करून तारण म्हणून कर्जदारांनी बँकेकडे दिलेले सोन्याच्या सुरक्षेवरील तारण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे आणि संपूर्ण सोन्याचे दागिने/सुरक्षा लिलावाद्वारे विकून आणि थकबाकी वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे.

१९-०३-२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजेपासून खाली नमूद केलेल्या शाखेत लिलाव केले जातील. कोणत्याही तारण ठेवलेल्या तारखेचा लिलाव नमूद केलेल्या तारखेला आयोजित केला जाऊ शकत नाही किंवा पूर्ण केला जाऊ शकत नाही अशा स्थितीत, त्यानंतरच्या कोणत्याही तारखेला आणि वेळेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे जाण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

| अ. क्र | कर्ज क्र | कर्जदाराचे नाव | कर्जाची रक्कम | लिलावाचे ठिकाण (शाखेचा पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | 75677274 | वासुदेव दिगंबर ठाकरे | 402500 | प्लॉट क्रमांक १३/५, राजगोपालचारी वार्ड, भंडारा, महाराष्ट्र ४४१९०४ |
| 2 | 75420204 | सविता महेंद्र ठाकरे | 298400 | मोदी पेट्रोल पंपाजवळ मोदी हाईट्स पंचशील वॉर्ड–साकोली, जिल्हा, भंडारा, महाराष्ट्र ४४१८०२ |
| 3 | 74790599 | कृष्णा संतोष चोपडे | 245300 | एचडीएफसी बँक लिमिटेड, तळमजला बबरवाल कॉम्प्लेक्स मालमत्ता क्रमांक १४०४, प्लॉट क्रमांक ५ प्रभाग क्रमांक २, अकोला जिल्हा सहकारी बँकेच्या समोर, अनंत कॉलनी एनआर बस स्टँड रिसोड वाशिम, महाराष्ट्र–४४४५०६ |
| 4 | 75313694 | राहुल अवधेश राय | 227589 | एचडीएफसी बँक लिमिटेड २०४, माशुरावाला बाग, धरमपेठ एक्स्टेंशन, शंकर नगर रोड, नागपूर, महाराष्ट्र ४४००१० |
| 5 | 74789328 | कृष्णा संतोष चोपडे | 225000 | एचडीएफसी बँक लिमिटेड, तळमजला बबरवाल कॉम्प्लेक्स मालमत्ता क्रमांक १४०४, प्लॉट क्रमांक ५ प्रभाग क्रमांक २, अकोला जिल्हा सहकारी बँकेच्या समोर, अनंत कॉलनी एनआर बस स्टँड रिसोड वाशिम, महाराष्ट्र–४४४५०६ |
| 6 | 75306144 | लावण्य महेश राव | 215700 | भारुका भवन, समोर. यशवंत स्टेडियम, धंतोली, नागपूर, महाराष्ट्र ४४००१२ |
| 7 | 75565125 | मयूर पंजाबराव वंजारी | 203100 | तळमजला, प्लॉट नं–७, दयानिधी, टिळक वाडी, बस स्टँड समोर, रामटेक जि–नागपूर, रामटेक, महाराष्ट्र ४४११०६ |
| 8 | 75445383 | परमेश्वर शिवप्रसाद हिरगुडे | 188200 | एचडीएफसी बँक लिमिटेड, सेठी हाइट्स, जिल्हा परिषदेसमोर, अकोला, महाराष्ट्र ४४४००१ |
| 9 | 74732114 | जयवंतराव दिलीपराव देशमुख | 171100 | तळमजला, कसारा नं ४–११५, धानकी रोड, उमरखेड, यवतमाळ, महाराष्ट्र ४४५२०६ |
| 10 | 74780501 | प्रशांत सावंदा चाटे | 156200 | वर्धने टॉवर, मिडसी गेट जवळ, बुटी बोरी, महाराष्ट्र ४४११०८ |
| 11 | 75336832 | राणी नितीन बागुलकर | 145000 | मेधा पेट्रोल पंपासमोर, बस–स्टँड जवळ, तळेगाव रोड, आर्वी, महाराष्ट्र ४४२२०१ |
| 12 | 75515362 | विजयानंद अय्यर | 145000 | साईप्रसाद बिल्डिंग, मेन रोड, भद्रावती, महाराष्ट्र ४४२९०२ |
| 13 | 75356439 | सुधीर रामराव गायकवाड | 135000 | एचडीएफसी बँक लिमिटेड, दुर्गा चेंबर, बस स्टँड रोड, अकोट, जि–अकोला, ४४४१०१ |
| 14 | 75436007 | हर्षल जगन्नाथ गावंडे | 134700 | एचडीएफसी बँक लिमिटेड, दुर्गा चेंबर, बस स्टँड रोड, अकोट, जि–अकोला, ४४४१०१ |
| 15 | 463581358 | पंकज एल पाठराबे | 128700 | प्लॉट क्र. ६२५, काश्मिरी गल्ली, इंदोरा स्क्वेअर जवळ, नागपूर, महाराष्ट्र ४४००१७ |
| 16 | 74878996 | मनीषा यशवंतराव टेकम | 124000 | भारुका भवन, समोर. यशवंत स्टेडियम, धंतोली, नागपूर, महाराष्ट्र ४४००१२ |
| 17 | 75377190 | मनोज श्रीराम दिग्रसे | 105000 | मेधा पेट्रोल पंपासमोर, बस–स्टँड जवळ, तळेगाव रोड, आर्वी, महाराष्ट्र ४४२२०१ |
| 18 | 74742801 | अविनाश प्रभाकर रोजतकर | 101600 | हॉटेल रॉयल पॅलेस, पुरुषोत्तम पाटील नगर, खामगाव रोड, शेगाव, महाराष्ट्र ४४४२०३ |
| 19 | 75366917 | मंगेश बी झमरे | 100000 | एचडीएफसी बँक आयटीडी प्लॉट नं. २२५, २२६, एमपीएलएच नं. ८२, नझुल शीट क्र. २७, ब्लॉक क्र. ११, नवीन शिवाजी वार्ड, हिंगणघाट, महाराष्ट्र ४४२३०१ |
| 20 | 75340642 | काशिफ खान मोहम्मद खान | 99700 | एचडीएफसी बँक लिमिटेड, व्हीनस प्लाझा, शेगाव नाका स्क्वेअर, अमरावती–४४४६०४ |
| 21 | 74791778 | मनीषा सारंग कुंभारे | 99000 | साईप्रसाद बिल्डिंग, मेन रोड, भद्रावती, महाराष्ट्र ४४२९०२ |
| 22 | 73363366 | राजू समाधान इंगळे | 97000 | एचडीएफसी बँक लिमिटेड, व्हीनस प्लाझा, शेगाव नाका स्क्वेअर, अमरावती – ४४४६०४ |
| 23 | 75484546 | नौशाद रशीद शेख | 95200 | मातोश्री, प्लॉट नं.–६, समोर. बोई, काटोल रोड, कळमेश्वर, नागपूर, महाराष्ट्र ४४१५०१ |
| 24 | 75102888 | विकास सुनील राघवंत | 95200 | एचडीएफसी बँक लिमिटेड, वरचा तळमजला, नेत्रा हाइट्स, बस स्टँड रोड, पातूर, जिल्हा अकोला–४४४५०१ |
| 25 | 75539278 | पवन रमेश बाभुळकर | 94000 | निर्मल बेकरी स्क्वेअर, समोर. बँक ऑफ महाराष्ट्र, वर्धा, महाराष्ट्र ४४२००१ |
| 26 | 75262471 | घनश्याम तानाजी सातपुते | 93000 | तळमजला, व्यंकटेश सदन, नमकगंज पोलीस स्टेशन जवळ, इतवारी, नागपूर, महाराष्ट्र ४४०००८ |
| 27 | 75668527 | विवेक एम जिरापुरे | 93000 | एचडीएफसी बँक लिमिटेड रसिक प्लाझा, जयस्तंभ स्क्वेअर, मोर्शी रोड, अमरावती, महाराष्ट्र |
| 28 | 74778730 | शबनम गफ्फार कुरेशी | 90300 | साईप्रसाद बिल्डिंग, मेन रोड, भद्रावती, महाराष्ट्र ४४२९०२ |
| 29 | 74883147 | तुषार श्रीकृष्ण चपाटे | 84000 | एचडीएफसी बँक लिमिटेड, व्हीनस प्लाझा, शेगाव नाका स्क्वेअर, अमरावती –४४४६०४ |
| 30 | 75200649 | दर्शना नितेश रंगारकर | 79500 | तळमजला, चोरडिया हाऊस, जुना एसबीआय रोड, जिल्हा–यवतमाळ, वणी, महाराष्ट्र ४४५३०४ |
| 31 | 74747763 | शिवाजी जानराव मातेर | 75500 | एचडीएफसी बँक लिमिटेड दुकान क्रमांक १ आणि २, डायमंड मार्केट, दर्यापूर बनोसा, जिल्हा–अमरावती, दर्यापूर बनोसा. महाराष्ट्र ४४४८०३ |
| 32 | 75347246 | गणेश बद्रीनाथ तरोणे | 72000 | ओम निवास, मेन रोड, जिल्हा–अकोला, मूर्तिजापूर, महाराष्ट्र ४४४१०७ |
| 33 | 461217195 | गणेश कृष्णाजी कुबडे | 70700 | वर्धने टॉवर, मिडसी गेट जवळ, बुटी बोरी, महाराष्ट्र ४४११०८ |
| 34 | 75317611 | नजमुद्दीन शाबुद्दीन सय्यद | 70500 | साईप्रसाद बिल्डिंग, मेन रोड, भद्रावती, महाराष्ट्र ४४२९०२ |
| 35 | 73986781 | श्रेय नवीनचंद्र जानी | 70000 | प्लॉट नंबर ९, हिंदुस्थान कॉलनी, साई मंदिराजवळ, चावला पॅलेस समोर, वर्धा रोड, नागपूर, महाराष्ट्र ४४००१५ |
| 36 | 75596904 | नितीन दयाकर आडेवार | 69000 | तळ आणि पहिला मजला, प्रिन्स ड्रीम प्लाझा, आखाडा रोड पांढरकवडा, यवतमाळ महाराष्ट्र ४४५३०२ |
| 37 | 74296389 | अस्मा तमकानात रेयाजोद्दीन | 68600 | एचडीएफसी बँक लिमिटेड, सेठी हाइट्स, जिल्हा परिषदेसमोर, अकोला, महाराष्ट्र ४४४००१ |
| 38 | 74735755 | गणेश शामरावजी डहारे | 62500 | एचडीएफसी बँक लिमिटेड तळ आणि पहिला मजला, प्लॉट नंबर ६, अड्याळवाले लेआउट, बायपास रोड, उमरेड, जि. नागपूर, महाराष्ट्र. ४४१२०३ |
| 39 | 75375106 | अशोक रामचंद्र धनवे | 61900 | वरचा तळमजला, प्लॉट नं ३, विष्णुकमल नगर, दिनबाई शाळेजवळ, आर्णी रोड, दिग्रस, यवतमाळ, महाराष्ट्र ४४५२०३ |
| 40 | 74746935 | शेखमुष्टक शेखवाहब | 61000 | वरचा तळमजला, प्लॉट नं ३, विष्णुकमल नगर, दिनबाई शाळेजवळ, आर्णी रोड, दिग्रस, यवतमाळ, महाराष्ट्र ४४५२०३ |
| 41 | 74793121 | सतीश किसन गवई | 61000 | एचडीएफसी बँक लिमिटेड, कृष्णा हाइट्स, दुकान क्रमांक १२३४ ओख मार्क जथेरपेठ, अकोला–४४४००१ (महाराष्ट्र) |
| 42 | 74779392 | वासुदेव दिगंबर ठाकरे | 60700 | प्लॉट क्रमांक १३/५, राजगोपालचारी वार्ड, भंडारा, महाराष्ट्र ४४१९०४ |
| 43 | 75368593 | जावेद इक्बाल शेखानी | 56000 | तळमजला, प्लॉट क्र. ११९, प्रथम फॅशन मॉल, पटेल वार्ड, देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली, महाराष्ट्र ४४१२०७ |
| 44 | 75375061 | वंदना धनराज भुरभुरे | 53800 | मेधा पेट्रोल पंपासमोर, बस–स्टँड जवळ, तळेगाव रोड, आर्वी, महाराष्ट्र ४४२२०१ |
| 45 | 75366609 | सीमा प्रकाश थावेली | 52700 | एचडीएफसी बँक लिमिटेड, व्हीनस प्लाझा, शेगाव नाका स्क्वेअर, अमरावती–४४४६०४ |
| 46 | 75373056 | चंदू गुरुदयाल पवार | 51600 | मेधा पेट्रोल पंपासमोर, बस–स्टँड जवळ, तळेगाव रोड, आर्वी, महाराष्ट्र ४४२२०१ |
| 47 | 75426951 | कृष्णा सुधाकर मुळे | 51500 | एचडीएफसी बँक लिमिटेड पोकर्ण टॉवर्स, महादेव मंदिर रोड, समोर. पोस्टल ग्राउंड, यवतमाळ, महाराष्ट्र ४४५००१ |
| 48 | 74761881 | जगदीश शिवहरीपंत निकम | 50000 | एचडीएफसी बँक लि फळीमार्केट, मेन रोड, काटोल, महाराष्ट्र ४४१३०२ |
| 49 | 73359026 | स्वप्नील आसाराम पात्रे | 47300 | एचडीएफसी बँक लिमिटेड फिडवी टॉवर, तळमजला, समोर. सराफ चेंबर्स, माउंट रोड, नागपूर, महाराष्ट्र ४४०००१ |
| 50 | 74681436 | वृषभ दत्तात्रय भडांगे | 47000 | एचडीएफसी बँक लिमिटेड, वरचा तळमजला, नेत्रा हाइट्स, बस स्टँड रोड, पातूर, जिल्हा अकोला–४४४५०१ |
| 51 | 74761116 | कैलास शेषराव घागरे | 45500 | मेधा पेट्रोल पंपासमोर, बस–स्टँड जवळ, तळेगाव रोड, आर्वी, महाराष्ट्र ४४२२०१ |
| 52 | 75363568 | मनीषा सारंग कुंभारे | 45400 | साईप्रसाद बिल्डिंग, मेन रोड, भद्रावती, महाराष्ट्र ४४२९०२ |
| 53 | 75349099 | प्रवीण तुकाराम जाधव | 44600 | पारस प्लाझा, शॉप नंबर १–९, अप्पर ग्राउंड, एसबीआय जवळ, रिसोड रोड, वाशिम, महाराष्ट्र ४४४५०५ |
| 54 | 75328344 | सुधाकर नामदेवराव महाल्ले | 42800 | एचडीएफसी बँक लिमिटेड सेठी हाइट्स, जिल्हा परिषदेसमोर, अकोला, महाराष्ट्र ४४४००१ |
| 55 | 75363325 | लक्ष्मण विश्वनाथ जाधव | 42800 | तळमजला, कसारा नं ४–११५, धानकी रोड, उमरखेड, यवतमाळ, महाराष्ट्र ४४५२०६ |
| 56 | 75161122 | पुरण रमेशजी भैसावार | 42000 | वर्धने टॉवर, मिडसी गेट जवळ, बुटी बोरी, महाराष्ट्र ४४११०८ |
| 57 | 75362362 | विनोद मधुकरराव घासड | 41200 | मेधा पेट्रोल पंपासमोर, बस–स्टँड जवळ, तळेगाव रोड, आर्वी, महाराष्ट्र ४४२२०१ |
| 58 | 74481237 | चेतन नंदलाल जबलपुरे | 40400 | भारुका भवन, यशवंत स्टेडियम समोर, धंतोली, नागपूर, महाराष्ट्र ४४००१२ |
| 59 | 74667745 | शेखजावेद शेखफसर | 39000 | एचडीएफसी बँक लिमिटेड, श्री दत्त कॉम्प्लेक्स, शुभम हार्डवेअर, डोणगाव रोड, मेहकर, मेहकर, महाराष्ट्र–४४३१०१ |
| 60 | 74770553 | गजानन बाबुसिंग आडे | 37500 | तळमजला, कसारा नं ४–११५, धानकी रोड, उमरखेड, यवतमाळ, महाराष्ट्र ४४५२०६ |
| 61 | 73881819 | श्रेय नवीनचंद जानी | 36500 | तळमजला, स्टेटस एन्क्लेव्ह, अयाचित मंदिर बस स्टँड जवळ, लकडा पुल, महाल, नागपूर, महाराष्ट्र |
| 62 | 74761968 | संदिप किसन बोहारुपी | 35300 | एचडीएफसी बँक लिमिटेड फिली मार्केट, मेन रोड, काटोल, महाराष्ट्र ४४१३०२ |
| 63 | 74794960 | कोमल कुमारी | 34000 | एचडीएफसी बँक लिमिटेड फिडवी टॉवर, तळमजला, सराफ चेंबर्स समोर, माउंट रोड, नागपूर, महाराष्ट्र ४४०००१ |
| 64 | 75382210 | शाम रामनाथ बडघरे | 33000 | प्लॉट क्र. ४३६/बी, श्री नारायण बिल्ड., बस स्टँडच्या पुढे, बस स्टँड रोड, ब्रम्हपुरी, जिल्हा–चंद्रपूर, महाराष्ट्र ४४१२०६ |
| 65 | 74774334 | ज्ञानेश्वर महादेव वासू | 32800 | एचडीएफसी बँक लिमिटेड, कृष्णा हाइट्स, दुकान क्रमांक १२३४ ओख मार्क जथेरपेठ, अकोला–४४४००१ (महाराष्ट्र) |
| 66 | 74778896 | योगेश संतोष पेंदाम | 29700 | एचडीएफसी बँक लिमिटेड फिडवी टॉवर, तळमजला, समोर. सराफ चेंबर्स, माउंट रोड, नागपूर, महाराष्ट्र ४४०००१ |
| 67 | 74752799 | यश अविनाश होनाडे | 29200 | एचडीएफसी बँक लि. तळमजला, वासुदेव व्हिला, विदर्भ कोकण ग्रामीण बँकेजवळ, मेन रोड तेल्हारा जि–अकोला, महाराष्ट्र–४४४१०८ |
| 68 | 74738508 | मयूर शंकरराव सूरकर | 28500 | निर्मल बेकरी स्क्वेअर, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, वर्धा, महाराष्ट्र ४४२००१ |
| 69 | 74773000 | अरविंद रामभाऊ काळोकार | 28000 | मेधा पेट्रोल पंपासमोर, बस–स्टँड जवळ, तळेगाव रोड, आर्वी, महाराष्ट्र ४४२२०१ |
| 70 | 74756231 | शेखसद्दाम शेखबिबन | 25000 | एचडीएफसी बँक लिमिटेड, वरचा तळमजला, नेत्रा हाइट्स, बस स्टँड रोड, पातूर, जिल्हा अकोला–४४४५०१ |
| 71 | 74792897 | सुकेशिनी संतोष उके | 25000 | तळमजला, प्लॉट क्र. ११९, प्रथम फॅशन मॉल, पटेल वार्ड, देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली, महाराष्ट्र ४४१२०७ |
| 72 | 74746858 | शालिनी खुशाल बांगडे | 24800 | तळमजला, प्लॉट क्र. ६, ज्योती रोड, बस स्टॉप जवळ, गडचांदूर, महाराष्ट्र ४४२९०८ |
| 73 | 74724834 | पूजा ललित रहाटे | 24000 | एचडीएफसी बँक लिमिटेड फिली मार्केट, मेन रोड, काटोल, महाराष्ट्र ४४१३०२ |
| 74 | 75366365 | सोळंकी मासाभाई | 22600 | इस्थान टॉवर, डॉ. आंबेडकर स्क्वेअर, जिल्हा–चंद्रपूर, वरोरा, महाराष्ट्र ४४२९०७ |
| 75 | 74763923 | तौफिक युनूस राजकोटिया | 21600 | मेन रोड, नगर परिषद कार्यालयासमोर आर्णी, आर्णी, महाराष्ट्र ४४५१०३ |
| 76 | 75659517 | दिलीप रामदास मोहनकर | 20000 | प्लॉट क्रमांक १३/५, राजगोपालचारी वार्ड, भंडारा, महाराष्ट्र ४४१९०४ |
| 77 | 74773950 | राहुल अशोक काळे | 19400 | इस्थान टॉवर, डॉ. आंबेडकर स्क्वेअर, जिल्हा–चंद्रपूर, वरोरा, महाराष्ट्र ४४२९०७ |
| 78 | 75368965 | शंकर सखाराम मुधळ | 31000 | एचडीएफसी बँक लिमिटेड सोमाणी सुपर शॉपच्या पुढे, हिंगोली नांदेड एनएच रोड, बस स्टँड जवळ, कळमनुरी, जिल्हा–हिंगोली ४३१७०२ |
| 79 | 75385366 | संजय सुभाषराव पतंगे | 51000 | एचडीएफसी बँक लिमिटेड. सोमाणी सुपर शॉपच्या पुढे, हिंगोली नांदेड एनएच रोड, बस स्टँड जवळ, कळमनुरी, जिल्हा–हिंगोली ४३१७०२ |

लिलाव "जसे आहे तेथे" आणि "जसे आहे तसे" तत्त्वावर केला जाईल आणि बँक त्या सोन्याचे गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकन या संदर्भात कोणतेही प्रतिनिधित्व किंवा हमी देत नाही. दागदागिने: बोली लावण्यापूर्वी नमूद केलेल्या सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकन याबद्दल स्वत: ची पडताळणी करणे, तपासणी करणे व त्यांचे समाधान करणे ही संभाव्य खरेदीदारांची पूर्णपणे आणि परिपूर्ण जबाबदारी असेल आणि अशा हेतूने ते मुक्त असेल. संभाव्य खरेदीदारांना त्यांची एकमेव किंमत आणि खर्चाचे परीक्षण करणे आणि यापूर्वी दिलेल्या पत्त्यावर, लिलाव आयोजित करण्याच्या वेळेच्या ४५ मिनिट अगोदर तज्ज्ञांच्या सल्ल्यासह किंवा नसलेल्या सोन्याचे दागिने. सर्व बोली अधीन असतील लिलाव प्रक्रिया व विक्री (जर काही असेल तर) अशा लिलावाच्या अनुषंगाने बँकेच्या पुढील अटी व शर्तींच्या अधीन असतील जे बँकेने पुढील अटी व शर्तींच्या अधीन असतील. अटी लागू करणे योग्य नाही जर वर नमूद केलेला कर्जदाराने वरील प्रमाणे लिलाव करण्यापूर्वी त्याच्या वैयक्तिक कर्ज खात्यात असलेल्या कर्जाच्या कराराच्या अनुसार बँकेला दिलेली रक्कम भरली असेल तर, कर्ज घेतलेले तारण दागिने बँकेतून काढू शकतात पुढील सूचना न देता लिलाव केला. कृपया लक्षात घ्या की पूर्वसूचना दिल्याशिवाय लिलाव कार्यवाही पुढे ढकलणे किंवा रद्द करणे किंवा कोणतेही कारण न सांगता, लिलाव प्रक्रिया पुढे ढकलणे किंवा रद्द करणे आणि कोणतेही कारण न सांगता कोणतीही किंवा सर्व बिड किंवा ऑफर नाकारणे ही पूर्णपणे विवेकाधिकार बाब असल्याचे लक्षात घ्या.

तारीख: १२.०३.२०२५
ठिकाण : नागपूर

एसडी/-
प्राधिकृत अधिकारी
एचडीएफसी बँक लि.

# एअरफोनच्या अतिवापराने बहिरेपणाला निमंत्रण

## तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांमध्ये तरुणांचे प्रमाण जास्त



### आवाज हवा मर्यादेतच

70 डेसिबल किंवा त्यापेक्षा कमी आवाज सामान्यत: सुरक्षित मानले जातात. 85 डेसिबल किंवा त्यापेक्षा जास्त आवाजाच्या पातळीच्या दीर्घकाळ संपर्कात राहणाऱ्या व्यक्तींना श्रवणशक्ती कमी होण्याचा धोका जास्त असतो.

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट( दि.11 )**-तरुणांमध्ये सध्या हेडफोन, एअरफोन आणि ब्ल्यूटूथचा वापर वाढला आहे. तासनतास मोठ्या आवाजात गाणी लावून ऐकत बसणे, मोबाईलवर चित्रपट, वेबसिरीज किंवा एखादा व्हिडिओ पाहताना हेडफोन लावणे, त्यासाठी मर्यादेपेक्षा जास्त आवाज ठेवणे यामुळे कानांचे विकार वाढत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञ डॉक्टरांनी नोंदविले आहे.शहरातील तज्ज्ञ डॉक्टरांकडे त्याबाबतच्या तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या सध्या वाढली आहे. त्यामध्ये विशेषत: तरुणांचे प्रमाण जास्त आहे. याबाबत वेळीच लक्ष न दिल्यास त्यांना बहिरेपणाची देखील समस्या उद्भवू शकते, असे डॉक्टरांनी सांगितले. बस, रेल्वे, बाइकवरुन प्रवास करताना किंवा पायी चालताना हेडफोन किंवा ब्ल्यूटुथद्वारे गाणी ऐकणे, मोबाईलवर बोलण्याचे प्रमाण वाढले आहे. मात्र, या गॅझेटचा अतिवापर कानाच्या दुखण्याबरोबरच रक्तदाब, नैराश्य, चिडचिडेपणा व मानसिक आजारांना निमंत्रण देत आहे.

### अशी घ्या काळजी

- एअरफोन, हेडफोनचा वापर मर्यादित करा.
- एअरफोन वापरताना आवाज कमी ठेवा.
- कानाला लावून सतत मोबाईलवर बोलण्याऐवजी काही वेळा स्पीकरचा वापर करा.

### जास्त आवाजामुळे होणारे परिणाम

ऐकायला कमी येणे

कानामध्ये आवाज येणे,चक्कर येणे

नैराश्य, चिडचिडेपणा वाढणे

दुर्लक्ष केल्यास कायमस्वरुपी बहिरेपणा

# शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष शेखर भोयर यांचा भाजपमध्ये प्रवेश

## भोयर यांच्या प्रवेशामुळे भाजपचे संघटन वाढणार- चंद्रशेखर बावनकुळे



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )**- शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व अमरावती विभागातील शिक्षक नेते शेखर भोयर यांनी आज आपल्या अनेक सहकाऱ्यांसह मुंबई येथील भाजप कार्यालयात भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व भाजप नेते माजी मंत्री आमदार संजय कुटे यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षामध्ये अधिकृत प्रवेश घेतला.

मुंबई स्थित भाजप कार्यालयात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपचा दुपट्टा देऊन शेखर भोयर व त्यांच्या सहकाऱ्यांचे पक्षात स्वागत करीत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. या पक्षप्रवेश सोहळ्याप्रसंगी बोलताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की शेखर भोयर यांनी गेल्यास निवडणुकीत अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातून दुसऱ्या क्रमांकाची मते घेतली होती. पश्चिम विदर्भात त्यांचे मोठे वलय असून त्यांच्या मागे शिक्षकांची एक मोठी फळी उभी आहे. शिक्षकांच्या प्रश्नांवर कार्य करणारे एक ऊर्जावान कार्यकर्ते आहेत.

# 15 मार्चपर्यंत नोंदणी झालेल्यांचा कापूस खरेदी होणार

## ढगा केंद्रावर प्रक्रिया सुरू



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.11 )**- वरुड तालुक्यात सीसीआय मार्फत शासकीय कापूस खरेदी सुरू आहे. त्याकरिता नोंदणी करण्यासाठी 15 मार्च पर्यंत मुदत देण्यात आली आहे. 15 मार्च ही अखेरची मुदत असून या दिवसापर्यंत नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कापसाची सीसीआय मार्फत खरेदी केली जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी अद्याप नोंदणी केली नाही, त्यांनी ती करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

वरुड तालुक्यातील ढगा येथील पीएन गोल्ड या जिनिंगवर कापूस खरेदीसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. ज्या शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे त्या शेतकऱ्यांचा कापूस शासकीय खरेदी केंद्रावर मोजला जात आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना आपला सातबारा, आधार कार्ड व बँकेच्या पासबुकची प्रत सोबत आणावी लागते. कापूस खरेदी करिता ऑनलाइन व्यवस्था करण्यात आली असली तरी सीसीआयचे सॉफ्टवेअर तांत्रिक बिघाडामुळे सुरळीत सुरू नाही. त्यामुळे कापूस उत्पादकांनी ढगा येथील केंद्रावर जाऊन विनाविलंब नोंदणी करावी, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे यांनी केली आहे.

# समर्थवाडी येथे योगीराज गोविंद महाराज जन्मोत्सव

## आ.रवि राणा यांची सदिच्छा भेट



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 11 )** अमरावती येथील समर्थवाडी मध्ये योगीराज गोविंद महाराज जन्मोत्सव( दि.11) सध्या सुरू आहे. अनेक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले योगिराज गोविंद महाराज यांचे मंदिर आहे. दरवर्षी योगिराज गोविंद महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त संपुर्ण भारतातून हजारोच्या संख्येने अनुयायी, शिष्य व भक्त या ठिकाणी येवून नतमस्तक होतात. विशेष म्हणजे या ठिकाणी भव्य दिव्य प्रमाणात आलेल्या भक्तांची राहोटी सुद्धा असते. जवळजवळ 3 ते 4 दिवस हा जन्मोत्सव सोहळा सुरु असतो. बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे आ.रवि राणा यांचे सुद्धा योगिराज गोविंद महाराज समर्थवाडी हे श्रद्धास्थान असुन आ. राणा यांनी सुद्धा या ठिकाणी सदिच्छा (दि.11) भेट दिली. आ.प्रविण तायडे, आ.रमेश बुंदिले यांची विशेष उपस्थिती यावेळी होती. तसेच योगिराज महाराजांचे दर्शन घेवून गेल्या अनेक वर्षापासुन समर्थवाडी येथे सेवा देत असलेले महाराजांचे निस्सीम भक्त व शिष्य समर्थवाडीचे सर्वेसर्वा भाऊसाहेब फिरके यांचे आशीर्वाद सुद्धा घेतले. विशेष म्हणजे आ.रवि राणा यांच्या आमदार निधीमधून समर्थवाडीकरिता भव्य दिव्य प्रवेशद्वाराचे व अंतर्गत सिमेंट रस्त्याचे बांधकाम पुर्ण झाले असुन लवकरच या प्रवेशद्वाराचे लोकार्पण सुद्धा होणार असल्याचे राणा यांनी सांगितले. यावेळी माजी नगरसेविका सुमती ढोके, सचिन भेंडे तसेच दिलीप भाकरे व हजारोच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

# कवी, साहित्यिक निलेश साठवणे यांचे निधन

## आज नांदगाव पेठ मध्ये अंत्यसंस्कार



**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव पेठ, ( दि. 11 )**- येथील कवी,लेखक, वंचितांच्या वेदना आपल्या शब्दातून मांडणारा साहित्यिक,नाटककार निलेश बबनराव साठवणे (44) यांचे आज (दि.11 मार्च) रोजी दुपारी 4 वाजता दरम्यान डॉ.पंजाबराव देशमुख रुग्णालयात निधन झाले.गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते मात्र उपचारादरम्यान आज त्यांची प्राणज्योत मालवली. काही दिवसांपासून त्यांना अत्यवस्थ वाटत असल्याने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याठिकाणी दोन शस्त्रक्रिया देखील पार पडल्या.त्यांनतर डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयात दाखल करण्यात आले होते मात्र दुपारी 4 वाजताच्या दरम्यान त्यांना देवाज्ञा झाली. त्यांच्या पश्चात आई, वडील,पत्नी, मुलगा, मुलगी, दोन भाऊ, बहीण असा बराच मोठा आप्त परिवार होता. बुधवार दि.12 रोजी सकाळी 11 वाजता संताजी चौक नांदगाव पेठ येथून त्यांची अंत्ययात्रा निघणार असून स्थानिक मोक्षधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार पार पडेल.घटनेने परिसरात शोककळा पसरली असून प्रतिभा साहित्य संघ अमरावती व तेली समाज संघटना व ऑटो युनियनच्या वतीने त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

# 21 मार्चला अमरावतीत शेतमजूर हक्क एकता परिषद

- अनेक मागण्यांचे ठराव मांडणार
- खेत मजूर युनियनतर्फे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )**- महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियनशी संलग्न भारतीय खेत मजदूर युनियन (बीकेएमयु) अमरावती जिल्हा कौन्सिलच्या वतीने शेतमजूर हक्क एकता परिषद शुक्रवार, 21 मार्च रोजी सकाळी 11 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कार भवन, भीम टेकडी, बेनोडा शाळेजवळ, यशोदा नगर चौक, अमरावती येथे आयोजित करण्यात आली आहे. परिषदेचे उद्घाअन महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियन चे राज्य सरचिटणीस कॉ. शिवकुमार गणवीर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्याध्यक्ष कॉ. नामदेव चव्हाण राहतील.

परिषदेत मुख मार्गदर्शक म्हणून संघटनेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. राम बाहेती, भाकपचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य कॉ. तुकाराम भस्मे, जिल्हा सचिव कॉ. संजय मंडवधरे, विजय बचाटे, बीकेएमयुचे राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले, भाकपचे जिल्हा सचिव सुनील मेटकर, आयटकचे जिल्हाध्यक्ष जे. एम. कोठारी, सेवानिवृत्त शाखा अभियंता लक्ष्मणराव धाकडे हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. शेतीमध्ये यांत्रिकीकरणाच्या वाढत्या वापरामुळे शेतमजुरांचा रोजगार अत्यल्प झाला आहे. शेतमजुरांना अत्यल्प तर महिलांना नगण्य मजुरी मिळत आहे. ग्रामीण भागातील शेतमजुरांचे मोठ्या प्रमाणावर शहराकडे स्थलांतर होत आहे. ऊस तोडणीसाठी देखील मजूर जात आहेत. अनेक ठिकाणी त्यांना वेठबिगारासारखी वागणूक मिळते. उद्योगपतींना जमीन खरेदीसाठी मर्यादा ठेवली नाही. सिलिंग कायद्याची योग्य अंमलबजावणी झाली नाही. जमिनीची गेल्या अनेक वर्षापासून पुनर्रचना झाली नाही. त्यामुळे लाखो शेतमजूर हे अद्यापही भूमिहीन आहेत. गेल्या पन्नास वर्षात भूमिहीनांना जमिनी देण्यासाठी सरकारने कोणतीही पावले उचलली नाहीत. राज्यभरात लाखो भूमिहीन सरकारी पडित गायरान जमीन कसून उपजीविका करत आहेत. ग्रामीण भागात आरोग्य सेवेची स्थिती अतिशय विदारक आहे. आरोग्य विषयक शिक्षण अत्यंत महागडे करून शेतमजूर कष्टकर्यांना आरोग्यसेवा मिळणे अत्यंत कठीण झाले आहे. त्यामुळे शेतमजूर व ग्रामीण गरिबांना मोफत आरोग्य सेवा मिळण्याची गरज आहे. आदी विषयांवर या परिषदेत चर्चा करुन ठराव मांडले जावून ते पारित केले जाणार आहेत.

परिषदेला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन चंद्रकांत वडस्कर (जिल्हाध्यक्ष), सुनील घटाळे (कार्याध्यक्ष), नारायण भगवे (सरपंच वाघोडा) शाहीर धम्मा खडसे, ज्ञानेश्वर मेश्राम, जयेंद्र भोगे, प्रज्ञा बनसोडे, प्रतिभा मेश्राम, सुरेश शंभरकर, इस्राईल शहा, वैशाली निस्वादे, किशोर काळे, बापूराव बाळापुरे, लक्ष्मण भगेवार, बाबाराव इंगळे, दिगंबर नगेकर, अशोक सरदार, रामकृष्ण वाडकर, माणिक मानकर, राजाभाऊ राऊत, मुरलीधर तेलंग, प्रमोद सोनुले, प्रशांत सांगोळे, अलका तायडे, संगीता पखाले, सुनीता चाहांदे, रेखा हिंगले, संतोष भोयर, मंगला उदासी, चरणदास वरघट. राजकुमार बनसोड, पद्मा कावळे, अनिता हरले, संदिप उके, संदिप नांदणे, सविता निलतकर, नरेश नितनवरे, राहुल कुकडे, कल्पना फुंडे यांनी केले आहे.

# चांदूर रेल्वे आयटीआयमध्ये रक्तदान शिबीर उत्साहात

## 39 पिशव्या रक्तसंकलन



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.11 )** - स्थानिक डॉ. सी. व्ही. रमण औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे सोमवारी (ता. 10) रक्तदान शिबीराचे आयोजन प्राचार्य राजेंद्रकृष्ण नेमाडे यांच्या मार्गदर्शनात व प्रभारी प्राचार्य निरंजन मुरादे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडले. यावेळी 39 पिशव्या रक्तसंकलन करण्यात आले. तसेच 15 कर्मचारी - प्रशिक्षणार्थ्यांनी मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प करून त्याचे फॉर्म सुध्दा भरून दिले. सदर शिबीराचे उद्घाटन प्रभारी प्राचार्य निरंजन मुरादे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रक्तपेढीचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अनुभव उराण, जनसंपर्क अधिकारी मिलींद तायडे व नेत्रदान समुपदेशक निलेश ढेंगळे यांची उपस्थिती होती. यावेळी 39 प्रशिक्षणार्थी, शिल्पनिदेशक, कर्मचारी यांनी रक्तदान करून सहभाग नोंदविला. रक्त संकलनाचे कार्य जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्तपेढीच्या चमुने केले. तसेच मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प सुध्दा करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रमोद वारकड, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी संजय गुल्हाने यांच्यासह संस्थेतील सर्व शिल्पनिदेशक, कर्मचारीवृंद व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

# जगदंब महाविद्यालयात शेती विषयावर कार्यशाळा




**महासागर प्रतिनिधी**


**अचलपूर, ( दि.11 )**- अचलपूर येथील जगदंब महाविद्यालयात नांदी फाऊंडेशनच्यावतीने नुकतेच 'रिजनरेटीव ॲयग्रीकलचर' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने या कार्यशाळेत सहभागी झाले होते. महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाने विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबवून त्यांना जैविक शेतीचे धडे दिले. कार्यशाळेत नांदी फाऊंडेशनच्या दोन प्रशिक्षकांनी बहुमूल्य मार्गदर्शन केले. अखेरच्या दिवशी गो फार्म लॅब साऊर येथे जैवतंत्रज्ञान वर मुलांना प्रशिक्षण देण्यात आले.

कार्यक्रमाचे उदघाटन प्रासंगिक संस्थेचे उपाध्यक्ष उमाकांत शेरकार यांच्रूा हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. एम. कोहळे होते. या तीन दिवसीय कार्यशाळेच्या यशस्वितेकरिता वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. जी. खापेकर, डॉ. प्रा. व्ही. पी. देशमुख, प्रा. अभिजीत पाखरे, कु. सविता देशभ्रतार, कु. काजल भोरे, कु. शिवानी सरोदे, संदीप रावेकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता अखेर राष्ट्रगीताने करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पी. जी. खापेकर यांनी केले तर पाहुणे आणि मार्गदर्शकांचा परिचय प्रा. व्ही. पी. देशमुख यांनी करुन दिला.

# शेकडो वर्षांची परंपरा नामशेष होण्याच्या मार्गावर

## धान्य मोजण्याची जुनी मापे आजही जुन्या शेतकऱ्यांचे विश्वासू मोजायचे साधन





**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट, ( दि. 11 ) :** आज कालच्या डिजिटल युगात माणूस जीवन जगताना आपले सर्वकाही व्यवहार मोबाईलच्या सहाय्याने तर इतर उपकारणाच्या माध्यमातून करत असला तरी जुनं ते सोनं या युक्तिवादावर आजही अनेक शेतकरी विश्वास ठेऊन आहे. हा विश्वास म्हणजे शेकडो वर्षांपूर्वी आठवडी बाजाराची परंपरा डोळ्यासमोर आल्यावर त्या बाजारात गेल्यावर ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ इ. धान्य तर, जवस, तीळ, मूग, उडीद, सर्व डाळी याची एक वेगळी अर्थात पोत्यावर थाटलेली ही दुकाने आणि हा सर्व माल विकण्यासाठी उन्हातान्हात बसलेला शेतकरी जो स्वत:ला कधीच मालक म्हणवून घेत नव्हता तो आठवतो. ग्राहकांच्या मागणीनुसार शेर, पितळाची किंव्हा पर्त्याच्या अधुली मापाच्या साहाय्याने मोजमाप करून वरील धान्य व कडधान्य विक्री करण्याची पद्धत होती. ती आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

### ग्राहकांना देतात झुकते माप

ग्राहक हेच आपले माय बाप समजून भाऊ, दादा, आण्णा, आई, माऊली हे त्यांचे ग्राहकांना बोलतानाचे नम्रतेचे शब्द तर ग्राहकांच्या मागणीनुसार शेर, पितळाची किंव्हा पर्त्याच्या अधुली मापाच्या साहाय्याने मोजमाप करून वरील धान्य व कडधान्य विक्री करण्याची पद्धत होती. लोखंडी पर्त्याची मोजमापाची साधने अर्थात आठवा, अधुली याच्या साहाय्याने शेतकरी मागणीनुसार आपल्या ग्राहकांना सर्व वस्तू इमानदारीने देत असे. त्यात माप पूर्ण झाल्यावरही आणखी जास्त देण्याची अनोखी परंपरा होती तर भाजीपाला हा जुडी किंव्हा तराजूने देत परंतु त्यातही दगडाची मापे आणि वजन करताना ग्राहकांना झुकते असे जादा माप देऊन आपला धर्म शेतकरी राजा पाळत होता.

### आरोग्यदायी अन संस्कृती जपणारा आठवा

जुन्या संस्कृतीप्रमाणे धान्य मोजण्याचे लोखंडाच्या पर्त्याचा हा आठवा प्रत्येक घरातील एक वेगळा सदस्य होता जर कधी मान दुखू लागली तर आठवा उशाखाली घेऊन उपचाराची पद्धत होती, तर मुका मार लागल्यावर त्यात शेणाच्या गौऱ्याचा निखारा घालून शेक देण्याचा उपचार होता. तर नवीन लग्न झाल्यावर आपली सून ही लक्ष्मी म्हणून आपल्या घरात प्रवेश करत आहे असं समजून या आठव्यात तांदूळ भरून तो मुख्य प्रवेशद्वारावर उंन्यां-यावर ठेवला जायी व त्या आठव्याला नवीन लग्न होऊन आलेली मुलगी आपल्या उजव्या पायाने ठोकर मारून प्रवेश करण्याची परंपरा होती ती आजही कायम असली तरी आठव्याची जागा स्टीलच्या तांब्याने घेतली.

### ग्राहकांना देवचं मानतो

काळ कितीही बदलला असेल मात्र शेतकरी राजा हा आजही ग्राहकांना देवचं मानतो तर ह्याच बाजाराच्या संस्कृतीवर सध्याच्या डिजिटल संस्कृतीने अर्थात मॉलने अतिक्रमण केले व काटेकोर केलेले वजन मापानुसार प्रत्येक वस्तू अथवा प्लास्टिकच्या पिशवीत पॅक करून ग्राहकांना देण्याची नवीन सुविधा सुरु झाल्याने बाजारात जाऊन खरेदी करण्याचा आनंद मात्र लोप होत चाललेला आहे. अशाच या बाजारातील एक आठवण म्हणून जुन्या संस्कृतीला उजाळणी देताना लोप चाललेला आठवा मात्र आजही आदर्शाचे प्रतीक आहे हीच आपली संस्कृती आहे कि, जिचा आपणाला सार्थ अभिमान आहे.

### आजही बाजार पण बदलले आहे स्वरूप

पूर्वीसारखा बाजार आजही आहे मात्र याच बाजारात - इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, मोबाईलच्या आधारे ऑनलाईन पेमेंट सुविधा झाल्यामुळे पैशाचा बटवा किंव्हा कोपरीच्या खिशात असणाऱ्या एक रुपयापासून ते दहा, वीस रुपयांच्या नोटा, सुट्ट्या - पैशांची चिल्लर घेऊन आता कोणीही दिसत नाही त्यामुळे बदलत्या काळानुसार डिजिटल युगात बाजारही डिजिटल झाला असून जुने शेतकरी ही परंपरा क्वचितचं जोपसताना दिसतात तर अशा शेतकऱ्यांकडे आजकालचे लोक आश्चर्याने बघतात.

# चुरणी ग्रामीण रुग्णालयात आरोग्य व दंत चिकित्सा शिबिर

- आठवड्यातून चार दिवस होणार तपासणी
- चाळीस गावातील रहिवाशांना लाभ



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि. 11 )**- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत मेळघाटच्या चूरणी येथील ग्रामीण रुग्णालयात आरोग्य व दंतचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील 40 ते 50 गावांमधील आदिवासी रहिवाशांना या शिबिराचा लाभ होणार आहे. आठवड्यात चार दिवस सोमवार, मंगळवार, बुधवार आणि गुरुवार या दिवशी हे शिबिर राहणार आहे.

आज आरोग्य सुविधा दिवसेंदिवस महागडी होत आहे. सर्वसामान्यांना आर्थिक अडचणींमुळे आरोग्य समस्यांवर उपचार घेणे परवडत नाही. गरीब कुटुंबातील अनेक रुग्ण पैसा नाही म्हणून आजार अंगावर काढतात. अशा रुग्णांना दिलासा देण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे रुग्णांच्या आजाराचे निदान होऊन त्यावर योग्य उपचार करता येणे शक्य होणार आहे. या शिबिरामध्ये दंतचिकित्से सोबतच हायड्रोसिल, हर्निया, शरीरातील लहान मोठ्या गाठी, मोतीबिंदू, महिलांशी संबंधित आजार, लहान मुलांचे आजार, मधुमेह, रक्तदाब, दमा अशा आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांची तपासणी करून निदान करण्यात येईल व त्यानंतर त्यांना आवश्यक उपचाराची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या उद्देशाने चुरणीच्या ग्रामीण रुग्णालयात होत असलेल्या या शिबिरातून रुग्णांना पूर्णत: मोफत स्वास्थ सुविधा मिळणार आहेत. या शिबिराचा परिसरातील रहिवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन चुरणी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे 'बापूराव दलपतराव इंगोले' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन -मौजे-कांडली, सर्वे क्रं. 118/3, प्लॉट क्र. 8, ता. अचलपूर जिल्हा. अमरावती.

चतु. सीमा: पूर्वे: प्लॉट क्रं. 7 पश्चिम: प्लॉट क्रं. 9

उत्तर: प्लॉट क्रं. 14 दक्षिण: लेआउट रस्ता

सदर मिळकत माझे पक्षकार 'बापूराव दलपतराव इंगोले' यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी SMFG INDIA HOME FINANCE COMPANY. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केला असता वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 03/09/2013 रोजीचे दस्त क्र. 3829 गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमतेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली देलेल्या माझ्या मोबाइल क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला

ADVOCATE

रवींद्र रू. वाटाणे

स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती

मो. नं. 9823698745

# महिलांमध्ये वाढतेय अर्थभान

गेल्या पाच वर्षांत भारतातील महिला कर्जदारांची संख्या २२ टक्क्यांनी वाढली असल्याचे एक अहवाल दर्शवतो. त्याचप्रमाणे महिलांच्या कर्जाचा मोठा भाग उपभोग मागणी पूर्ण करण्यासाठी होता आणि व्यवसायांसाठी तुलनेने कमी कर्जे घेतली गेली, ही बाबही यातून समोर येते. हा अहवाल ट्रान्सयुनियन सिबिल, नीती आयोगाच्या महिला उद्योजकता प्लॅटफॉर्म आणि मायक्रोसेव्ह कन्सल्टिंग यांनी अलिकडेच प्रकाशित केला आहे.

नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी व्ही आर सुब्रमण्यम यांनी दिलेल्या निवेदनानुसार, २०१९ ते २०२४ या काळात भारतात कर्ज घेणाऱ्या महिलांची संख्या २२ टक्क्यांच्या दराने वाढली आहे. महिला



कर्जदारांसाठी उपभोग कर्ज हे पसंतीचे उत्पादन असले तरी, आता अधिकाधिक महिला व्यवसाय कर्जेदेखील घेत आहेत. अहवालात म्हटले आहे की, २०२४ मध्ये महिलांनी व्यवसायांना वित्तपुरवठा करण्यासाठी फक्त तीन टक्के कर्जे घेतली होती तर ४२ टक्के कर्जे वैयक्तिक कर्जे, ग्राहकोपयोगी टिकाऊ कर्जे, गृहमालकी यासारख्या वैयक्तिक वित्त उत्पादनांसाठी आणि ३८ टक्के कर्जे सोन्यावर घेतली होती.

**अर्थविचार**

अहवालानुसार, व्यवसायासाठी उघडलेल्या कर्ज खात्यांची संख्या आता ४.६ पट वाढली आहे, परंतु २०२४ मध्ये महिलांनी घेतलेल्या एकूण कर्जांपैकी ही कर्जे फक्त तीन टक्के आहेत.
भारतातील अधिकाधिक महिला कर्ज मागत आहेत आणि आपल्या क्रेडिट स्कोअरवर सक्रियपणे लक्षही ठेवत आहेत. डिसेंबर २०२४ पर्यंत सुमारे २.७ कोटी महिला आपल्या कर्जाचा मागोवा घेताना दिसल्या. नक्कीच हे त्यांच्या वाढत्या आर्थिक जागरूकतेचे प्रतिबिंब आहे. कर्ज घेणाऱ्या महिलांपैकी ६० टक्के महिला शहरी आणि ग्रामीण भागातील असल्याचेही हा अहवाल स्पष्ट करतो. महिलांची तरुण पिढीही त्यांच्या कर्जांवर देखरेख ठेवण्यात आघाडीवर आहे. या पार्श्वभूमीवर महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देणे हा भारतातील कार्यबलात प्रवेश करणाऱ्या महिलांसाठी रोजगाराच्या संधी सुनिश्चित करण्याचा एक मार्ग आहे, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

# अस्मिता




# सागरसम्राज्ञी अन्यया

**मानिनी**

समुद्राच्या खोल पाण्यात एकटीने तब्बल ३,००० मैलाचा प्रवास करणे कसे असेल याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? पण बेंगळुरूच्या रहिवासी असणाऱ्या अनन्या प्रसादने हे करुन दाखवले. ३४ वर्षीय अनन्याने एकटीने अटलांटिक महासागर पार केला. त्यासाठी तिला सलग ५२ दिवस कठीण प्रवास करावा लागला. या काळात तिने केवळ शारीरिक आणि मानसिक ताकदीचेच प्रदर्शन घडवले नाही तर मानसिक आरोग्य आणि गरजू मुलांसाठी १.५ लाख पौंडांपेक्षा जास्त निधीही उभा केला. म्हणूनच अनन्याचे हे धाडसी पाऊल केवळ वैयक्तिक कामगिरीच नाही तर समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी एक मोठे प्रयत्न आहे, असे म्हणावे लागेल.

अनन्याचा हा प्रवास ११ डिसेंबर २०२४ रोजी कॅनरी बेटांमधील ला गोमेरा येथून सुरू झाला आणि ३१ जानेवारी २०२५ रोजी अँटिग्वा येथे संपला. प्रसिद्ध कन्नड कवी जी एस शिवरुद्रप्पा यांची नात असणाऱ्या अनन्याने तिला मिळालेला सांस्कृतिक वारसा आणि वैयक्तिक आकांक्षा यांचा उत्तम संयोग साधत ही सहल आखली आणि पूर्ण केली. अनन्याने या सहलीची तयारी करण्यासाठी तीन वर्षांहून अधिक काळ कठोर प्रयत्न केले. यामध्ये विशेष रोइंग तंत्रांचे प्रशिक्षण, शारीरिक ताकद आणि सहनशक्ती वाढवणे तसेच मानसिक कणखरता वाढवणे याचा समावेश होता.

या सोलो प्रवासात अनन्याला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. धोकादायक समुद्री परिस्थिती, ऑर्का व्हेलशी झालेला सामना, खराब हवामान आणि प्रवासात सुकाणूला क्षती पोहोचल्यामुळे उद्‌भवलेल्या गंभीर समस्यांना तिला तोंड द्यावे लागले. पण तांत्रिक कौशल्य आणि मानसिक बळावर तिने हार न मानता प्रवास सुरूच ठेवला. अनन्या दररोज सुमारे ६०–७० किलोमीटर अंतर कापत असे. आहार आणि पाण्याच्या चोख योजनेमुळे तिला या कठीण परिस्थितीत टिकून राहण्यास मदत झाली.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे अनन्याचा हा प्रवास केवळ वैयक्तिक कामगिरी नव्हता तर समाजात सकारात्मक बदल घडवून आणणे हे त्यामागील उद्दिष्ट होते. या प्रवासातून तिने दक्षिण भारतातील अनाथ मुलांसाठी काम करणाऱ्या 'मेंटल हेल्थ फाउंडेशन' आणि 'दीनबंधू ट्रस्ट'साठी १.५ लाख पौंडापेक्षा जास्त निधी उभारला. या योगदानातून वैयक्तिक प्रयत्नही समाजात मोठे बदल घडवून आणू शकतात, हे दिसून येते.

अनन्याचा प्रवास एक मजबूत संदेश देखील देतो. तो महिला आणि सामान्यजनांना धैर्य आणि प्रेरणा देतो. लोकांमधील पारंपरिक साहसी खेळांना प्रोत्साहन देण्याचे मोठे काम याद्वारे आपसूकच होते. अनन्याने तिचा संघर्ष सर्वांसोबत शेअर केला आणि सोशल मीडियावर या प्रवासाची माहिती दिली. यातूनही इतरांसाठी प्रेरणास्रोत निर्माण झाले असणार यात शंका नाही. या सगळ्या प्रवासातून तिचे धैर्य, जबाबदारी आणि बदलाची शक्ती प्रतिबिंबित होते. ती नवे काही करण्याची ऊर्जा देतो. अन्यन्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा.



# प्रवासाची सज्जता करताना...

**भटकंती**

लवकर सुट्टीचा काळ सुरू होईल. तेव्हा आत्तापासूनच प्रवासाचं नियोजन सर्वात महत्त्वाचे आहे. त्यासाठी आधी तुमचं बजेट ठरवा. नंतर त्या बजेटमध्ये कुठे जाता येईल याचा विचार करा. परदेशात जायचं की भारतातच फिरायचं हे आधी ठरवा. ठिकाण ठरलं की प्रवासाचं माध्यम ठरवा. विमानानं जाणार असाल तर तिकिटं लवकर बुक करा. विमानाचं भाडं सतत वाढत राहतं. ट्रेनचं तिकिटही लवकर बुक करा. यामुळे तुम्ही वेटिंग लिस्टच्या कचाट्यात सापडणार नाही.

* फिरायच्या ठिकाणी सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करा. मेट्रो, बस, टॅक्सी यांनी प्रवास करा. यामुळे तुम्हाला शहराची माहिती होईल आणि पैसेही वाचतील. विमानानं प्रवास करायचा असेल तर पहाटे किंवा रात्रीचं विमान घ्या. या वेळात विमानाचं भाडं कमी असतं.

* हॉटेलवर फार खर्च करू नका. ठिकठाक आणि प्राथमिक गरजा पूर्ण करणारं हॉटेल निवडा. स्वच्छतेचा विचार करा. हॉटेलमध्ये फार सोयीसुविधा नसल्या तरी चालतील.

* तुम्ही कुटुंबासह किंवा मित्र–मैत्रिणींसोबत फिरायला जाणार असाल तर त्या ठिकाणी पोहोचल्यावर एकट्यानं भटकंती करायला आलेल्या किंवा कुटुंबासह आलेल्या लोकांशी मैत्री करा. त्यांच्यासोबत फिरा. यामुळे प्रवास आणि जेवणाचा खर्च वाटून घेता येईल.

* ज्या शहरात किंवा राज्यात फिरायला जाणार असाल तिथले प्रसिद्ध पदार्थ खा. उगाचच हॉटेलमध्ये पंजाबी किंवा तत्सम खाण्यावर पैसे घालवू नका. तिथली स्वस्तात खाणं मिळण्याची ठिकाणं शोधा. ॲप्सवरून काही हॉटेल्स शोधता येतील.

# काम होईल सोपे

**नोंद घ्या**

येत्या काळात बरेच लग्नमुहूर्त आहेत. तेव्हा तुमच्याही घरात मंगलकार्य असेल तर पाहुण्यांची यादी आलीच. पाहुण्यांची यादी, मेन्यूची यादी, खरेदीची यादी, इतर कामांची यादी... या यादीला अंतच नसतो. या याद्या करणं म्हणजे डोक्याला शॉटच! पण टेक्नॉलॉजीनं हे काम सोप्पं केलंय. 'एव्हरनोट' नावाच्या ॲपवर तुम्ही याद्या करू शकता. या याद्यांना रंगही देता येतील. शिवाय या याद्या अपडेटही करता येतील. मग याद्या करण्याचं काम सोपं झालं ना?



* लग्नप्रसंगी मस्त बारीक दिसायला हवं. तुमचं वाढलेलं वजन कमी करण्यासाठी टिप्सही हव्यातच ना. डाएटिशियनकडे जायला फार वेळ नाहीए. मग करायचं तरी काय? 'फिटोक्रसी' नावाचं ॲप तुम्ही डाऊनलोड करू शकता. या ॲपवर तुमच्या शारीरिक हालचाली, व्यायाम, एअरोबिक्स यांची नोंद ठेवता येईल. यावर पॉईंट्‌ही मिळत जातील. खास लग्नाळूंसाठीचं हे ॲप आहे.







* लग्न म्हणजे खिशाला चाट. प्रचंड उधळपट्टी. बजेट, सेव्हिंग्ज, सगळ्याची वाट लागते. आपलं लग्न आऊट ऑफ बजेट जाऊ नये यासाठी 'मिंट' ॲप डाऊनलोड करा. या ॲपमुळे तुम्हाला खर्चावर नियंत्रण ठेवता येईल. जास्त खर्च करत असाल तर त्याची सूचना तुम्हाला दिली जाईल.

* लग्नप्रसंगी फोटोग्राफर हवाच. पण तुमच्या मित्र–मैत्रिणींनी, नातेवाईकांनी काढलेले फोटो धम्माल असतात. 'वेडपिक्स' या ॲपद्वारे लग्नाचे फोटो क्लिक करून इतरांसोबत शेअर करता येतील. तुमच्या मित्र–मैत्रिणीचं लग्न असेल तर तुम्हीही त्यांचे फोटो काढू शकता. काही हटके क्षण तुम्हाला कॅमेऱ्यात बंदिस्त करता येतील.

* लग्न म्हणजे भरपूर पाहुणे. पाहुण्यांची वर्दळ सतत सुरू असते. या गोंधळात एखाद्याला गाठणं महाकठीण काम. निरोप द्यायचा तर सगळ्यांना फोन करणं वैतागवाणं असतं. अशा वेळी 'ग्रुप कम्युनिकेशन' ॲप तुम्हाला डाऊनलोड करता येईल. तुमचा ग्रुप तयार करा आणि एकाच वेळी सगळ्यांना मेसेज पाठवा.

# ऋतूबदलातील आहारशास्त्र

**फिटनेस फंडा**

बदलत्या हवामानामुळे अनेकींना पोटाच्या समस्यांना सामोरे जावे लागते. तेव्हा तुम्हालाही हवामान बदलल्यामुळे पोट खराब होण्याची समस्या जाणवत असेल पचनसंस्थेतील बदल हे याचे कारण असू शकते हे जाणून घ्या. या समस्येपासून सुटका करुन घेण्यासाठी आहारात काही विशेष बदल करावे लागतील. अर्थात केवळ आहारात सुधारणा करूनच नव्हे तर योग्य वेळी योग्य आहार घेतल्यानेही पचनसंस्था मजबूत करता येते. तुमची पचनक्रिया सुधारू शकणाऱ्या अशाच काही पदार्थांबद्दल आज जाणून घेऊ या.

* बदलत्या हवामानात साखर आणि तेलकट पदार्थ पचनक्रिया आणखी बिघडवू शकतात. यामुळे पोटात जळजळ, गॅस आणि अपचन यासारख्या समस्या वाढू शकतात. म्हणूनच तळलेले पदार्थ टाळा. हलके जेवण खा.

* हळदीमध्ये दाहविरोधी गुणधर्म असतात जे पोटाच्या विकारांपासून आराम देतात. हळद पचनसंस्था स्वच्छ तसेच मजबूत करते. एक चमचा हळद मधात मिसळून घेतल्याने पोटातील संसर्ग आणि जळजळ दूर होते. तुम्ही हळद दुधात घालून देखील घेऊ शकता.

* ताजी फळे आणि भाज्या पचनासाठी खूप फायदेशीर असतात. त्यामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबर भरपूर असल्याने पचनसंस्था निरोगी राहते. म्हणूनच विशेषतः सफरचंद, गाजर आणि पालक यांचा आहारात समावेश करा. यामुळे केवळ पोट स्वच्छ होणार नाही तर शरीराला योग्य पोषण देखील मिळेल.

* केळीमध्ये पेक्टिन नावाचे फायबर असते जे कार्बोहायड्रेट्सचे



पचन नियंत्रित करते. आतड्यांसाठी देखील केळी खाणे फायदेशीर आहे कारण त्यातील प्रोबायोटिक्स आतड्यांमध्ये चांगल्या बॅक्टेरियांची वाढ घडवतात. थोडक्यात केळीचे नियमित सेवन आतड्यांच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरते.

* ओट्समध्येही भरपूर प्रमाणात फायबर असते. मुख्य म्हणजे यात कॅलरीज कमी असतात. ओट्स पचनसंस्थेचे कार्य योग्य पद्धतीने सुरू ठेवण्यास मदत करतात तसेच शरीरातील टाकाऊ पदार्थ काढून टाकण्यासही मदत करतात. यामध्ये फॉस्फरस, व्हिटॅमिन ई आणि झिंकदेखील असते जे शरीराला महत्त्वाचे पोषणमूल्य पुरवते. त्यामुळेच बदलत्या वातावरणात तुम्ही आहारात या सगळ्या घटकांचा समावेश करायला हवा.


# संतुलन जपायचं तर...

**आरोग्य**

शरीरात जाडीशी संबंधित तीन प्रकारची संप्रेरकं पहायला मिळतात. लेप्टीन, इन्सुलिन आणि टेस्टोस्टेरॉन अशी त्यांची नावं आहेत. या संप्रेरकांच्या प्रमाणित मात्रेपेक्षा कमी अथवा अधिक प्रमाण आढळून आलं तर असंतुलन निर्माण होतं. लेप्टीन या संप्रेरकाला मास्टर हार्मोन असं म्हटलं जातं. या संप्रेरकामुळे शरीरात पर्याप्त ऊर्जा संग्रहीत असल्याचे संदेश मेंदूपर्यंत दिले जातात. पर्यायानं मेंदू पोट भरल्याची जाणीव उत्पन्न करतो आणि आहार थांबवला जातो. जेवताना या संप्रेरकाची निर्मिती होते. मात्र त्यात व्यत्यय आल्यास मेंदुला मिळणारे संदेश थांबतात. पर्यायानं भूक भागल्याची भावनाच उत्पन्न होत नाही. यामुळे अतिरिक्त प्रमाणात अन्नाचं सेवन होतं आणि जाडी वाढू लागते. ताणतणाव, आहारात मैदा आणि साखरेचं अतिरिक्त सेवन यामुळे या संप्रेरकामध्ये असंतुलन निर्माण होतं. म्हणून प्रोटीनयुक्त आहार घेणं, आठ तास शांत झोपणं, तेल आणि तुपाचं प्रमाण मर्यादित ठेवणं, वेटलिफ्टिंग आणि कार्डिओ एक्झरसाईज करणं तसेच पॅकेटबंद अन्नघटकांचं सेवन थांबवणं हे या संप्रेरकामध्ये संतुलन टिकवण्याचे उपाय आहेत.

इन्शुलिन हे संप्रेरक शरीरातील चरबीविषयक संदेश देण्याचं काम करतो. या संप्रेरकामध्ये असंतुलन निर्माण झाल्यास कंबरेखाली चरबी साठू लागते. हे टाळायचं असेल तर आहारात साखर, मीठ, मैदा, व्हाईट ब्रेड आदी कार्बोहायड्रेड युक्त पदार्थांचं सेवन सीमित करायला हवं.

टेस्टोस्टेरोन या संप्रेरकातील असंतुलनामुळे मांसपेशींवरचं नियंत्रण कमी होतं, शरीराची ताकद कमी होते, हाडं कमकुवत होतात आणि चिडचिडेपणा वाढतो. हे धोके टाळण्यासाठी चौरस आहार घेणं आणि नियमित व्यायाम करणं गरजेचं ठरतं.



**लक्ष द्या**

## कचऱ्यातून कलेकडे




भारतात दरवर्षी सुमारे ४.४० अब्ज टन टोमॅटोचे उत्पादन होते आणि यातील सुमारे ३०–३५ टक्के टोमॅटो वाया जातात. पण 'द बायो कंपनी' ने या वाया जाणाऱ्या टोमॅटोच्या कचऱ्यापासून बायो–लेदर तयार करण्याचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. या प्रक्रियेत पॉलीयुरेथेन आणि पॉलीव्हिनिल क्लोराईड वापरले जाते. यातून पारंपरिक बनावट लेदरपेक्षा अधिक टिकाऊ आणि पर्यावरणास अनुकूल उत्पादन मिळते, असा कंपनीचा दावा आहे. टोमॅटोमध्ये आढळणारे पेक्टिन आणि इतर नैसर्गिक घटक या उत्पादनाला अतिशय मजबूत बनवतात आणि ते खऱ्या चामड्यासारखे वाटते. या नाविन्यपूर्ण स्टार्टअपची सुरुवात २६ वर्षीय प्रीतेश मिस्त्री यांनी केली असून 'द बायो कंपनी' (टीबीसी) ही त्यांची संस्था आहे. त्यांच्या प्रयत्नांना व्हेगन फॅशन अवॉर्ड्समध्ये 'सर्वोत्कृष्ट नवोन्मेष' पुरस्कारही मिळाला आहे.

**प्रेरक**

## वेळ दवडू नका

मासिक पाळीच्या वेळी शरीरातून बाहेर पडणारे रक्त कधीकधी घट्ट होते आणि गुठळ्यांच्या स्वरूपात बाहेर पडते. या गुठळ्या लहान किंवा मोठ्या असू शकतात तर त्यांचा रंग हलका लाल ते गडद लाल रंगाचा असू शकतो. हे गोठलेले रक्त ऊतींसारखे, जेलसारखे दिसते. पण प्रत्येक वेळी मोठ्या गुठळ्या दिसल्या



तर ही स्थिती सामान्य नसल्याचे जाणा आणि वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घ्या. गर्भाशयात गाठी तयार झाल्यामुळे जास्त रक्तस्राव होतो तेव्हा गर्भाशयातील फायब्रॉइड्सचा त्रास असू शकतो. गर्भाशयाचे अस्तर स्नायूंमध्ये वाढते तेव्हा ॲडेनोमायोसिसची शक्यता वाढते तर गर्भाशयाचे आतील आवरण शरीराच्या इतर भागांमध्ये वाढू लागते तेव्हा एंडोमेट्रिओसिसचा धोका असतो.

**परफेक्ट**

## खात्रीशीर आणि वेदनाविरहित परिणाम



शरीरावरील नकोसे केस काढून टाकण्यासाठी शेव्हिंग, वॅक्सिंग, थ्रेडिंग आणि डिपिलेटरी क्रीम अशा विविध पद्धतींचा अवलंब केला जातो. मात्र कायमस्वरुपी हा त्रास घालवण्यासाठी लेसर प्रक्रिया करणे सोयीचे ठरते. या प्रक्रियेचे अनेक फायदे आहेत. जसे की, लेसरमुळे केस कायमचे काढून टाकण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार केस काढण्याची गरज नाहीशी होते. काही वेळा नियमितपणे लेसर प्रक्रिया केल्यास कायमस्वरूपी निकाल मिळतो. ही प्रक्रिया त्वचेसाठीही सुरक्षित आहे. ती फक्त केसांच्या रंगद्रव्यावर (मेलेनिन) काम करते आणि त्वचेच्या इतर पेशींना हानी पोहोचवत नाही. याचा अर्थ त्वचेचे कोणतेही नुकसान होत नाही. मुख्य म्हणजे ती कमी वेदना अगदी वेदनारहित परिणाम दाखवते.

# शेतकऱ्यांच्या दृष्टीने कर्जमाफीचा मुद्दा महत्त्वाचा

## मुद्दा पुन्हा मांडणार : सुधीर मुनगंटीवार



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :** सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमाफी करू, असे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीवेळी दिले होते. अर्थमंत्री अजित पवार यांनी आज सादर केलेल्या अर्थसंकल्पात शेतकरी कर्जमाफीची घोषणा होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र अर्थसंकल्पात कर्जमाफीविषयी कोणताही उल्लेख करण्यात आला नाही. यावरून भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी आपली भूमिका मांडली आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शेतकरी कर्जमाफी करण्याची मागणी अर्थसंकल्पानंतर केली. आकडेवारीसहित मी अर्थसंकल्पावरील चर्चेत बोलताना हा मुद्दा मांडणार असल्याचे मुनगंटीवार म्हणाले. अर्थसंकल्प हा जनतेच्या प्रतिनिधींचा असावा. हा अधिकाऱ्यांचा असता कामा नये, याची काळजी घ्यावी लागते, असे म्हणत मुनगंटीवार यांनी स्वतःच्या सरकारला खडेबोल सुनावले.

**कर्जमुक्ती देण्याचा विचार सरकारने करावा**

आजही माझी मागणी आहे आणि मी अर्थसंकल्पावर बोलताना आकडेवारीसहित मी हा मुद्दा पुन्हा मांडणार असल्याचे सुधीर मुनगंटीवार म्हणाले. कदाचित हा मुद्दा राहिला असेल, पण, हा मुद्दा राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या दृष्टीने उत्पन्न वाढवण्याच्या स्त्रोतांबद्दलही मी चर्चा करणार आहे. पण, शेतकऱ्यांना मात्र या दृष्टीने कर्जमुक्ती देण्याचा विचार सरकारने करावा, ही विनंती मी विधानसभेत निश्चित करणार आहे, असे सुधीन मुनगंटीवार म्हणालेत.

आम्ही लोकांमध्ये जातो. लोकांच्या समस्या ऐकतो. ते प्रश्न अर्थसंकल्पातून कसे सोडवायचे? ते सोडवताना त्या दृष्टीने आपण विविध तरतुदी कशा करायच्या, याचा विचार अर्थसंकल्पात करतो, असे सुधीर मुनगंटीवार म्हणाले. प्रश्न शिस्त लावणे किंवा लोकप्रिय घोषणांचा नाही. आपण जो राज्याच्या प्रगतीचा विभिन्न क्षेत्रामध्ये एक आराखडा तयार करतो. त्यानुरुप असलेल्या संसाधनांचा महत्तम उपयोग करणे म्हणजे अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्प हा जनतेच्या प्रतिनिधींचा असावा. हा अधिकाऱ्यांचा असता कामा नये, याची काळजी घ्यावी लागते, अशा शब्दांत सुधीर मुनगंटीवार यांनी स्वतःच्या सरकारला सुनावले.

# गृहनिर्माण सोसायट्यांच्या व्यावसायिक गाळ्यात दारु विक्रीसाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' बंधनकारक

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ११ :** राज्यातील गृहनिर्माण सोसायट्यांच्या व्यावसायिक गाळ्यात बियर किंवा दारुचे दुकान सुरू करण्यासाठी यापुढे संबंधित सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) बंधनकारक राहील. सोसायटीच्या मंजुरीशिवाय नवीन बियर शॉपी किंवा दारू दुकान सुरू करता येणार नाही, अशी महत्त्वपूर्ण घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत केली.

अजित पवार यांनी महानगरपालिका क्षेत्रातील मद्यविक्री दुकानांबाबत मोठा निर्णय जाहीर केला आहे. जर एखाद्या महापालिका वॉर्डमध्ये मद्यविक्री दुकान बंद करण्याचा प्रस्ताव आला, तर त्यावर मतदान घेतले जाईल. या मतदानात ७५ टक्के लोक जर दुकान बंद करण्याच्या बाजूने मतदान करतील, तर त्या वॉर्डमधील मद्यविक्री दुकान बंद करण्यात येईल. त्यामुळे स्थानिक नागरिकांना त्यांच्या परिसरात दारू विक्रीबाबत सोपस्कारपद्धतीने निर्णय घेण्याचा अधिकार मिळणार आहे.



विधानसभेत आमदार महेश लांडगे आणि ॲड. राहुल कूल यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे गृहनिर्माण सोसायट्यांमधील दारू विक्रीवर प्रश्न उपस्थित केला. राज्यातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये दारू विक्रीमुळे कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होत आहेत. त्यामुळे अशा दुकानांना परवानगी देताना स्थानिक सोसायटीच्या संमतीशिवाय परवानगी देऊ नये, अशी मागणी करण्यात आली.

माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीही चर्चेत भाग घेत दारूविक्रीसंदभार्तील नियमन आणि कायद्याच्या कडक अंमलबजावणीवर भर देण्याची आवश्यकता व्यक्त केली.

यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले की, राज्य सरकारची भूमिका दारूविक्री वाढवण्याची नसून दारूबंदी नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची आहे.

अनेक दशकांपासून राज्यात दारू परवाने बंद आहेत, त्यामुळे नव्या दुकानांना परवानगी देताना अधिक बंधने घालण्याची गरज आहे. शाळा, महाविद्यालये, धार्मिक स्थळांच्या परिसरात दारू दुकाने सुरू करण्यास बंदी आहे. स्थानिक नागरिकांचा विरोध असल्यास मतदानाद्वारे दुकान बंद करण्याचा निर्णय घेता येईल. अवैध दारू विक्री रोखण्यासाठी सरकार आवश्यक ती सर्व कठोर पावले उचलेल. राज्यात दारू विक्रीला प्रोत्साहन न देता उलट अवैध दारू विक्री रोखण्यासाठी कठोर धोरण राबवले जाईल. दारूविक्रीमुळे राज्याची कायदा-सुव्यवस्था बिघडेल, असे कुठलेही प्रकार सहन केले जाणार नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# कोरटकरच्या पाठिशी ती प्रभावशाली व्यक्ती कोण?

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य करणा?या आणि जाती-जातींमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रशांत कोरटकरच्या पाठीशी निश्चितच कोणीतरी प्रभावशाली व्यक्ती असून त्याला वाचवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला जात आहे. कोरटकरला राज्य सरकारने ११ मार्चपर्यंत अटक न केल्यास शिवभक्तांच्या धैर्याचा बांध फुटल्याशिवाय राहणार नाही, असा शब्दात राजे मुधोजी भोसले यांनी सरकारला स्पष्ट इशारा दिला.

राजे मुधोजी भोसले म्हणाले, ह्यछावाह्ण चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून काही समाजकंटकांकडून वादग्रस्त वक्तव्य करून महाराष्ट्राचा सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न होत आहे. चित्रपट उत्कृष्ट आहे. हिंदी चित्रपट असल्याने संपूर्ण देशाला छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य कळले. परंतु, काही असामाजिक तत्वांना त्याबद्दल असूया वाटत आहे. त्यामुळे छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल वाईट बोलून आणि त्यांना कमी लेखून या लोकांनी आपल्या मनातील द्वेष ओकला आहे. एक विशिष्ट समाज कायम छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचा विरोध करीत आहे. ३०० ते ३५० वर्षांपासून हे असेच सुरू आहे. इतिहासाकडे इतिहास म्हणूनच बघितले तर असे प्रश्न निर्माण होणार नाहीत.

ज्यांना महापुरुषांबद्दल चांगले बोलणे शक्य होत नाही त्यांनी किमान त्यांच्याबद्दल वाईटही बोलू नये, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ११ :** मराठवाड्यासोबतच विदर्भातील काही शहरांमध्ये तापमानात वेगाने वाढ होत आहे. अकोला, ब्रम्हपूरी, चंद्रपूर या शहरातील कमाल तापमानाचा पारा वेगाने चढत आहे. नागपूर आणि वर्धा ही शहर देखील तापू लागली आहेत. दरम्यान, भारतीय हवामान खात्याने विदर्भातील काही शहरांना आजपासूनच तीन दिवसपर्यंत उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे.

राज्यात यंदा होळीच्या आधीपासूनच साधारणपणे फेब्रुवारीच्या मध्यान्हापासूनच उन्हाळ्याची सुरुवात झाली आणि त्याचवेळी तापमान ४० अंश सेल्सिअस पलीकडे गेले. संपूर्ण राज्यातच उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांना उष्णतेच्या तीव्र झळा जाणवत आहेत.

मार्च महिना सुरू होताच तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. गेल्या काही दिवसात अनेक शहरांमधील तापमान ४० अंश सेल्सिअसच्या जवळ पोहोचले आहे. उर्वरित शहरांमध्ये कमाल तापमानाचा पारा ३७ अंश सेल्सिअसच्या पुढे आहे. नागपूर, अकोला, चंद्रपूर, वर्धा आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जाण्याची शक्यता आहे.

# वाल्मीक कराडने एकदा नव्हे तर ६ वेळा खंडणी मागितली

## आवादाच्या अधिकाऱ्याचा दावा



■ **वृत्तसंस्था बीड, दि. ११ :** बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी तुरुंगात असणाऱ्या वाल्मीक कराडने आवादा कंपनीकडून एकदा नव्हे तर ६ वेळा खंडणी मागितल्याची गंभीर बाब उजेडात आली आहे.

स्वतः आवादा कंपनीच्या अधिकाऱ्याने हा दावा केल्याचे तपास यंत्रणेने सादर केलेल्या आरोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. यामुळे वाल्मीक कराडचा पाय आणखी खोलात गेला आहे.

आवादा कंपनीचे प्रकल्प अधिकारी सुनील शिंदे यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात नमूद करण्यात आले आहे की, वाल्मीक कराड व त्याच्या गुंडांचे सप्टेंबर ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत कंपनीच्या अधिकाऱ्यांना सतत फोन येत होते. पैसे द्या, नाहीतर प्रकल्पाचे काम बंद करा, अशा धमक्या ते देत होते.

वाल्मीक कराडकडून २८ ऑगस्ट २०२४ रोजी आवादाच्या अधिकाऱ्यांना खंडणीचा पहिला फोन केला होता. परळीला येऊन भेटा नाही तर काम बंद करा. तुमची कामे कुठे सुरु आहेत, याची मला माहिती आहे. तुमचे जे कोणी वरिष्ठ असतील त्यांना माझ्याकडे घेऊन या, असे वाल्मीक कराड फोनवरून अधिकाऱ्यांना सांगत होता.

प्लांट सुरू ठेवायचे असेल तर दोन कोटी रुपये द्या, नाहीतर जिल्ह्यात कुठेही काम सुरू करु देणार नाही, अशी धमकीही देण्यात आली होती. या घटनेनंतर माझे सहकारी शिवाजी थोपटे यांच्या मदतीने माझी परळीच्या जगमित्र या संपर्क कार्यालयात वाल्मीक कराड, विष्णू चाटे याची भेट झाली, असे आवादा कंपनीचे अधिकारी शिंदे यांनी आपल्या जबाबात सांगितले आहे.

वाल्मीक कराडने खंडणीसाठी केलेले फोन, कराडची भेट, सुदर्शन घुलेचा कॉल, कंपनीत येवून दिलेली धमकी , विष्णू चाटेचा कॉल आणि एकूणच या घटनाक्रमाविषयी संबंधित अधिकाऱ्याने पोलिसांनी सविस्तर माहिती दिली आहे.

# तुकाराम मुंडे यांना मराठवाड्याचे विभागीय आयुक्त म्हणून पाठवा...

## अंजली दमानिया यांची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** मराठवाड्यामध्ये गुंडगिरी कमी करण्यासाठी स्ट्रॉंग व्यक्ती देण्याची गरज आहे. त्यामुळे मराठवाड्यामध्ये तुकाराम मुंडे यांना विभागीय आयुक्त म्हणून शासनाने पाठवावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे. त्यांच्यासारख्या स्ट्रॉंग ऑफिसर आणि स्ट्रॉंग व्यक्तिमत्त्वाची महाराष्ट्राला गरज असल्याचे दमानिया यांनी म्हटले आहे.

मस्साजोगचे सरपंच देशमुख यांची हत्या झाल्यानंतर मराठवाड्यातील सामाजिक आणि राजकीय समीकरणे बदलली आहेत. मराठवाड्यामध्ये विशेषतः बीड जिल्ह्यामध्ये असलेल्या अधिकाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून बदल्या झालेल्या नसल्याची बाब समोर आली आहे. पोलिस विभागात तर अनेक अधिकारी एकाच जागेवर कित्येक वर्षांपासून काम करत असल्याचा आरोप केला जात आहे. या सर्व प्रकरणात आता मराठवाड्यामध्ये मुंडे विरुद्ध मुंडे अशा अधिकाऱ्यांचे नाव दमानिया यांनी सुचवले आहे.

दमानिया यांनी सांगितले की, माझ्याकडे अनेक प्रकरणावर पुरावे येत आहेत. रोज मेसेज येत आहेत, रोज व्हिडिओ येत आहेत. हे सर्व पाहून मला रात्रीची झोप येत नाही. धनंजय मुंडे आणि त्यांच्या विरोधातील कृषी घोटाळ्याची मोठी मालिका उपलब्ध झाली आहे.





: मुलखावेगळी माणसं :

# गुरे चारता चारता घडला कलाकार.. दगडात कोरली मूर्ती, लाकडाला दिला आकार




उत्तम येवले

जाड भारी दगडाचा छान टुमदार हत्ती, लाकडाचे घोडे, बैल, लाकडात कोरलेली श्रीकृष्णाची सुंदर मूर्ती तसेंच लाकडाचा आगळा-वेगळा कंदील अशा कलाकृती मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील मोथा गाव येथील रहिवासी उत्तम येवले यांनी बनवल्यात.

लहानपणी घरची गुरं जंगलात चरायला सोडल्यावर फावल्या वेळेत विरंगुळा म्हणून दगडांना ठोकून त्यांना कोरणे तसंच लाकडांना आकार देऊन कलाकृती निर्माण करण्याची सहज अवगत झालेली कला पुढे कुटुंबाला आर्थिक आधार देणारी ठरली. आपल्या कलाकृतीतून कुटुंबाला आर्थिक बळकटी देणारे उत्तम येवले यांच्या कला गुणांसंदर्भात जाणून घेतले असता त्यांच्या कलाकृतीचे विविध पैलू समोर आले.

बालपणी शाळेत असताना चित्रकलेशिवाय दुसऱ्या कुठल्याही विषयात आवड नव्हती. चित्रकला फार आवडायची मी छान चित्र काढायचो. पहाड, मोर, हरिण गाई, म्हशी अशी छान चित्रं काढायचो आणि चित्रकला हा विषय मला आवडायला लागला. चित्रकला आवडत असल्यामुळेच तरुणपणी घरच्या गाई, म्हशी जंगलात चालत असताना जंगलातील लाकडांना विविध आकार देण्याचा छंद लागला.

लाकडांना आकार देत असतानाच दगडावर दगड ठोकून कलाकृती निर्माण होत असल्याचं लक्षात येताच दगडांची छोटी मूर्ती देखील मी घडवायला लागलो. गाई, म्हशी चारणे, दूध काढणे, दुधाचा व्यवसाय यासोबतच नवीन कला मला अवगत झाली असं उत्तम येवले म्हणतात. घराचा उंबरठा, घराचे दार, घरातले मंदिर, पलंग, बाज, ड्रेसिंग टेबल अशा घरातल्या प्रत्येक सागवान लाकडाच्या वस्तू या मी स्वतःच्या हाताने तयार केल्या आहेत. आधी मातीच्या जुन्या घरातील सर्व साहित्य आहे. आता नवीन घर बांधताना घराची दारं-खिडक्या मी स्वतः तयार केल्या आणि दारावर कलाकृती देखील मीच कोरली आहे. आमच्या जुन्या घराची खिडकी ही माझी सर्वांत पहिली कलाकृती असल्याचं उत्तम येवले सांगतात.

मेळघाटातील अनेक गावांमध्ये मंदिरात देवाच्या मूर्ती मी स्वतः दगडावर कलाकृती करून घडवल्या आहेत. आता काही दिवसांपूर्वी जंगलात हत्ती देवाची दगडाची मूर्ती मी बनवली आहे. आमच्या घरात लाकडाची श्रीकृष्णाची मूर्ती, विठ्ठलाची मूर्ती मी स्वतः तयार केली असल्याचं उत्तम येवले सांगतात.

घरात आता नातू आहेत, भावाचीही लहान मुलं आहेत. त्यांच्याकरता लाकडाची अनेक खेळणी तयार केली आहेत. चिमणी, मोर, हरीण, गवे, गाई, बैल अशी खेळणी तयार केली आहेत. यासोबतच लाकडाच्या भल्या मोठ्या हरिणाच्या शिंगांसह असणारे मुखवटे बनवले आहेत. घराच्या भिंतीवर हे मुखवटे हुबेहूब खऱ्या हरणांचे मुखवटे असावेत असा भास घरी येणाऱ्या अनेकांना होतो असं देखील उत्तम येवले यांनी सांगितलं.

उत्तम येवले यांनी आपल्या घराच्या दारांवर कोरलेली कलाकृती घरात येणाऱ्या प्रत्येकाला आकर्षित करते. त्यापेक्षा अधिक त्यांच्या घरात असणारा खास दगडाचा हत्ती लक्ष वेधणारा आहे. चांगला भारी भक्कम वजनाचा हा हत्ती दहा, पंधरा वर्षांपूर्वी दगडात घडवला आहे. येवले यांच्या घरात असणारा लाकडाचा कंदील हा अतिशय सुंदर अशी कलाकृती असून सुमारे 25 ते 30 वर्षे जुन्या अशा या कलाकृतीवर काजळी चढली आहे. असं असलं तरी कंदीलाची आगळीवेगळी कलाकृती उत्तम येवले यांच्या कलागुणांना दाद देणारी आहे. ■ ■ ■

: वाद संवाद :

## राज्याचा अर्थसंकल्प विकासाच्या दृष्टीने समाधानकारक आहे का?

**शैलेश पेठे, अर्थ विश्लेषक**

काल राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत राज्याचा जो अर्थसंकल्प सादर केला तो सर्वसामान्यांपासून ते श्रीमंतांपर्यंत सर्वांच्या दृष्टीने समाधानकारक असाच आहे. या अर्थसंकल्पात राज्याचे नवीन औद्योगिक धोरण जाहीर करणार असल्याचे आणि राज्यात ४० लाख कोटींची गुंतवणूक होणार असून त्यातून ५० लाख रोजगार निर्माण होणार असल्याचे सूतोवाच हे नक्कीच सकारात्मक आहे. शिवाय महाराष्ट्रात सात जिल्ह्यांमध्ये वस्त्रोद्योग महामंडळ निर्माण करून महाराष्ट्राला जागतिक स्तरावरील वस्त्रोद्योग हब बनविण्याची घोषणा देखील या अर्थसंकल्पात आहे. कृषी क्षेत्रात ए आय तंत्राचा वापर,नवीन गृहनिर्माण धोरणाबतर्गत सर्वांसाठी घर अशा सर्वच योजना पाहिल्या तर हा अर्थसंकल्प नक्कीच समाधानकारक आहे.

**मीनल महाम्बरे, पत्रकार**

यंदाचा राज्याचा अर्थसंकल्प हा खास असा नाही. मागील पानावरुन पुढे चालू असेच या अर्थसंकल्पचे स्वरूप आहे. या अर्थसंकल्पात कोणत्याही नवीन स्वरूपाच्यायोजनांचा अभाव दिसतो. शिवाय शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची केवळ घोषणाच होती प्रत्यक्षात मात्र अशी कर्जमाफी दिली गेलेली नाही. याखेरीज लाडक्या बहिणीची देखील या सरकारने खूप निराशा केली असून त्यांच्या मासिक मानधनात २१०० रुपये वाढ केली गेली नाही. मुद्रांक शुल्काचा सर्वसामान्यानावर भर, शिवाय इलेक्ट्रिक वाहनावर आणि इतर वाहनांवर देखील अतिरिक्त कर,नवीन रोजगार योजनांची वानवा,सर्वांसाठी घर या मागील योजनेचीच पुनर्रघोषणा हे पाहता हा अर्थसंकल्प सर्वसामान्यांच्या तोंडाला पान पुसणारा असाच आहे. ■


## उषा इंटरनॅशनलचा कोलोसल एर्गो टिल्टिंग वेट ग्राइंडर

अगदी योग्य पीठ तयार करणे नेहमीच जड जायचे किंवा तेवढे उपयोगी (कार्यक्षम) नसायचे! उषा इंटरनॅशनल कोलोसल एर्गो टिल्टिंग वेट ग्राइंडर स्वयंपाकघरातील सोयी-सुविधा नव्याने स्पष्ट करण्यासाठी तयार करण्यात आलेला आहे आणि रोजसाठी अंतिम उपाय उपलब्ध करून देत आहे जेणेकरून इडली, डोसा, अप्पम, उथप्पम आणि इतर गोष्टी बनविण्यासाठी अगदी योग्य पीठ तयार करता येईल.

कोलोसल एर्गो मध्ये अप्रतिम वैशिष्ट्ये असल्याने ते उठून दिसते. ड्युअल फ्लो ब्रेकर्स मुळे एकसमान आणि सतत वाटले जाणे (ग्राइंडिंग) सुनिश्चित होते, तर 100% तांब्याच्या मोटरमुळे खात्रीशीर टिकाऊपणा, विश्वासार्हता आणि उर्जा कार्यक्षमता लाभते. हे पीठ वाटत असताना (ग्राइंड करत असताना) उत्कृष्ट कार्यक्षमता प्रदान करते आणि त्यामुळे वीज कमी वापरली जाते. सोप्या 105 अंशापर्यंत झुकणाऱ्या यंत्रणेमुळे पीठ आरामात बाहेर काढता येते आणि भांडं सहज साफ करता येते. त्याच्या उच्च दर्जाच्या नैसर्गिक वाटणाऱ्या दगडामुळे (ग्राइंडिंग स्टोनमुळे) पदार्थांना अस्सल चव येते आणि पोत लाभतो व 2 लिटर फूड-ग्रेड स्टेनलेस स्टील ड्रम स्वच्छता आणि टिकाऊपणा सुनिश्चित करतो. यास 10 वर्षांची मोटर वॉरंटी आणि विनामूल्य घरात (होम) सर्व्हिस दिली जात असून आपल्याला नक्कीच मानसिक शांतता लाभते. इतर ठळक वैशिष्ट्यांमध्ये पटकन व चांगल्या प्रकारे वाटण्यासाठी (ग्राइंडिंगसाठी) हेवी-ड्युटी हाय टॉर्क मोटर (3.7 किलो), जड गोष्टी असल्यावर मोटर सुरक्षेसाठी रिसेट करता येणारा ओव्हरलोड प्रोटेक्टर आणि ग्राइंडिंग प्रक्रिया सहजपणे पाहण्यासाठी मोडतोड प्रतिरोधक पारदर्शक पीसी झाकणयांचा समावेश आहे. हा वेट ग्राइंडर ॲमेझॉनवर सुद्धा उपलब्ध आहे . ■ ■




: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# नर्सच्या जीवावर बेतला मॉर्निंग वॉक

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ११ :** मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या एका परिचारीकेच्या अंगावर ट्रॅक्टर ट्रॉली उलटल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना आज मंगळवारी सकाळी घडली. प्रतिभा किर्डे असे मृतक महिलेचे नाव आहे.

परिचारीका असलेल्या प्रतिभा या दररोज पहाटे फिरायला जायच्या. आज मंगळवारी सुद्धा त्या मॉर्निंग वॉकला गेल्या होत्या. घरी परत येत असताना ट्रॅक्टर काळा बनून आला. गीता नगर भागातून घरी परत येत असताना तूर घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरची ट्रॉली महिलेच्या अंगावर उलटली. त्याखाली दबून महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. भरधाव वाहतुकीमुळे आता रस्त्यावर मॉर्निंग वॉकला जाणे देखील धोकादायक ठरत असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत होते.

# शिवसेनेत जाताच धंगेकरांची पलटी...

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :** कसब्यातील वक्फ बोर्डची जागा आम्ही लिलावात विकत घेतली. काहीच चुक नसताना आम्ही राजकीय बळी ठरलो आहोत. त्यामध्ये वरीष्ठ पातळीवरून त्रास देण्यास सुरवात झाली, कर्ज करत आम्ही ती मालमत्ता विकत घेतली आहे, असे शिवसेना नेते रवींद्र धंगेकर यांनी म्हटले आहे.

रवींद्र धंगेकर यांनी नुकताच काँग्रेसला रामराम ठोकत शिंदेसेनेत प्रवेश केला . मात्र, यावेळी त्यांनी भाजपाच्या नेत्यांनी बराच त्रास दिल्याचेही सांगितले . धंगेकर म्हणाले की, मी विधानसभा लढवली तेव्हा, लोकसभा लढवली तेव्हा आणि आता मी शिवसेनेत प्रवेश केला तेव्हा प्रत्येकवेळी हा विषय पुढे येत आहे. केवळ मला राजकीय विरोध करण्यासाठी हे सर्व काही सुरू आहे. मी वक्फ बोर्डची जागा घेतली यांचे दुःख मुस्लीम समाजाच्या व्यक्तीना व्हायला हवे होते. पण ते दुःख भाजपच्या लोकांना होत आहे. त्यांनी त्या प्रकरणी मला त्रास देण्याचा प्रयत्न केला. यावर मी हायकोर्टात गेलो. भाजपकडून झालेल्या त्रासाला मी घाबरत नाही, त्यामुळे मी पक्ष बदलला नाही.

रवींद्र धंगेकर म्हणाले की, मी काही या जमिनीसाठी काँग्रेस सोडून शिवसेनेत आलो नाही. सत्तेत असलो तर जनतेची कामे करता येतात हे कार्यकर्त्यांसह मतदारांचे मत होते, यातून मी शिवसेना पक्षप्रवेशाचा निर्णय घेतला. माझ्या पत्नीला अटक करण्याचा अनेकदा प्रयत्न झाला. पण त्याला मी घाबरलो नाही. काँग्रेसमध्ये मला काही त्रास नव्हता, अशा शब्दात त्यांनी त्यांचे मत मांडले आहे.

# सायबर गुन्हेगारांचा न्यायाधीशांना गंडा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :** सायबर गुन्हेगारांनी चक्क एका न्यायाधीशांनाच गंडवले आहे. त्या न्यायधीशांची १३ लाख ५० हजार रुपयांनी फसवणूक केली असून या प्रकरणी अंबाझरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर गुन्हेगारांनी वेगवेगळ्या स्किम काढून फसवणुकीचे जाळे फेकले. त्यात संबंधित एका न्यायाधीश एका नातेवाईकाच्या माध्यमातून अडकले. एका जवळच्या नातेवाइकाच्या माध्यमातून त्यांना फाल्कन इन्व्हॉईस डिस्काउंट या ऑनलाइन प्लॅटफॉर्मबाबत माहिती कळाली.

संबंधित नातेवाईक चार ते पाच वर्षांपासून गुंतवणूक करत होते व चांगला नफा मिळतो असे त्यांनी सांगितले. त्यामुळे न्यायाधीशांनीदेखील गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर नोंदणी करून सुरुवातीला २४ हजार रुपये गुंतविले. कंपनीने ४८ दिवसांनंतर त्यांना २४ हजार रुपये मुद्दल आणि नफ्याची अतिरिक्त रक्कम बँक खात्यात परत केले. त्यानंतर न्यायाधीशांनी ५० हजार रुपये गुंतविले.

६ जानेवारी रोजी ५२ दिवस पूर्ण झाल्यावर त्यांच्या बँक खात्यात मुद्दल रकमेसह नफा म्हणून काही रक्कम खात्यात आली. त्यामुळे न्यायाधीशांचा फाल्कन प्लॅटफॉर्मबाबत विश्वास वाढला.

त्यानंतर त्यांनी फाल्कनच्या त्यांच्या खात्यातून विविध कंपन्यांच्या इन्व्हॉईसमध्ये १३ लाख ५० हजार रुपयांची गुंतवणूक केली. ३ फेब्रुवारी रोजी त्यांनी हैदराबाद येथील लाइफस्टाइलच्या इन्व्हॉईसमध्ये एक लाख रुपये गुंतविले. परंतु फाल्कनच्या खात्यात डील रक्कम जमा झालीच नाही. त्यांनी फाल्कनशी संपर्क केला असता कुणीच फोन उचलला नाही.

हेल्पलाइनवरदेखील काहीच प्रतिसाद मिळाला नाही. न्यायाधीशांनी त्यांच्या नातेवाइकांशी संपर्क केला असता त्यांचे फोनदेखील कुणीच उचलत नव्हते. फाल्कनने अनेक गुंतवणूकदारांना अशा पद्धतीने गंडा घातला.

आपली फसवणूक झाल्याची खात्री होताच न्यायाधीशांनी अंबाझरी पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी फाल्कन इन्व्हॉईस डिस्काउंटचा संचालक अमरदीप कुमार याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सायबर गुन्हेगारांनी फसवणूक करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीचा वापर करणे सुरु केले आहे.

# शिक्षकाने गमावले १४ लाख

■ **महासागर प्रतिनिधी यवतमाळ, दि. ११ :** शेअर बाजारात गुंतवणुकीची योग्य संधी असल्याचे सांगून ऑनलाईन फसवणूक करणारी टोळी सक्रीय झाली आहे. कमी किमतीत शेअर्स मिळवून देण्याचे आमिष दाखवत वणी येथील शिक्षकास १३ लाख ६७ हजार रुपयांचा ऑनलाइन गंडा घालण्यात आला. किशोर ओंकार चौधरी असे फसगत झालेल्या जिल्हा परिषदेच्या शिक्षकाचे नाव आहे.

तक्रारीवरून पोलिसांनी बार्कलेस सिक्युरिटी कंपनीतील तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील आरोपी महिलेने किशोर चौधरी यांच्याशी व्हॉट्सपवरून चॅटिंग करून ५० टक्के सूट देऊन शेअर मार्केटमधील आयपीओ सबस्क्राइब करून देण्याचे आश्वासन दिले होते.

याकरिता प्रायमरी ट्रेडिंग अकाऊंट काढण्यासाठी एका कंपनीचे मोबाइल ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. चौधरी यांनी संबंधित ॲपद्वारे टप्पा-टप्प्याने १३ लाख ६७ हजार रुपये जमा केले. यानंतर या ॲपमध्ये वेळोवेळी चौधरी यांनी जमा केलेली रक्कम दर्शविली जात होती. या रकमेचा वापर करून आरोपींनी करावयास सांगितलेल्या ट्रेडद्वारे चौधरी यांच्या प्रायमरी शेअर मार्केट अकाऊंटमध्ये ४४ लाख ६५ हजार ५७४ रुपयांची रक्कम जमा असल्याचे दिसत होते. त्यानंतर संबंधित ग्रुपच्या महिला ॲडमिनने चौधरी यांना पुन्हा नवीन येऊ घातलेल्या एका कंपनीच्या आयपीओला सबस्क्राइब करण्यास सांगितले. मात्र, चौधरी यांनी आता आपल्याकडे पैसे नसल्याचे सांगितले.

आयपीओचे पैसे न भरल्यास काय होऊ शकते, याविषयी चौधरी यांनी विचारणा केली. तेव्हा आरोपींनी फियार्दीस काळजी करू नका. तुमच्या खात्यामध्ये जेवढे पैसे आहेत, तेवढ्याच पैशाचे शेअर्स मिळत असल्याचे सांगितले. मात्र ५ मार्च रोजी चौधरी यांच्या ट्रेडिंग अकाऊंटमध्ये एकूण ५९ लाख ६५ हजार रुपयांचे आयपीओ अलॉट झाल्याचा संदेश आला.

तेव्हा चौधरी यांनी आरोपी महिलेला याबाबत सांगितले. ६ मार्च रोजी चौधरी यांना उर्वरित १५ लाख रुपये भरणा करण्यास सांगितले. पैसे न भरल्यास जमा असलेली ४४ लाख ६५ हजार ५७४ रुपये कंपनी ब्लॉक करेल आणि मार्केटमधून काळ्या यादीत टाकले जाईल, असा इशारा दिला. त्यामुळे चौधरी यांना हा प्रकार संशयास्पद वाटला. त्यांनी याबाबत वणी पोलिसात तक्रार दिली. आरोपींनी १८ फेब्रुवारीपासून ६ मार्चपर्यंत चौधरी यांची १३ लाख ६७ हजार ५७४ रुपयांनी ऑनलाइन पद्धतीने फसवणूक केली.